म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. ३२२

REFBK-0003557

ग्रं. सं. ठाणें
निबंध
322.

# हिंदु स्त्रियांच्या कायदेशीर हक्कविस्ताराची योजना

लेखकः—

वासुदेव विनायक जोशी, बी. ए., एल्एल्. बी.

हायकोर्ट वकील, बडोदें.

मुद्रकः—दामोदर रघुनाथ मित्र, मनोरंजन प्रेस, सँडहर्स्ट रोड, मुंबई.

( लेखकानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत ०-६-०

# हिंदु स्त्रियांच्या—

# कायदेशीर हक्कविस्ताराची योजना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ३५५६

लेखकः—

वासुदेव विनायक जोशी,

बी. ए., एल्एल्. बी.

हायकोर्ट वकील, बडोदें.

REFBK-0003557

सन १९२८.

किंमत ०-६-०

# अनुक्रमणिका


पृष्ठ.

१ कन्या

( अ ) मिळकतीसंबंधीं हक्क. ... ... ... ... ... ... २

,, ,, सूचना. ... ... ... ... ... ... ४

( आ ) वैयक्तिक हक्क— ... ... ... ... ... ...

,, लग्न संस्कार. ... ... ... ... ... ... ५

लग्नास कन्येच्या संमतीची जरूरी ... ... ... ... ...

२ स्त्रिया ( विवाहित )

( अ ) वैयक्तिक हक्क

लग्नसंस्कार ... ... ... ... ... ... ९

अज्ञानावस्थेंत माहेरी रहाण्याचा हक्क ... ... ... ... ९

,, ,, झालेलें लग्न रद्द करण्याचीं कारणें ... ... ... १०

घटस्फोट ... ... ... ... ... ... ... ११

घटस्फोट शास्त्रसंमत ... ... ... ... ... ... १२

प्रचलित कायद्याचें अनुदार धोरण ... ... ... ... ... १३

घटस्फोट मिळविण्याचीं कारणें ... ... ... ... ... १५

बहूपत्नीकत्व ... ... ... ... ... ... ... १६

बहूपत्नीकत्वाचें नियंत्रण ... ... ... ... ... ... १९

पतीचा व्यभिचार ... ... ... ... ... ... ... १९

फारकत ... ... ... ... ... ... ... २०

फारकत मिळविण्याचीं कारणें ... ... ... ... ... २१

( आ ) मिळकतीवरचे हक्क

सुवासिनी—लग्ननिमित्तानें प्राप्त होणारे हक्क ... ... ... ... २२

,, च्या हक्काबद्दलची सूचना ... ... ... ... २६

सूचनेचें महत्त्व ... ... ... ... ... २६

सूचनेपासून फायदे ... ... ... ... ... २७

विधवा ... ... ... ... ... ... ... २८

हक्काविषयींचे ऐतिहासिक समालोचन ... ... ... ... ... २८

अन्यायाचीं कारणें

( १ ) मर्यादित स्वामित्व ... ... ... ... ... ३२

( २ ) अविभक्त कुटुंबांतील विधवा ... ... ... ... ३५

सूचना ... ... ... ... ... ... ... ... ३७

उत्तराधिकारी ( Reversioners ) ... ... ... ... ... ३७

,, सूचना ... ... ... ... ... ... ४०

३ उपसंहार—

कांहीं आक्षेपांचें खंडण ... ... ... ... ... ... ४०

सुधारणा कोणी घडवून आणावयाची ? ... ... ... ... ... ४१

# विनंति

मासिक मनोरंजनांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली या विषयावरील लेखमाला हिंदु स्त्रियांच्या हक्कविस्ताराच्या चळवळीच्या प्रसारार्थ स्वतंत्र पुस्तकरूपांत छापून प्रसिद्ध करीत आहोंत. या महत्त्वाच्या विषयावर विद्वानांनी आपआपले अभिप्राय कळविण्याची कृपा केल्यास लेखक त्या सर्वांचा ऋणी राहील; इतकेंच नव्हें तर, स्त्रियांच्या हक्कविस्ताराची एकादी विधायक सूचना जनतेपुढें मांडून त्यांची सहानुभूति मिळविण्याच्या दृष्टीनें अशा अभिप्रायांचा बहुमोल उपयोग करून घेता येण्यासारखा आहे. हा प्रश्न बहूजनसमाजाच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचा, जरूरीचा व जिव्हाळ्याचा असून तो सोडविण्याची जबाबदारी शास्त्रांत ज्यास शिष्ट ह्मणून संबोधिलें जातें अशा विद्वानांवर पडत असून ( पृ. ४२ ) त्यांच्याच विचारास संमत, समर्पक व सुटसुटीत अशी जी योजना वाटेल अशाच योजनेचा पुरस्कार होणें जरूर आहे. तरी ज्यांच्या ज्यांच्या हातीं हा लेख पडेल त्यांनीं आपआपले अभिप्राय लेखकाकडे पाठविण्याची अगर वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध करण्याची तसदी जरूर घ्यावी अशी नम्र विनंति आहे.

भगिनीवर्गास ही आमची आग्रहाची अशी विनंती आहे कीं वरील विनंतीचें महत्त्व जाणून प्रतिष्ठित अशा बंधूंचे अभिप्राय मिळवून ते त्यांनीं लेखकाकडे पाठवून द्यावेत.

लेखांत मुद्रिताचीं बरीच अशुद्धें राहिलीं आहेत त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करणें जरूर आहे.

हायकोर्ट वकील, दांड्या बाजार
बडोदें ता. १--११--२८

आपला,
**वासुदेव विनायक जोशी.**

३४५८
सं. मी. ४२३

# हिंदु स्त्रियांच्या कायदेशीर हक्कविस्ताराची योजना.

हिंदु स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांचें वर्णन करून दरेक बाबतींत त्यांची स्थिति किती परावलंबी आणि कष्टमय आहे याचें यथार्थ दिग्दर्शन सुमारें पंधरा सोळा वर्षांपूर्वी कै. कृष्णाजी केशव गोखले यांनीं 'हिंदुस्त्रियांची कायदेशीर दुर्दशा' या लेखमालेंत केलेलें आहे. स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांचा विस्तार होणें अत्यंत जरूर आहे अशी भगिनीवर्गाची खात्री होत चालली असली तरी त्यांची इच्छा विचाराई आहे अशी अस्फुट आश्वासनें देण्यापलीकडे पुरुषवर्गाच्या सहानुभूतीनें आजवर मजल गांठलेली नाहीं; व विवक्षित योजनेचा अभाव हा त्यांच्या या बेफिकीर प्रवृत्तीचें समर्थन आजवर करीत आलेला आहे. स्त्रियांनींच या प्रश्नास चालन देणें जरूर आहे आणि त्या हक्कांची अलीकडे जोरानें मागणी होत आहे खरी; परंतु विविक्षित योजना पुढें मांडण्यास जरूर तें कायद्याचें ज्ञान आमच्या भगिनीवर्गास नसल्यानें त्यांच्या म्हणण्यास मूर्त स्वरूप देणारी योजना पुढें आली नाहीं. पुराणाभिमानानें जर्जर झालेला हिंदुसमाज त्यांच्या या मागण्यांकडे अत्यंत तिरस्कार दृष्टीनें पहात आहे, इतकेंच नव्हे तर आजवर रूढ असलेल्या आचारास, व्यवहारास उलथून पाडून 'मोकळें' मिरविण्याकरितां शिकलेल्या स्त्रियांनीं ही चळवळ चालविली आहे असें त्याचें मत असावेसें दिसतें. तेव्हां प्रस्तुतच्या निबंधांत स्त्रियांचे हक्क कोणकोणते आणि कोण कोणत्या बाबतींत विस्तृत केले पाहिजेत याचें दिग्दर्शन करून श्रुतिस्मृतीपुराणादि धर्मग्रंथांना संमत असलेल्या शास्त्रार्थांतूनच त्यांचा विकास कसकसा होत आहे याची चर्चा करण्याचें आम्ही योजिलें आहे.

हिंदु लोकांचा त्यांच्या धर्मग्रंथावर अत्यंत अढळ विश्वास आहे. समाजसुधारणा असो तरी विधवाविवाहाबद्दलची जीं रणें पूर्वी माजलेली होतीं त्यांतहि दरेक पक्षाची मदार विवक्षित श्रुतिस्मृतीच्या शब्दप्रामाण्यावर, शब्दार्थावर होती. अगदीं सुधारकांनींहि तुमचे धर्मग्रंथ कांहींहि म्हणोत पुनर्विवाह हा जरूर म्हणून नवीन प्रचारांत आणा असा हट्ट धरिला नाहीं. उलट पूर्वी एकदा तो रूढ होता, तो सुरू करा असें दाखविण्याकडे त्यांचा आग्रह होता. 'मानः पथः पित्र्यान्मानवादधिदूरं नैष्ट परावतः' ( मनूनें घालून दिलेल्या आणि वाडवडिलांपासून चालत आलेल्या पुराणपथावरून आम्हास बाजूस नेऊं नका ) या ऋग्वेदाच्या वचनाची पकड दरेक हिंदुमनावर जबर आहे आणि समाजरचनेच्या दृष्टीने तें युक्तहि आहे. तेव्हां दरेक सुधारणा, पूर्वकालीन आचारांतून निघत असल्याची खात्री केल्याशिवाय ती लोकप्रिय होणें शक्य नाहीं. स्त्रियांच्या हक्कांबद्दल असें अभिमानानें म्हणतां येईल कीं 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' अशीं वचनें तोंडानें जेथें गुणगुणलीं जात तेथील समाजव्यवस्थेचें चित्र 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः' या श्लोकांत वर्णिलेलें होतें. पूर्वीचा सर्व आचार आपण कायम ठेविला असता तर स्त्रियांची अवहेलनाहि झाली नसती अगर त्यांच्या हक्कांबद्दलची तक्रारहि कोणी पुढें मांडली नसती. आपण कांहीं आचार अर्धवट ठेविले, कांहीं अजीबात टाकून दिले आणि या आपल्या धरसोडीच्या वर्तनांत या पापाचें बीज पेरिलें गेलेलें आहे. परिस्थितीचें स्थित्यंतरहि मनस्वी झालेलें आहे, जीवनकलहाची तीव्रता वाढलेली आहे, आणि बदलत्या कालाप्रमाणें धर्महि बदलला पाहिजे हें उचित असूनहि परकीयांचें राज्य आमच्यावर असल्यानें कोणतीहि सुधारणा घडवून आणिल्यास धार्मिक बाबतींत ढवळाढवळ करणार नाहीं या दिलेल्या वचनाचें अतिक्रमण

होईल या सबबीवर राज्यकर्त्यांकडून त्या होत नाहींत. नाहीं तर स्वराज्याच्या अमदानींत हा प्रश्न खुद्द राजानें याच्या अगोदरच सोडविला असता.

धर्माचें कार्य जनोन्नति आहे. " यतोऽभ्युदय निःश्रेयः सिद्धिः स धर्मः " आणि जेणेंकरून समाजोन्नति होते तोच धर्म होय. कारण धर्माचा अवतार सर्व जीवांच्या उन्नतीकरितां आहे. 'प्रभवार्थाय भूतानां धर्मप्रवचनं कृतम् । यः स्यात् प्रभवसंयुक्तः सधर्म इति निश्चयः ॥ स्त्रिया याहि पण प्राणिमात्रांत येतात आणि त्यांची उन्नति होणें, त्यांच्या सौख्याची आणि सुष्ठुतेची तरतूद योग्य ती होणें हें अर्थात् धर्मास संमत आहे. स्त्रियांना समान हक्क या असा आग्रह शिकलेल्या लोकांनीं धरिला असें म्हटलें तरी त्यांत तें नवीन अगर विसंगत असें कांहींच म्हणत नसून 'अर्धं वा एष आत्मनो यज्जायेत ' या वेदवाक्यांतहि तेंच तत्त्व दाखविलें आहे आणि तेंच तत्त्व आधुनिक आकांक्षेशीं तुल्यबल असल्याचें पाहून आपल्या पूर्वजांचें कौतुकच करावें लागेल. बदललेल्या स्थितीप्रमाणें धर्माचा आचार आणि सूत्रेंहि थोडी फार बदललीं पाहिजेत. नाहींतर तो धर्म मृतवत् होईल इतकेंच नव्हें तर बृहस्पतीनें सांगितल्याप्रमाणें ' केवलं शास्त्रमाश्रित्य न कर्तव्यो हि निर्णयः । युक्तिहिने विचारे तु धर्महानिः प्रजायते ॥ ( केवळ शास्त्रप्रामाण्यानें निर्णय करूं नये, कारण युक्त तो निर्णय न झाल्यास त्यायोगें धर्माची हानि होते) आणि शिष्टाचाराला जो अग्रमान दिला आहे त्यांतहि हेंच तत्त्व ध्वनित केलेलें आहे. श्रुतिस्मृतींच्या विरोधांत स्मृतींना प्रामाण्य व त्या सर्वांपेक्षांहि शिष्टाचारास प्रामाण्य देण्यांत त्या बदलत्या परिस्थितीला अनुरूप धार्मिक तत्त्वांचें रूपांतर अशी उत्क्रांति होणें जरूर आहे हेंच तत्त्व शास्त्रार्थास सम्मत आहे असें दिसतें.

विषयविवेचनाच्या दृष्टीनें प्रथम दोन भाग करितां येतील. ते असे, स्त्रियांचे व्यक्तिगत हक्क आणि मिळकतीवरील हक्क, स्वतःच्या लग्नास अनुमति, वरपसंती, इत्यादि जसे वैयक्तिक हक्क. हणून गणतां येतील तसेच तिचे वारसाचे हक्क मिळकतीवरचें स्वामित्व वगैरे, तिचे मिळकतीवरील हक्क या शब्द प्रयोगानें उद्दिष्ट करितां येतील. म्हणजे धर्मशास्त्राच्या दृष्टीनें हिंदु स्त्रियांच्या दोन निरनिराळ्या अवस्था गणण्यांत येत असतात. एक अविवाहित अगर कुटुंबाची कन्या आणि दुसरी म्हणजे विवाहित अगर कोणत्या तरी कुटुंबांत लग्नाच्या निमित्तानें प्रवेश करणारी स्त्री. तेव्हां स्त्रियांच्या या दोन अवस्थांच्या अनुरोधानें विषयाचें विवेचन करणें सोपें जाईल या हेतूनें प्रथम कन्येबद्दल विचार करूं.

## कन्या

मुलगी आणि मुलगा अगर स्त्री आणि पुरुष यांच्या हक्कांतील विषमता फक्त हिंदुधर्मशास्त्रांतच नसून अत्यंत जुने म्हणून जे इतर ज्ञातीय कायदेकानू आहेत, उदाहरणार्थ रोमन लॉ, कोडनेपोलियन्, ज्यूईश लॉ, इंग्लडमधील जुना कायदा त्यांतहि ही विषमता तितक्याच तीव्रतेनें दृष्टोत्पत्तीस येते. व "न स्त्री स्वातंत्र्यमर्हति" ही जशी तिच्या वैयक्तिक स्वातंत्र्याची मर्यादा होती तद्वत्च तिच्या मिळकतीवरील हक्कासंबंधानें 'भार्या पुत्रश्च दासश्च त्रय एवाधनाः स्मृताः । ( मनु ८-४१६ म्हणजे भार्या, पुत्र आणि दास यांची मिळकत असूं शकत नाहीं. ) ही जरी मर्यादा म्हणून दाखवितां येईल तरी तिच्या हक्कांचा आरंभ आणि शेवट येथेंच कुंठित झाला असें मानणें बरोबर होणार नाहीं. इंग्लडमधील कॉमनलॉमध्यें परिस्थित्यनुसार वेळोवेळीं निरनिराळ्या कायद्यांनीं पुष्कळ फेर झाला, आणि आज इंग्लडमधील स्त्रियांचे जे जवळ जवळ समसमान हक्क असल्याचें दिसून येतें त्याचें श्रेय निरनिराळ्या कायद्यांना असलें तरी तत्पूर्वींच्या कल्पना आपल्या धर्मशास्त्रांतल्या विचाराप्रमाणें आकुंचित होत्या. किंबहुना त्यांच्यापेक्षांहि अनुदार आणि संकोचित होत्या असेंच तुलनेनें म्हणावें लागेल. आपली पूर्वींची 'ऋषिप्रणित धर्मशास्त्र' ही जी योजना होती ती बंद पडली आणि त्यानंतरचा टीकाकारांचा काल सुरू झाला. त्यामुळें पुढील प्रगति कुंठित झाली. असो. मुलीचा जन्म ज्या कुळांत होतो त्यांतून लग्न होईतोंवर भरणपोषण आणि लग्नखर्च एवढें तिला हक्कानें मिळण्यासारखें असतें. स्वतः मुलीचे वडील हयात असतांना तिची आबाळ होत नाहीं, अगर लग्नखर्चांत कंजुषपणा होऊन तिच्या नशीबीं कायमचें दारिद्र्य बांधलें जात नाहीं. तथापि तिचे वडील जर निवर्तले तर त्यांची लक्षावधी रुपयांची मिळकत अनुजीवीत्वाच्या हक्कानें अगर वारशानें मिळविणाऱ्या इतर नातेवाईकांच्याकडे या दोन जबाबदाऱ्या पुऱ्या करण्याची वेळ आली

म्हणजे हालअपेष्टांनीं कंटाळून जाऊन "एकदां लग्न होऊन मी सासरी केव्हां जाईन" असें तिला होतें. तसेंच लग्नकार्यांत स्वतः मुलीला अगर तिच्या आईला बोलण्याचा हक्क नसल्यानें पैशाच्या लोभानें तिला वाटेल त्याच्या गळ्यांत बांधली गेल्याचीं उदाहरणें शेंकड्यावारी देतां येतील. बरें हिंदुधर्मशास्त्र असें कांहीं अडाणी आहे कीं एकवार लग्न झालें म्हणजे त्यांत योग्य अधिकारी माणसानें तिचें कन्यादान केलेलें नसो, वेडा, मूर्ख, जरठ, भयंकर रोगानें पछाडलेला, नपूंसक पती असो, अगर कोर्टाच्या हुकमाची अमान्यता करून लग्न केलेलें असो तें वज्रलेप समजतात. 'सकृदंशो निपतति सकृत् कन्या प्रदीयते । ( मनु–एकवारच मिळकतीचा भाग पडतो आणि एकदाच कन्यादान होतें ) व 'वचनशतेनापि वस्तुनोऽन्यथाकरणाशक्तेः ( शंभर शास्त्राधारानेंहि घडलेली गोष्ट बदलणें शक्य नाहीं ) यांत दर्शविलेल्या तत्त्वानें, अगर इंग्रजी शब्दप्रयोगांत factum valet या सिद्धांतानें अशीं लग्नें कायदेशीर धरलीं जातात. मिळकतीबद्दल पहावें तर प्रत्यक्ष असें तिला कांहींच मिळत नाहीं. लग्नखर्च जरी तिच्याप्रीत्यर्थ केला गेला तरी त्याचें तिच्या वडिलांच्या मिळकतीशीं प्रमाण ठरलेलें नसल्यानें बहुतेक प्रसंगीं तिची फसगतच होते. तसेंच अलिकडे शिक्षण घेण्याचा प्रघात सुरू झाला तेव्हां समागित मिळकतीवर तिचा उच्च शिक्षणाचा खर्च कायदेशीरपणें पडूंहि शकणार नाहीं, अगर तिला आजन्म अविवाहित रहावेसें वाटलें तरी तिच्या पोटापाण्याचा प्रश्न तिचा तिनें नोकरी चाकरी करून सोडविला पाहिजे. कारण तिला कुटुंबांतील पुरुष सहभागीदाराचे हक्क मिळत नाहींत. याप्रमाणें कन्येचा मिळकतीवरील हक्क होय.

स्मृतिग्रंथांतून तिच्या लग्नाचा खर्च कुटुंबातून झाला पाहिजे असें आहे. तसेंच मुली अविवाहित राहण्याचेहि प्रकार आहेत. व अशा अविवाहित मुलींनां त्यांच्या वडिलांच्या मिळकतीची वांटणी होईल त्यावेळीं हिस्सा देण्याची आज्ञा आहे. 'अमाजूरिव पित्रो सचा सती समानादा सदसस्तामियें भगम् ॥ ऋग्वेदः–हे इन्द्रा मातापितरांच्या जवळ राहणारी कन्या ज्याप्रमाणें माहेरच्या मिळकतींत भाग मागूं शकते. ' मातरः पुत्रभागानुसारेण भागहारिण्यः । अनूढाश्च दुहितरः ॥(विष्णु–मातांनां पुत्रांच्या भागा-बरोबर भाग मिळेल. आणि तसें कुमारिकांचेहि ) 'ज्येष्ठस्यांशोऽधिको देयः कनिष्ठस्यावरः स्मृतः । समांशभाजः शेषाः स्युरदत्ताभगिनि तथा ॥ (नारदः– मोठ्या मुलास जास्त भाग व कनिष्ठ मुलास लहान भाग देणें आणि बाकी राहिलेल्यांत ( पुत्र ) व कुमारिका समसमान भाग घेतील.) 'तदभावे तु जननी तनयांशसमांशिनी । समांशा मातरस्तेषां चतुर्थांशाश्च कन्यकाः " ॥ बृहस्पतिः–परंतु त्याच्या मरणानंतर मातेला मुलाच्या बरोबरीनें हिस्सा मिळतो. माता आणि मुलगे यांचे भाग सारखे ( असून ) कुमारिकांनां चवथा हिस्सा मिळतो. ' कन्यकानामदत्तानां चतुर्थो भाग इष्यते । पुत्राणांश्चत्रयो भागाः साम्यं स्वल्पधने स्मृतम् ॥ कात्यायन–चवथा हिस्सा अविवाहित मुलींनां मिळावयाचा व तीन हिस्से मुलांस मिळावयाचे. परंतु मिळकत जर थोडी असेल तर समसमान भाग ( उभयतांचे ) समजावेत. 'स्वेभ्योंऽशेभ्यस्तु कन्याभ्यः प्रदद्युर्भ्रातरः पृथक्। मनु–'सर्व भावांनीं आपआपल्या अंशापासून चतुर्थांश प्रत्येक अविवाहित भगिनीला विवाहसंस्कारार्थ द्यावा. 'आसंस्काराद्भरेत् भागं परतो बिभृयात् पतिः । लग्नापर्यंत कुमारिकेस भाग मिळावा. (लग्नानंतर तिच्या नवऱ्यानें तिचें पालनपोषण करावें.) 'एकानेकाच चेत्कन्या पित्रोर्ध्वं स्थिता तदा । स्वांशात् पुत्रैस्तुरीयांशं दत्वावश्यं विवाह्यते॥२४॥ हेमचंद्र ( ११५०–१२०० ) यानें अर्हन्नीतिः यांत पित्याच्या मरणानंतर एक अगर अनेक कुमारिका असतील तर त्यांचे विवाह भावांनीं आपल्या भागांतून चवथा भाग देऊन करावेत, असें सांगितलेलें आहे. मिथिला संप्रदायाप्रमाणें लग्नखर्चाकरितां म्हणून हा भाग देण्यांत आला आहे. परंतु मिताक्षराप्रमाणें लग्नखर्चाची तरतूद म्हणून हा भाग दिलेला नसून तो कुमारिकेचा हक्क म्हणून गणला गेला आहे. परंतु वीरमित्रोदयाच्या मताप्रमाणें हा भाग तिच्या लग्नखर्चाशिवाय वर आणखी देण्यांत आलेला आहे. ( वेस्ट अॅन्ड बुलर ६२८ ) अविवाहित कन्येला पित्याच्या मिळकतीची वांटणी होत असतां चौथा हिस्सा मागण्याचा हक्क एका जुन्या ठरावांत प्रिव्ही कौन्सिलनें मान्य केलेला आहे ( लालजीत वि. राज २० वी. री. ३३६ ). कुमारिकेचा हक्क मिळकतीची वांटणी होईल त्यावेळीं अमलांत आणण्यासारखा असल्याचे हिंदुधर्मशास्त्रानें मान्य केलें असले

तरी हा हक्क एका हातानें देऊन दुसऱ्या हातानें परत घेतल्यासारखाच आहे. तिला स्वतःला वांटणी मागण्याचा हक्क नाहीं, तेव्हां वांटणी जर भावांच्यांत झाली नाहीं तर तिला कांहींच मिळावयाचें नाहीं. एकत्र स्थितींत तिचें भरणपोषण पाहिजे तर होईल, परंतु ती आजन्म अविवाहित राहूं म्हणाली तर तिला पोसण्याची जबाबदारी भावांच्यावर अगर इतर सहभागिदारांच्यावर पडेल कीं नाहीं याबद्दल शंकाच आहे. तसेंच तिचें लग्न त्यांनीं जरी करून दिलें तरी तिच्या चौथ्या हिश्याच्या मानानें खर्च होईल असेंहि खात्रीपूर्वक सांगतां येणार नाहीं. मिताक्षरी अगर वीरमित्रोदयाच्या मतानें लग्नखर्चाउपरांत हा चौथा हिस्सा द्यावयाचा असतो. ती जरी आज आपण विशेष मागणी म्हणून कबूल करण्यास नाखूष असलों तरी निदान तिला पित्याच्या अगर जन्मदात्या कुटुंबांत कांहीं अंश आणि हिस्सा मिळणें अत्यंत जरूर आहे हें मान्य करणें जरूर आहे. मुसलमानी कायद्यांत स्त्रियांबद्दलचे जास्त उदार विचार प्रगट केलेले नसताहि त्यांत मुलीला बापाच्या मिळकतींत हिस्सेदार ठरविलेली आहे. इंग्रजी कायद्यांतहि मुलीला असा हक्क आहे. आपल्या शास्त्रांतहि असा हक्क दिलेला आहे तेव्हां तिला तो मागण्याचा अधिकार असणें जरूर आहे. तेव्हां मिळकतीवरच्या हक्काबद्दल अशी सूचना.

**कीं ( १ ) मुलीला आपल्या माहेरच्या मिळकतींत तिच्या भावाचा चौथा हिस्सा तिला मागण्याचा हक्क असावा व तिचा लग्नखर्च त्यांतून वजा करावा.**

या तऱ्हेच्या योजनेनें दुसरीहि अडचण नाहींशी होईल ती म्हणजे विधवा कन्येच्या भरणपोषणासंबंधानें. माहेरची कितीहि श्रीमती असो, सासरची कितीहि हलाकीची स्थिती असो, आजच्या कायद्याप्रमाणें तिला माहेरच्या मंडळीकडून केवळ उदरनिर्वाहापुरतेंहि हक्कानें मागतां येत नाहीं. ( बाई मंगळ वि० बाई रुक्मिणी २३ मुंबई २७१ ) कलकत्ता हायकोर्टानें मात्र ह्याच्या विरुद्ध ठरविलें व निराधार विगतधवा कन्येला बापाच्या मिळकतींतून अन्नवस्त्र मिळालें पाहिजे असें ( मोखडा दासी वि० नंदुलाल २८ कलकत्ता २७८ ) ठरविलें.

या योजनेंत तिसरीहि सोय साधतां येईल आणि ती म्हणजे मुलीला तिच्या भावाच्या हिश्याच्या प्रमाणांत जो चवथा भाग द्यावयाचा त्यांतूनच तिच्या लग्नाचा खर्च व्हावा. असें झालें म्हणजे सध्यांच्या समाजरचनेस त्यापासून फारसा धक्का पोहोंचणार नाहीं. सध्यांहि साधारणपणें त्याचप्रमाणांत खर्च होतो, आणि अशी योजना फारशी समाजव्यवस्थेस विघातक होणार नाहीं. ज्या जातींत मुलीचा हुंडा म्हणजे किंमत घेतात त्याजविषयीं विचार करितांना असेंच म्हणावें लागेल की तिला विकून टाकून श्रीमंत होऊं पहाणाऱ्या वडिलांच्या मिळकतीपैकीं कांहीं विशिष्ट भाग तिला मिळाल्यास त्यांत वावगें कांहींच नाहीं. उलट लग्ननिमित्तानें वरपक्षाकडील मंडळींनां कन्येच्या किंमतीपायीं मुळीस मिळविणाऱ्या कन्येच्या बापाच्या मिळकतीचा भाग तिच्याबरोबर परत वरपक्षाकडे आला तर नुकसानभरपाई पुरेपुरी झाली नाहीं तरी अंशतः कां होईना पण किंमतीचा मोबदला मिळाल्यासारखें होईल. मुलीला मिळणाऱ्या चौथ्या हिश्यांतूनच लग्नखर्च करावयाचा ही अटहि कांहीं वाईट नाहीं. मुलीला चांगलें स्थळ मिळावें म्हणून आपल्या आटोक्याबाहेर लग्नखर्च करून इतर मुलाबाळांनां उन्हाळा करून ठेवणारे जे फाजिल ममताळू आईबाप असतील त्यांच्या उधळपट्टीवरहि त्यामुळें चांगलेच दडपण पडेल. आणि मुलांनांहि अशा उधळपट्टीस आळा घालतां येईल.

कन्या आणि पुत्र यांनां वरीलप्रमाणें हिस्से देण्यांत आपण कांहीं नवीन करीत आहोंत असें नाहीं. कारण मिळकतीची वांटणी होतांना अविवाहित मुलींनां भावाच्या चौथा हिस्सा देण्याची शास्त्राची आज्ञा आहे, कायद्याचा अभिप्राय आहे. पुत्र आणि कन्या यांत फारसा फरक नाहीं, दोघेहि एकाच आईबापांचीं मुलें आणि त्यापैकीं पुत्रालाच फक्त मिळकतीवर हक्क मिळावेत आणि कन्येला कांहीं मिळूं नये हें न्यायाला धरून नाहीं. बृहस्पती यानें म्हटल्याप्रमाणें 'यथैवात्मा तथा पुत्रः पुत्रेण दुहिता समा । तस्यामात्मनि तिष्ठायां कथमन्यो धनम् हरेत् ॥' मुलगा आणि मुलगी यांत फरक नाहींच, दोघेहि सारखेच वारस समजावेत. येथें एक गोष्ट स्पष्ट करून सांगितली पाहिजे आणि ती म्हणजे कन्येला तिच्या भावाच्या चौथ्या हिश्शाइतकीच मिळकत देण्याची जी सूचना केली आहे; त्यांत ही जी हिस्सेराशीची विषमता दिसून येते ती कां म्हणून ? आणि आमच्या भगिनीवर्गापैकीं बऱ्याच जणींनां ही विषमता अन्यायी वाटेल. परंतु याचा

दूरवर विचार केला तर त्यासहि सबळ अशीं कारणें निघतील. प्रथम तर कन्येला लग्नानंतर तिच्या पतीच्या मिळकतींत समसमान भाग मिळावयाचा आहे. म्हणजे जरी भावांच्या हिश्यांच्या मानानें वडिलांच्या मिळकतींतला लहान हिस्सा मिळाला तरी लग्नानंतर मिळणाऱ्या सासरच्या मिळकतींतील विशेष हिस्सा लक्षांत घेतां अन्याय होतच नाहीं, असें कळून येईल. कन्येपेक्षां पुत्राला अगर स्त्रीपेक्षां पुरुषाला मिळकतीचा वांटा जास्त मिळत असल्यास त्यांत युक्त तेंच होत असतें. कुटुंबांतील प्रत्येक पुरुष सहभागीदार हा आपआपल्या प्रकारानें मुख्य कुटुंबांतून फुटून नवीन एका कुटुंबाचा मुख्य घटक बनत असतो, व नवीन कुटुंबाचा संतती संपत्तीचा विस्तार त्याच्यापासून होत असतो. तेव्हां त्याला मिळणारा भाग हा भांडवलाप्रमाणें उपयोगी पडत असल्यानें तो जेवढा मोठा तेवढी त्याच्या स्वतंत्र कुटुंबाची प्रतिष्ठा जास्त असें असल्यामुळेंच कीं काय जगांतील सर्व कायद्यांत ही हिश्याची विषमता दिसून येते. स्त्रिया या नवीन कुटुंबाच्या घटक होऊं शकत नाहींत. आणि त्यांची मिळकत कुटुंबाची मिळकत म्हणूनहि उपयोगी पडण्यासारखी नसते. मुलाला ज्याप्रमाणें केवळ जन्मानेंच बापाच्या मिळकतींत समसमान भाग मिळतो तसा समसमान भाग मुलीला व मुलांना जन्मःतच स्त्रीधनांत मिळूं शकत नाहीं, व ती मिळकत तिच्या स्वतंत्र स्वामित्वाची राहते. तेवढ्यासाठीं ही हिश्यांची विषमता न्याय्य आहे असेंच म्हणावें लागेल.

कन्येला माहेरहून मिळणारी दरेक मिळकतहि स्त्रीधनच साधारणपणें गणली जात असल्यानें त्यावर अर्थात्च तिचें संपूर्ण स्वामित्व राहील हें उघडच आहे. तत्रापि विवाहित स्थितींत आणि नवऱ्याच्या ह्यातींत त्या संपूर्ण स्वामित्वावर कांहीं मर्यादा घालणें जरूर आहे कीं नाहीं याचा विचार ओघानें पुढें होणारच आहे.

## कन्येचे वैयक्तिक हक्क

तिच्या वैयक्तिक हक्कांबद्दल पाहूं गेलें असतां असें म्हणावें लागेल कीं ज्या लग्नावर तिचें सर्व आयुष्य, आणि आयुष्यांतलें सुखदुःख अवलंबून असावयाचें त्यांत तिची संमती घेतली जावी हें मागणें अत्यंत न्याय्य आहे. असें वारंवार बजावून सांगण्यांत येतें कीं, इतर धर्मीयांच्या कायद्याप्रमाणें विवाह हा करार नसून हिंदुधर्मशास्त्रानें त्याची संस्कार म्हणून गणना केलेली आहे. अतैव तो फार उच्चतर कोटींतला आहे. तो एकवार घडून आला, आणि मग वाटेल तें जरी घडलें, उघडकीस आलें, तरी पतिपत्नीचा विवाहसंबंध वज्राप्रमाणें अभेद्य रहातो. ब्राह्म, दैव, आर्ष, गांधर्व इत्यादि निरनिराळे आठ विवाहाचे प्रकार जाऊन कलियुगांत त्यापैकीं फक्त ब्राह्मविवाहपद्धतीच कायम राहिली आणि आजहि कायद्यानें असें अनुमान करावें लागतें कीं दरेक विवाह हा ब्राह्मपद्धतीनेंच झालेला आहे. ( गोजाबाई वि० श्रीमंत शहाजीराव १७ मुं. ११४ ) गांधर्व विवाहपद्धती आतां अमलांत राहिलेली नसून ( विश्वनाथस्वामी वि० कामुआम्माल २४ म. लॉ. ज. २७१ ) गांधर्व विवाह म्हणजे रक्षासंबंधापेक्षां वरच्या दर्जाचा नाहीं ( भवानी वि० महाराजासिंग ३ अला. ७३८ ) ब्राह्मपद्धतींत 'आच्छाद्य चार्चयित्वा च श्रुतिशीलवते स्वयम् । आहूय दानं कन्याया ब्राह्मो धर्म प्रकीर्तितः"–मनु ३२७ ( विद्या व सदाचार यांनीं युक्त अशा वराला बोलावून त्याला व कन्येला वस्त्रें, अलंकार देऊन त्याची पूजा करून त्या वराला कन्येचें **दान** करणें तो ब्राह्मविवाह होय ) यांत दर्शविल्याप्रमाणें कन्येचें दान पित्यानें करावयाचें ही मुख्य कल्पना आहे. अर्थात् कन्येचा विचार घेण्याचें कारणच नंतर राहिलें नाहीं. एकाद्या जिनसेप्रमाणें पित्यानें तिला वाटेल त्यास देऊन टाकली, तो कुलशीलहीन, विद्याहीन फार काय पण तो वेडा, रोगी जरी असला तरी तें लग्न वज्रलेप झालें. खुद्द पिताहि पैशाच्या लोभानें मुलीच्या सुखावर आणि सौभाग्यावर पाणी सोडण्यास कित्येक वेळीं तयार होतो ? तर मग त्याच्या पश्चात् त्याच्या इतर नातेवाईकांच्याकडे तिला दान करून टाकण्याची सुसंधी आली म्हणजे तिच्या भावी सौख्याबद्दलची खबरदारी कितपत घेण्यांत येत असेल त्याची वाचकांनींच कल्पना करावी. खुद्द तिची जन्मदाती माता, तिलाहि मुलीच्या लग्नासंबंधांत अत्यंत किमान आणि शेवटचा दर्जा दिलेला आहे. हिंदु धर्मशास्त्राप्रमाणें मुलीचें भवितव्य तिच्या वडिलांच्या अगर तिच्या पालकांच्या मर्जीवर अवलंबून असून तिची विवाहसंबंधास संमति आहे कीं नाहीं याची मुळींच खिजगणतीहि करण्यांत येत नसते, असें विधान कायद्याचा अर्थ करितांना न्यायासनावरून होत असतें. ( पुरुषोत्तमदास वि० पुरुषोत्तमदास २१ मुंबई २३ )

वैदिक कालीं तिला स्वतःचा पती निवडण्याची पूर्ण मोकळीक असे असें 'भद्रावधूर्भवति यतसुपेशाः स्वयं सामित्रं वनुते जनेचित्। ( ऋग्वेद १० मं २७ स १२ चांगली आणि रूपवती कन्या जनांमधून स्वतःच पतीची निवड करिते. ) या वाक्यावरून ह्मणण्यास हरकत नाहीं. महाभारतकालीं स्वयंवराची जी पद्धति होती त्यांतहि वराची निवड वधूनें करण्याचा हक्क कबूल ठेवण्यांत आलेला आहे. वडिलांनीं मुलीला वर पहावयाचा त्यांतहि त्यांच्यावर तेवढीच भारी जबाबदारी टाकलेली होती. सद्गुणी आणि अनुरूप वर त्यांनीं पहावा. 'उत्कृष्टायाभिरूपाय वराय सदृशाय च। अप्राप्तामपि तां तस्मै कन्यां दद्याद्यथाविधिः ॥ ( मनु ९-८८ ) 'काममामरणात्तिष्ठेद्गृहे कन्यर्तुमत्यपि। न चैवैनां प्रयच्छेत्तु गुणहीनाय कर्हिचित् ॥ मनु ९-८९ नाहीं तर ( उत्कृष्ट, सुस्वरूप अनुरूप अशा वरास कन्या द्यावी. ऋतुमतीहि कन्या आमरण पितृगृहीं राहो, परंतु ती कन्या विद्यादिगुणहीनाला कदापि देऊं नका. ) असा शास्त्राचा स्पष्ट आदेश होता. तसेंच शारीरिक व्यंगांनीं युक्त अशा पुरुषांनीं लग्न न करितां व्रतस्थ राहावें अशीहि आज्ञा होती.

कुब्जवामनजात्यन्धक्लीबपीडार्तरोगिणाम्। व्रतचर्या भवेत्तेषां यावज्जीवमसंशयम्-विष्णु ( कुबडे, ठेंगू, जन्मांध, नपुंसक, लुले, भयंकर रोगांनीं पछाडलेले अशा पुरुषांनीं आमरण लग्नापासून अलिप्त राहावें अशी आज्ञा आहे. ) नवऱ्या मुलांतील दुर्गुण दाखवितांना 'उन्मतः पतितः क्लीबो दुर्भगस्त्यक्तबांधवाः। कन्यादोषौ च यौ पूर्वो एष दोषगणो वरे ॥ नारद ( वेडा, ज्ञातिभ्रष्ट, नपूंसक, कपाळकरंटा, बांधवांनीं टाकलेला व वधूचे पहिले दोन दोष जुनाट अगर वाईट रोग व शरीरांत व्यंग हे वरांतील दोष होत. ) आणि त्याच अर्थाचे कात्यायनाचें वचन आहे. 'उन्मतः पतितः कुष्ठी षंढश्च वा सगोत्रजः। चक्षुःश्रोत्रविहीनश्च तथापस्मारदूषितः ( वेड, पतितत्व, कोड नपूंसकत्व, सगोत्रजत्व, अंधत्व अगर बधिरत्व, व अपस्मार येणें. ) असा गुणहीन अगर दुर्गुणी पती मिळाला तरी त्या पतीला सोडून जाण्याचा अगर दुसरें लग्न करण्याऱ्या स्त्रियांना शास्त्रानें अधिकार दिलेला दिसतो. ''स तु यदन्यजातीयः पतितः क्लीब एव वा। विकर्मस्थ सगोत्रो वा दासो दीर्घामयोपिवा ॥ ऊढापि देयासाऽन्यस्मै सप्रावरभूषणा ॥ कात्यायन ( वर जर दुसऱ्या जातीचा असेल, पतित असेल, क्लीब, कुकर्मा, सगोत्री, दास, असाध्यरोगी अशा पतीशीं कन्येचें लग्न झालेलें असलें तरी तिचें ( पुनः ) दुसऱ्याशीं लग्न करून द्यावें. ) त्याचप्रमाणें वशिष्ठाचें वचन आहे. 'कुलशीलविहीनस्य षण्ढादि पतितस्य च। अपस्मारि विधर्मस्य रोगिणां वेशधारिणाम्। दत्तामपि हरेत् कन्यां सगोत्राढां तथैव च ॥'' ( कुलहीन, शीलहीन, षंढ, पतित, अपस्मारी, कुकर्मी रोगी, ढोंगी अशा वरास कन्या दिलेली असली तरी सगोत्रीं विवाह झाल्याप्रमाणें तिचें हरण करावें आणि तिला दुसऱ्या पतीस द्यावी ) दुर्गुणी पतीस सोडून जाण्याचा अधिकार होता, इतकेंच नव्हे तर नवऱ्यानें टाकून दिलेल्या स्त्रीसहि दुसरें लग्न करितां येत होतें. 'या पत्या वा परित्यक्ता विधवा वास्वयेच्छया। उत्पादयेत् पुनर्भूत्वा स पौनर्भव उच्यते ॥ , मनु. ९-१७४ पतीनें टाकलेली अथवा विधवा स्त्री मर्जीप्रमाणें दुसऱ्या पुरुषाची भार्या होऊन पुत्रास जन्म देते तो पौनर्भव होय. )

पूर्वींच्या काळीं वधूवर उभयतां प्रौढ ह्मणजे वय पंधराच्या पुढें असत; त्यामुळें जरी वडिलांनीं कन्यादान केलें तरी खरें लग्न प्रौढवयांतच उभयतांचे होत असे, 'असें न्या. मू. सदाशिव अय्यर यांनीं सतिरज्जू वि० व्यंकटस्वामी ४० मद्रास ९२९ वर म्हटलें आहे. प्रौढविवाहच त्या काळीं रूढ होते याबद्दल भारताचार्य रा. ब. चिंतामणराव यांचेहि मत स्पष्ट आहे. अशा अनेक स्त्रियांच्या वर्णनावरून असें स्पष्ट दिसतें कीं, पूर्वकाळीं लग्नांत स्त्रिया पूर्ण वयांत आलेल्या असत. विवाहकालीं वधू प्रौढ असून विवाहाच्या रात्रींच पतिपत्नीसमागम झाल्याचें वर्णन आहे. निबंधकारांनीं घेतलेला महाभारताचा पाठ 'त्रिंशद्वर्षो वहेत् कन्यां हृद्यां षोडशवार्षिकीम्' ( तीस वर्षांच्या वयाच्या पुरुषानें हृदयास आनंद देणारी सोळा वर्षांची कन्या करावी. ) याशिवाय महाभारतांतील दुसरें एक वचन येथें विचारांत घेण्यासारखें आहे 'वयस्थां च महाप्राज्ञ कन्यामावोढुमर्हसि' वयांत आलेल्या मुलीशीं अर्थात् तरुण कन्येशीं विवाह करणें आयुष्यकर आहे. यांत वयः याचा अर्थ पणांत आलेली असा घेणें आहे-'वयस्थस्तरुणोयुवा' पूर्वकालीं महाभारतकालापर्यंत लहानपणीं विवाह मुलींचे होत नव्हते. बहुधा पुरुषांचे एकवीसपासून तीस वर्षेपर्यंत व स्त्रियांचें पंधरासोळा वर्षांचे सुमारास विवाह होत असत.

( श्रीमहाभारत उपसंहार पृ २०९ ) चांगलें समजूं लागल्यावर, तारुण्यांत आल्यावर उपवर मुलींची पूर्वी लग्नें होत, तसेंच त्यांना स्वतः वरपसंतीची मोकळीक असे, आणि वडिलांच्यावर योग्य पतीची निवड करण्याची जबाबदारी टाकलेली असतांहि दुर्गुणी, आणि त्याज्य पतीला सोडून दुसरें लग्न करण्याचा तिचा पूर्वीच्या काळचा विस्तृत हक्क लक्षांत घेतला ह्मणजे अर्भकावस्थेंत पालकांनीं लाविलेलें लग्न वाटेल तशा दुर्गुणी पतीशीं असो तें वज्रलेप आणि अभंग होय असें प्रतिपादन करणाऱ्या आजच्या कायद्याचा निष्ठुरपणा पाहून विस्मय वाटतो. अर्भकावस्थेंतून ती बाहेर पडण्याच्या अगोदरच तिच्याकरितां ठरवून टाकलेल्या पतीशीं मग तो कसाहि असो तिनें संसार केला पाहिजे व पाहिजे तर तिनें आपल्या वैयक्तिक सौख्यावर निखारा ठेवण्यास तयार व्हावें, परंतु गळफांसाप्रमाणें भासणारी लग्नगांठ सैल व्हावयाची नाहीं असें फर्मावणारा हल्लीचा कायदा आणि त्याच्या सुखदुःखाची मोजदाद घेऊन त्यांना पुनर्लग्नाचेहि हक्क देणारा मूळचा कायदा यांत अर्थात् 'जुनें तें सोनें, ह्मणून श्रुतिस्मृतींचा अभिप्रायच श्रेयस्कर असा ह्मणावा लागेल. हल्लींच्या कलियुगांत ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' वेदवाक्य होऊन बसलें आणि त्याच तत्त्वाबरोबरची स्त्रियांची स्वतंत्रता मात्र नष्ट झाली असें कांहीं चमत्कारिक झालें आहे.

तेव्हां मुलींना स्वतःची वरपसंती करण्याचा हक्क असणें अत्यंत जरूर आहे. अप्रौढ अशा वधूवरांचीं लग्नें करण्याचा रिवाज आपल्यांत आज फार दिवस आणि विस्तृत प्रमाणांत प्रचलित आहे. आणि कायद्यानेंहि आज प्रत्येक विवाह हा ब्राह्मपद्धतीनें झालेला असला पाहिजे असा जो निर्बंध घातलेला आहे तो कायम ठेवण्यासहि हरकत नाहीं. ब्राह्मविवाहांत पित्यानें कन्येचें अनुरूप वरास दान द्यावयाचें अशी मध्यवर्ति कल्पना असून कन्येची खुषी अगर नाखुषी यांची मोजदाद दानविधी करण्यांत येत नसल्यानें अर्भकांचेंहि विवाह लावून टाकण्याची मोकळीक हिंदु मातापितरांना अगर त्यांच्या पालकांना मिळते. ती सत्ताहि अबाधित ठेवण्यास हरकत नाहीं, कारण सर्वसाधारणतः मुलीचा बाप तिच्या भावी सौख्याची जबाबदारी ओळखून योग्य ती निवड करतोच. परंतु अज्ञातदोषी अगर व्यक्तदोषी असा पति जर निवडला गेला, आणि त्याच्याशीं अज्ञानावस्थेंत विवाह झाला तर उभयतां वधूवरांस लग्न टाळण्याचा हक्क असावा. आज वरास हक्क दिलेला नसतांहि पत्नीत्याग करून दुसरी भार्या करण्याचा अधिकार असल्यानें लग्न मोडण्याच्या हक्काचा अभाव त्याला भासतच नाहीं. मात्र वधूस तसा हक्क नसल्यानें तिनें आमरण दुःखी रहावें असा प्रकार होतो. इंग्लंडमधील कायद्यानें सज्ञान होण्याची इयत्ता एकवीस वर्षांची जरी ठेविली असली तरी लग्नाला संमति देण्याचें वधूवरांचें वय अनुक्रमें चवदा आणि बारा ठेविलेलें असून त्या वयापूर्वी लग्न झालें असल्यास वयांत येतांच वधूवरांना काडीमोड करतां येते. शिक्षण आणि संस्कृतिनें मागासलेल्या मुसलमानांच्यांत पंधरा वर्षें वयाच्या वधूवरास लग्न करितां येतें आणि अर्भकावस्थेंतहि पिता अगर पालक यांना लग्नाचा करार करण्याचा अधिकार असला तरी खुद्द बापानें अगर त्याच्या वडिलांनीं लग्नाचा करार केलेला नसेल त्यावेळीं पतिपत्नीसमागम होण्याच्या अगोदर उभयतां वधूवरांस लग्न मोडून टाकण्याचा हक्क अगर सवलत दिलेली आहे. पारसी मॅरेज ॲण्ड डायव्होर्स ॲक्टमध्यें उभयतां वधूवरांचें लग्नाला संमति देण्याचें वय एकवीस वर्षांचें ठरविलेलें असून त्या वयाच्या आंतील वधूवरांच्या तर्फेनें लग्नाचा करार करण्याचा आणि संमति देण्याचा अधिकार पालकास दिलेला आहे. ( क. २७ ) लग्नसंस्काराच्या वेळीं उभयतांपैकीं कोणी वेडानें ग्रासलेलें असेल अगर पतिपत्नीसमागम होणें वस्तुतः अशक्य असेल तर उभयतांपैकीं कोणासहि लग्न रद्द करून घेतां येतें ( क. २८ ) तेव्हां लग्नाबद्दलची अशी सूचना करणें जरूर आहे कीं

**( २ ) लग्नास उभयतां वधूवरांची संमति असणें जरूर असावें. आणि संमति देण्यासाठीं उभयतां स्त्रीपुरुष सोळा वर्षांनंतर लायक ह्मणून समजावेत. त्यापेक्षां खालच्या वयाच्या वधूवरांतर्फेनें त्यांचे आई आणि बाप अगर पालक हे संमति देण्यास समर्थ आहेत. मात्र अज्ञानावस्थेंत झालेला विवाह पतिपत्नीसमागम होण्यापूर्वी कांहीं कांहीं कारणामुळें रद्द करण्याचा उभयतांना हक्क असावा.**

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें सोळा वर्षांखालचे स्त्रीपुरुष अज्ञान होत अज्ञानांचा जर लग्नसंबंध त्यांच्या पालकांनीं

केलेला असला तर तो लग्नसंबंध टाळण्याचा त्यांना हक्क असला पाहिजे आणि असा हक्क मुलींनां द्यावा अशी एक महत्त्वाची सूचना तिच्या वैयक्तिक हक्कांबद्दल करणें जरूर आहे. मात्र हा हक्क पतिपत्नीसमागम होण्यापूर्वी अमलांत आणल्यासच कायम समजावा, अशी त्याला पुस्ती जोडणें जरूर वाटतें आणि त्याचें कारण पुढें विस्तारानें दाखविणार आहोंत. तिच्या लग्नासंबंधानें तिच्या पित्याला जी अनियंत्रित सत्ता आहे, त्यामुळें जरी कित्येकवेळीं पैशाच्या लोभानें मुलीला अयोग्य स्थळीं देऊन टाकणाऱ्या बापावर कसलेंच नियंत्रण रहात नाहीं तथापि एकंदर सर्व साधारणपणें असें ह्मणतां येईल कीं पित्याला दिलेल्या या अधिकाराचा दुरुपयोग होण्याच्या आड त्याचें अपत्यप्रेम बहुतेक वेळीं आल्याशिवाय रहाणार नाहीं. आणि वात्सल्यापुढें लोभास बहुतेकवेळीं हार खावी लागेल. मात्र मुलीच्या बापाच्या अभावीं कन्या देण्याचा हक्क प्रथम तिचा आजा, नंतर भाऊ, नंतर बापाच्या कुलांतील पुरुषांचा, व त्यानंतर मातेचा असा अनुक्रम शास्त्रानें घालून दिलेला आहे. यावरून असें दिसून येईल कीं जन्मदात्या आईला मुलीच्या लग्नाच्या संबंधांत अगदीं किमान हक्क दिलेला आहे. याचा परिणाम बहुतेकवेळीं असा पहाण्यास सांपडतो कीं मुलीचे चुलते अगर इतर अधिकारी नातेवाईक मुलीला वाटेल त्या स्थळीं लोभानें देऊन टाकतात. आपल्या पोटच्या गोळ्याच्या भावी सुखदुःखांच्या गोष्टींत, आणि ज्यावर तिचें सर्व आयुष्य अवलंबून आहे अशा विवाहकार्यी मातेला पित्याच्या तोडीचा हक्क असला पाहिजे. त्याऐवजीं तिला शेवटचा हक्क दिलेला आहे. लग्नाचें निश्चित झाल्यावर लग्न होण्याचा प्रकार आपल्या शास्त्रार्थानें इतका झपाट्यानें करितां येतो कीं कोर्टाची मदत घेणें अशक्य असतें; शिवाय स्त्रियांची सध्यांची विपन्नावस्था पहातां तसें करणेंहि दुरापास्तच असतें. कोर्टांतच प्रकरण गेलें तर अलीकडच्या कायद्याच्या ठरावाप्रमाणें मातेचा हक्क जवळचा मानला जातो ( आच्छा रंगनाईकाम्मल वि. आछा रामानुज ३५ म. ७२८ ) आणि मुलीच्या मातेच्या सल्ल्यानेंच वरपसंती मुलीच्या चुलत्यास करितां येईल. ( बाई रामकुंवर वि० जमनादास मुळचंद ३७ मुं. १८ ) तथापि एकवार लग्न झालें ह्मणजे तें वज्रलेप होय, आणि मुलीचें लग्न करण्याचा ज्याला कायद्याप्रमाणें अधिकार नाहीं, अशानें तिचें लग्न केलेलें असलें तरी तें रद्द होऊं शकत नाहीं. कारण शास्त्रानें ठरविलेला क्रम हा आज्ञार्थी नसून ऐच्छिक आहे असें ठरविण्यांत आलेलें आहे ( मुळचंद वि० भुदीया २२ मुं. ८१२; खुशालचंद वि० बाई मणी ११ मुं. २४७; गाझी वि० सकरू १९ अ. ५१५; वगैरे ). खुद्द कोर्टाच्या हुकमाची अमान्यता करूनहि लग्न जरी घडवून आणिलें असलें तरी पण तें लग्न वज्रलेप म्हणून कोर्टानें ठरविलें आहे. ( बाई दिवाळी वि० बाई मोती २२ मुंबई ५०९ ). सर गुरुदास बानर्जी यांच्या मतानें पालकाच्या संमतीवाचून होणारें लग्न रद्दबातल ठरलें पाहिजे. ( अंजनदासी वि० प्रल्हादचंद्र घोस १४ वी० रि० ४०३ ) या ठरावांत कपटानें, बळजबरीनें आणि पालकाच्या संमतीवाचून घडवून आणिलेलें लग्न बेकायदेशीर ठरविण्याची सत्ता कोर्टास असल्याचें जें प्रतिपादन करण्यांत आलेलें आहे तें शास्त्रसंमत आहे. विवाहसंस्कारांत वराची पसंती ही मुख्य असून लग्नविधी त्याच्या मानानें गौण आहे. तसेंच कन्येचें दान करावयाचें झटलें ह्मणजे ज्या पालकाच्या ताब्यांत अगर हुकमतीखालीं ती आहे त्याची संमति असणें जरूर आहे, असें बानर्जी यांचें मत असून मनुस्मृती ५-१५२ ' मंगलार्थं स्वस्त्ययनं यज्ञश्चासां प्रजापतेः । प्रयुज्यते विवाहेषु प्रदानं स्वाम्यकारणम् ॥ ( स्त्रियांनां स्वस्त्ययन ह्मणजे शांतिमंत्राचें पठन, आणि प्रजापतीच्या उद्देशानें आज्य होमरूप जो प्रजापतियाग विवाहामध्यें होतो, त्यांच्या मंगलार्थ आहे. आणि जें प्रथम वाग्दानरूप तो दान त्यानेंच स्त्रीवर तिच्या भर्त्याचें स्वामित्व उत्पन्न होतें. ) तेव्हां मुलीच्या लग्नाच्या बाबतींत तिच्या आईची संमति अवश्य असली पाहिजे आणि तशी संमति नसेल तर मुलीच्या मर्जीनुरूप तें टाळतां आलें पाहिजे. अशी सुधारणा होणें जरूर आहे.

## लग्नसंस्कार.

ओघानें लग्न झाल्यानंतरच्या स्त्रियांच्या हक्कांबद्दलचा विचार येथेंच केल्यास विषयविवेचनाच्या दृष्टीनें सोपें जाईल असें वाटतें. हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें लग्न हा एक मोठा आणि महत्त्वाचा संस्कार आहे. हिंदु लोकांच्यांत या संस्कारास जितकें महत्त्व दिलेलें आहे तितकें इतरत्र दिसून येत नाहीं असें स्ट्रेंज साहेबांचेंहि मत आहे. पुरुषांच्या दहा संस्कारांतला हा जरी अत्यंत महत्त्वाचा मानला तरी स्त्रियांना हाच कायतो संस्कार असल्यामुळें स्त्रियांच्या दृष्टीनें त्याचें महत्त्व जास्त आहे; 'वैवाहिको विधिः स्त्रीणां संस्कारो वैदिकः स्मृतः। ( मनु २–६७. विवाहविधी हाच स्त्रियांचा वैदिक संस्कार असें स्मृतींत सांगितलें आहे. ) वैदिक संस्कार या दृष्टीनें त्याचें काय महत्त्व असेल तें असो परंतु स्त्रियांच्या उत्कर्षाचें कारक आणि मारक म्हणून लग्नाचें महत्त्व फार आहे. एकवार लग्न झालें म्हणजे जी काय बरी वाईट परिस्थिति स्त्रियांच्या भोंवतीं लग्नाच्या वेळीं असते त्या परिस्थितींतच त्यांना कायमचें रहावें लागतें. परिस्थिति प्रतिकूल असली, अयोग्य वराशीं लग्नसंबंध झाला, तर अत्यंत कर्तबगार स्त्रीची हुशारी धुळीस मिळते आणि तशा स्थितींत तिला आमरण पिचत पडून रहावें लागतें. आणि या सर्वाचें कारण म्हणजे विवाहाचें अभंगत्व होय. वर आपण पाहिलेंच आहे कीं, पूर्वीच्या काळीं लग्नविधि हा अभेद्य असा सरसहा मानण्यांत येत नव्हता, परंतु त्यालाहि कांहीं अपवाद राखून ठेविलेले होते. अपवादांनीं नियमास बळकटी येते ही अपवादांची योग्य किंमत न समजणाऱ्यांकडून नियमास बळकटी आणण्यासाठीं जरी हे अपवाद छाटून टाकण्यांत आले असले तर त्यामुळें मूळच्या नियमाला अव्यवहार्य आणि निष्ठुर असा समजण्यांत येईल ही कल्पना त्यांना नसावी याबद्दल नवल वाटतें. असो. लग्न झाल्याबरोबर स्त्रीचा माहेरच्या घरांतील सर्व हक्कसंबंध नष्ट होऊन तिचें सर्व भवितव्य सासरच्या कुटुंबाशीं एकजीव होतें. 'पाणिग्रहणिका मन्त्रा पितृगोत्रापहारकाः ॥ चतुर्थीहोममन्त्रेणत्वमांसहृदयेन्द्रियैः । भर्त्रा संयुज्यते पत्नी तद्गोत्रा तेन सा भवेत' ॥ बृहस्पति ' ( लग्नाच्या मंत्रांनीं कन्येचा पितृगोत्राचा संबंध सुटतो. चतुर्थी होमाच्या मंत्रानें पत्नी मांस हृदय इन्द्रियांनीं पतीशीं जोडली जाते आणि त्याचें गोत्र तेंच तिचें गोत्र होतें ). लग्नानंतर तिच्यावर नवऱ्याची अगर त्याच्या नातलगांची सत्ता उत्पन्न होते. आणि तिचा पालक पती होत असल्यानें ती कितीहि वयानें लहान असली तरी लग्नाच्या मित्तीपासून तिनें त्याच्या घरीं राहिलें पाहिजे असें म्हणण्याचा हक्क तिच्या नवऱ्यास आहे ( धरणीधर घोष १७ क २२८: अरुमुग मुदली वि. वीरराघव मुदली २४ मद्रा. २२५ ) आणि स्वतः तिचा नवराहि अज्ञान असल्यास त्याचे पालक हे त्याच्या पत्नीचेहि पालक होतात व अर्थात् तिला सासरी ठेवून घेण्यास त्यांना अधिकार आहे. हा जो विशेष हक्क कायद्यानें पतीस अगर पतीच्या नातलगास दिलेला आहे तोहि मर्यादित केला पाहिजे, कारण लग्नसंस्कार तिच्या अनुमतीनें केलेला नसल्यास ती वयांत येतांच आणि समागम होण्यापूर्वी तिला तें लग्न रद्द करण्याचा हक्क देणें जरूर आहे असें मानिलें तर अर्थात् तिच्या शरीरावर पतीचा अगर त्याच्या नातलगांचा अधिकार चालता कामा नये. कारण लग्न झाल्यापासून जर मुलीला सासरी ठेऊन घेतले तर तिची नापसंती तरी दाखविण्याचे तिच्या हातून केव्हां आणि कसें होईल. म्हणून वैयक्तिक हक्कांबद्दल असेंहि सुचवावेसें वाटतें कीं,

**( ३ ) अज्ञान अवस्थेंत पत्नीला नवऱ्याच्या घरीं रहाण्यास नवऱ्यास अगर त्याच्या पालकांस भाग पाडतां येऊं नये.**

तिला लग्न रद्द करण्यास जरूर ती स्वतंत्रता देण्याच्या उद्देशानें जरी ही सूचना करण्यांत येत असली तरी तिच्या शरीराची योग्य ती सुरक्षिततताहि या योजनेंत साधण्यासारखी आहे. संमतीबिलाचें कारण उरणार नाहीं. अज्ञान पत्नीच्या शरीराचे योग्य तें रक्षण आपोआप होईल. वयांत येण्याचे वय अर्थात् कालमानाप्रमाणें ठरविणें आहे. वरील प्रकारची मोकळीक ठेविल्यानें ज्यावेळीं जरूर असेल त्यावेळीं पत्नी सासरीहि राहूं शकेल. उदाहरणार्थ माहेरच्या मंडळींची परिस्थिति गरीबीची असेल अगर पत्नी स्वतः निराधार असेल अशा वेळीं तिच्या मर्जीप्रमाणें तिनें सासरीं राहिलें तरी चालेल. अशी मोकळीकहि वरील सुचनेंत दिलेली आहे. कटाक्ष कायतो फक्त अज्ञान वधूस स्वताच्या घरींच राहिलें पाहिजे असें म्हणण्याचा नवऱ्यास जो हक्क आहे तो मर्यादित केला पाहिजे. या गोष्टींकडे आहे.

एकंदरींत अज्ञानावस्थेंत मुलीचें झालेलें लग्न तिचा पतीसमवेत समागम होण्यापूर्वी कांहीं कांहीं कारणां-करितां तिच्या मर्जीनुरूप रद्द करून घेण्याचा हक्क असणें जरूर आहे. व त्याकरितां अशी सूचना करणें जरूर वाटतें कीं,

**( ४ ) अज्ञानावस्थेंत झालेलें लग्न ती वयांत येतांच आणि पतिपत्नीसमागम होण्याच्या अगोदर पत्नीच्या मर्जीनुरूप खालील कारणांवरून रद्द करून घेण्याचा तिला अधिकार असावा. आणि असें लग्न झाल्यास तिला पुनः लग्न करण्याचा हक्क असावा.**

**( अ ) उभयतां पतिपत्नी यांच्या वयांतील अंतर पंधरा वर्षांपेक्षां जास्त असेल,**

**( आ ) पती वेडा असेल, असाध्य रोगानें पीडित असेल अगर व्यंगांनीं युक्त असेल,**

**( इ ) आईबाप व त्या उभयतांच्या अभावीं पालक यांच्या संमतीवांचून लग्न झालें असेल,**

**( ई ) लग्नाच्या एकंदर व्यवहारांत कपट, दगलबाजी अगर बळजबरी झालेली असेल; कपट यांत वराची जात, वय, ऐपत याज-विषयीं केलेलें असत्य विधान कीं ज्याच्यावर विश्वास ठेवूनच केवळ लग्नसंबंध घडून आला अशा गोष्टींचाहि समावेश होतो; बळजबरी, दगलबाजी यांत मुलीच्या आई-बापाची अगर पालकाची संमती मिळ-विण्यांत लग्न घडवून आणण्यांत गैरवाजवी दाब वापरणें लांचलुचपत देणें अगर अशीं दुसरीं कृत्यें करणें यांचा समावेश होतो.**

**( उ ) आईबाप यांच्याशिवाय इतरांनीं लग्न लाविलें असेल तर त्यांत योग्य वराची निवड झाली नसेल आणि कांहीं दगलबाजी लांचलुचपत असेल तर,**

## घटस्फोट व फारकत

वैवाहिक हक्काबद्दलचा विचार करण्याचा अगोदर घटस्फोट आणि फारकत यांतला फरक जाणणें जरूर आहे. घटस्फोट ह्मणजे ज्याला इंग्रजींत Divorce ह्मणून ह्मणतात तो. त्यांत स्त्रीपुरुषांचा विवाह रद्द होऊन त्यांनां पुनर्लग्न करण्याची मुभा असते. परंतु फारकत ...जे ज्याला इंग्रजींत Judicial separation ह्मणून ...तात त्या योगानें स्त्रीपुरुषांच्यांतील वैवाहिक संबंध ...न होता त्यांनां परस्परांपासून वेगळें राहतां येतें ...शी फारकत मिळाली ह्मणजे एकास दुसऱ्याच्या ...यांत ज्याप्रमाणें रहाण्यास भाग पाडतां येत नाहीं, ...च लग्नाची जबाबदारी पुरी करण्याचा हक्कहि ...लांत आणिता येत नाहीं. फारकत मिळाल्या... ही त्या पुरुषाची कायद्याप्रमाणें पत्नी ह्मणून रहाते ...तिला अन्नवस्त्र देण्यास तो जबाबदार आहे. फार-...त मिळाली ह्मणजे लग्नसंबंध नष्ट होत नसल्यामुळें ...मान्य कायद्याप्रमाणें दुसरें लग्न करण्याची जर ...पैकीं कोणास मोकळीक असली तर तसें लग्न कर-...ास प्रत्यवाय नसतो, मात्र तसें लग्न करण्याची ...वानगी सामान्य कायद्यान्वयें नसेल तर दुसरें लग्न ...रितां येत नाहीं. घटस्फोटाच्या मानानें फारकतींत ...नावाची तीव्रता कमी असते आणि त्याचें कारण ...णजे फारकती मिळविल्यानंतर पतिपत्नी यांनां ...कीनें दरेकाच्या मर्जीविरुद्ध एकत्र रहाण्यास भाग ...डतां येत नसले तथापि उभयतांनीं सामोपचारानें ...कत्र रहाण्याचें ठरविल्यास, अगर समेट केल्यास ...ांनां पुनः पतिपत्नी म्हणून रहातां येतें. तसें ...टस्फोटाचें नसतें. घटस्फोटानंतर पूर्वीचें नवराबाय-...चें नातें नष्ट होत असल्याकारणानें त्या नात्याच्या ...ाधारावर पुनः त्यांस एकत्र रहातां येत नाहीं. ...कत्र रहाण्याची अगर पुनः संसार करण्याची ...भयतांची इच्छा असल्यास कायद्याप्रमाणें त्यांनां ...नः लग्न करावें लागतें. घटस्फोट हा फार-...तीच्या मानानें जास्त जालीम उपाय असून वैवाहिक ...बंधाच्या आड येणाऱ्या व कालांतरानेंहि दुरुस्त न ...ोणाऱ्या अडचणी अगर आपत्ति उत्पन्न झाल्या ...नसतां तो अमलांत येतो तर कालांतरानें दूर होणाऱ्या ...गर क्षणिक व क्षुल्लक अडचणी उपस्थित झाल्यास ...ारकतीचा उपाय अमलांत आणण्याची मोकळीक ...ायद्यानें सर्व साधारण ठेविली आहे. वैवाहिक संबंध ...डून येण्यासच कायदेशीर अडथळे, उभयतां वधूव-...ांत वैवाहिक संबंध पुरे करण्यास जरूर त्या गुणांचा ...भाव, अगर पुनः एकत्र संसार करणें अशक्य ...ोटींतलें होईल असले निर्वाणीचे प्रकार, यांची ...ोजदाद घेऊन घटस्फोटानें उभयतां वधूवरास विवाह ...धनांतून मुक्त करण्यांत येतें. उदाहरणार्थ, सपिंड

सगोत्र विवाह, वेड, क्लीबत्व अगर धर्मांतर, या कारणांनीं उभयतांचा कायमचाच संबंध तोडून टाकण्यांतच हितकर आहे. त्याच्या उलट जीं कारणें क्षुल्लक, क्षणिक अशी आहेत व जीं कालांतरानें नष्ट होतील अशी आशा करणें वाजवी होणार आहे. अशीं कारणें उपस्थित झाली म्हणजे उभयतां स्त्रीपुरुषांस कांहीं वेळ निरनिराळे ठेविल्यानें त्यांच्या मनांतील तेढ कमी होत जाऊन पुनर्मीलन घडणें शक्य होतें, व पुनः तीं संसार करूं लागतात. अशा कारणांकरितां फारकत देण्याचा रिवाज आहे. याचें ठळक उदाहरण म्हणजे जीव धोक्यांत येईल अशा प्रकारची उभयतामधील मारझोड होय. बेबनावाचें कारण कायमचें टिकणारें नसून कालांतरानें नाहींसें होणारें असल्यानें दोन भांडणाऱ्या मुलांना दोन बाजूस सारून त्याच्यांत पुनः स्नेहभाव उत्पन्न होण्याची संधि वडील मंडळी ज्याप्रमाणें आणून देतात तद्वतच उभयतांचें पटेनासें झालें म्हणजे वैरभाव विसरून जाण्यापुरतें त्यांना कांहींवेळ वेगवेगळे ठेवण्याचें कार्य फारकतीच्या योगानें होत असलें तरी त्यांनीं पुनः एकत्र संसार करावा अशी मोकळीक ठेवल्यानें कायद्यास त्यांचे पुनर्मीलन इष्ट वाटतें हें उघड आहे.

स्त्रीपुरुषांना विवाहबंधनांनीं एकत्र निगडीत करून ठेवणें हें जितकें समाज रचनेच्या दृष्टीनें अवश्य आहे तितक्याच प्रमाणांत कांहीं कांहीं कारणामुळें विवाहबंधनें सैल करून उभयतांना कित्येक प्रसंगीं ज्याच्या त्याच्या जबाबदाऱ्यांतून मुक्त करणेंहि आवश्यक असतें. विवाहबंधनें तोडून टाकण्यास योग्य अशीं कारणें मोजकीं, थोडी आणि वैवाहिक हितसंबधाच्या दृष्टीनें अत्यंत निव्हाळ्याची अशीं असतांहि घटस्फोट नको असें म्हणणें अन्यायाचें होईल. पुरुषांना अनेक स्त्रिया करण्याचा अधिकार हिंदुधर्मशास्त्रानें दिलेला आहे तेंव्हां घटस्फोटाच्या आभावाची त्यांना जाणीवच भासत नाहीं. मात्र एकपत्नीकत्व पुरुषाच्यावर लादण्यांत आल्यावरहि घटस्फोटाचा कायदा नको असें म्हणणारे किती निघतील? न्याय्य सरळ उत्तर देण्यांत परदुःखाबद्दल वाटणाऱ्या सहानुभूतीचीच कायती जरूरी आहे. आणि समाजव्यवस्था सुसंघटित रहावी यासाठीं एकवार झालेलें लग्न कालत्रयीं रद्द करितां येणार नाहीं असा अट्टाहास धरणाऱ्या फाजिल तत्त्वनिष्ठ लोकांना उत्तर द्यावयाचेंच तर तें इतकेंच देतां येईल कीं घटस्फोटाचा कायदा अमलांत आणिल्यासच समाजाचें सौष्ठव कायम राहिल. केवळ अपवाद म्हणून भासणारीं दुर्दैवीं मनुष्यें अभेद्य वैवाहिक बंधनाच्या फासावर आमरण लटकत असून ऐहिक सुखाच्या केवळ दर्शनाकरितां धापा टाकीत असतांहि त्यांच्या गळ्याभोंवतीं करकचून बसलेला हा यमपाश जर कांहीं कांहीं कारणाकरितां सैल करितां आला नाहीं तर प्राणिमात्राचें हित साधण्याकरितां धर्माचें अस्तित्व आहे ही उक्ती दर्पोक्तीच नव्हे तर काय? प्राणिमात्राचें ऐहिक सुख आणि पारलौकिक हित साधण्याचें कार्य धर्मानें माथ्यावर घेतल्यावर अर्थात् अपवादात्मक भासणाऱ्या प्रकारांतूनहि कांहीं मार्ग काढिला पाहिजे. घटस्फोट ज्या कायद्यांत नाहीं असा एकहि कायदा सध्यां हिंदुधर्मशास्त्राव्यतिरिक्त प्रचारांत नाहीं. आणि हिंदु धर्मशास्त्रांतहि हा प्रथम रूढ होता असें दिसतें.

## पुनर्लग्न, घटस्फोट आणि फारकत

हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें लग्न हा एक अभंग असा संस्कार आहे. झालेलें लग्न त्रिकालाबाधित असून ते कधींहि आणि कोणत्याहि कारणांनीं रद्द होऊं शकत नाहीं; असा सध्यांच्या कायद्याचा नियम असला तरी स्मृतिकालीं पुनर्विवाह अमलांत असावा असें दिसतें. व असाच अभिप्राय बऱ्याच ग्रंथकारांचा आहे. स्त्रियांच्या पावित्र्याबद्दलच्या कल्पनांनीं पुनर्विवाहाची चाल हळु हळू बंद पडली हें खरें. पुराणांतरींहि नलराजा बेपत्ता झाल्यामुळें दमयंतीनें पुनः स्वयंवर मांडिलें असा दाखला आहे आणि त्या तिच्या करण्यास आधारहि स्मृतींत सांपडण्यासारखा आहे. विवाहाचें अंतीम कार्य म्हणजे स्त्रीपुरुषांचे ऐहिक आणि पारलौकिक हित साधावयाचें असें आहे. इतर धर्मीयांच्या दृष्टीनें लग्नविधि म्हणजे केवळ करार होय. पण हिंदूच्या दृष्टीनें लग्न संस्कार हा कराराच्या पेक्षां हरएक प्रकारें श्रेष्ठ असा गणला गेलेला आहे. त्याच दृष्टीनें पाहतां हिंदुधर्मशास्त्रांत काडीमोड अगर घटस्फोट पूर्वी रूढ होता असें दिसून येतें. आणि घटस्फोट म्हणून जरी पूर्वीचें लग्न मोडण्याचा विधि प्राचीनकाळीं प्राधान्येंकरून अंमलांत होता असें दिसत नसलें तरी पुनर्विवाह मात्र सररहा रूढ होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. अपात्र अशा वराला कन्या दिलेली असली तरी ती परत घ्यावी व सत्पात्र वरास द्यावी असा कन्येच्या बापाचा हक्क

.न केलेला आढळून येतो. ' कुलशीलविहीनस्य षंढादि पतितस्य च । अपस्मारी विधर्मस्य रोगिणां वेशधारिणाम् ॥ दत्तामपि हरेत् कन्यां सगोत्राढां तथैव च ।" वशिष्ट ( कुलहीन, शीलहीन, नपुंसक, पतित, अपस्मारी, पापी, रोगी, बैरागी अगर सगोत्र अशा वराशीं जर कन्येचा विवाह झालेला असेल तर तिचें हरण करावें व दुसऱ्या वरास तिला द्यावें ). उन्मत्तः पतितः कुष्ठी षण्डश्च वा सगोत्रजः । चक्षुःश्रोत्रविहीनस्य तथापस्मारदूषितः॥ वरदोषाः स्मृता ह्येते कन्यादोषाः प्रकीर्तिताः । स तु यदन्यजातीयः पतितः क्लीब एव वा । विकर्मस्थ सगोत्रो वा दासो दीर्घामयोपि वा । ऊढापि देया साऽन्यस्मै सप्रावरणभूषणा ॥ कात्यायन—(वेडा, पतित, कोड फुटलेला, नपुंसक एक गोत्राचा, आंधळा, बहिरा, अपस्मारी, असणें हे वरांतले दोष होत, कन्येचे दोष पूर्वी सांगितलेलेच आहेत. जर पती अन्य जातीचा असेल, पतित अगर पापी असेल, नपुंसक, आंधळा अगर बहिरा असेल, दास असेल, जुनाट रोगांनीं जर्जर झालेला असेल, तर तिचें लग्न झालेलें असलें तरीसुद्धां वस्त्रालंकारानें मंडित करून तिचें दुसऱ्याशीं पित्यानें लग्न करून द्यावें. ) कन्येच्या बापाचा अधिकार असा असे कीं, अपात्र वर मिळाल्यास अगर अनुरूप वर न मिळाल्यास मुलीला परत घेऊन यावयाची आणि तिचें योग्य वराबरोबर लग्न लावून टाकावयाचे. दुसरें लग्न लावण्यापूर्वीं पूर्वीचें लग्न रद्द करावें लागत नसावेंसें दिसतें. सध्यांच्या काळीं दुसरें लग्न स्त्रीपुरुषांच्या हयातीत करावयाचें असेल तर पहिलें लग्न कायद्यानें रद्द करून द्यावें लागतें. तसा कांहीं निर्बंध पूर्वीच्या काळीं असावासें दिसत नाहीं. फार काय पण दुसरा चांगला नवरा मुलगा जर आढळण्यांत आला तर त्यास तिला देऊन टाकण्याचा अधिकार पित्याला होता असें दिसतें.

' सकृत्प्रदीयते कन्या हरंस्तां चोरदण्डभाक् ।
दत्तामपि हरेत् पूर्वाच्छ्रेयांश्चेद्वर आव्रजेत् ॥'

—याज्ञवल्क्य.

( कन्यादान एकवारच होतें, आणि कन्यादानानंतर तिला घेऊन जाणारास चोर म्हणून शासन होईल. पूर्वीच्या वरापेक्षां जर अधिक गुणवान् वर आला तर कन्यादान केलेली कन्याहि परत घ्यावी.)

आतां पूर्वी कोणकोणत्या कारणावरून स्त्रियांना दुसरें लग्न करण्याचा हक्क पोहोंचत होता तें पाहूं. त्यापैकीं कांहीं उतारे वर येऊन गेलेच आहेत. ' या पत्या वा परित्यक्ता विधवा वा स्वेच्छया । उत्पादयेत् पुनर्भूत्वा स पौनर्भव उच्यते ॥ मनुः ( नवऱ्यानें टाकून दिलेली अगर विधवा अशा स्त्रीनें दुसरें लग्न आपल्या इच्छेनें केले आणि तिजला पुत्र झाला तर त्याला पुनर्विवाहाचा मुलगा म्हणावा ). उन्मत्तः पतितः क्लीबो दर्भगस्त्यक्तबांधवः। कन्यादोषौ च यौ पूर्वो एष दोषगणोवरे ॥ अज्ञात दोषेणोढा या निर्दोषानान्यमाश्रिता । बंधुभिः साभियोक्तव्या निर्बंधुः स्वयमाश्रयेत्॥ नष्टे मृते प्रव्रजिते क्लीबे च पतिते पतौ । पंचस्वापत्सु नारीणां पतिरन्यो विधीयते ॥ नारद ( वेडा, पतित, नपुसंक, कपाळकरंटा, बांधवांनीं टाकलेला, व कन्येचे दोन दोष—जुनाट वाईट रोगानें जर्जर झालेला आणि व्यंग असलेला असे हे नवऱ्यामुलांतील दोष होत. दोषरहित कन्येचा विवाह दुर्गुणी अशा नवऱ्याशीं झाला, व त्याचे दुर्गुण मागाहून समजून आले अशा स्थितींत जर तिनें होऊन परपुरुषाचा आश्रय केलेला नसेल तर तसें करण्यास तिच्या नातेवाईकानें तिला सांगावें. तिला जर कोणी नात्याचे नसले तर परपुरुषासमवेत स्वतःच्या इच्छेप्रमाणें राहण्यास जावें. पती नापत्ता झाला, वारला, संन्यासी झाला, नपुंसक असला अगर पतित झालेला असला तर अशा या पांच प्रसंगीं स्त्रियांनीं दुसरा नवरा करावा अशी अनुज्ञा आहे ). बलाच्चेत्प्रहृता कन्या मन्त्रैर्यदि न संस्कृता । अन्यस्मै विधिवद्देया यथा कन्या तथैव सा ॥ निसृष्टायां हुतेवापि यस्या भर्ता म्रियेत च । साचेदक्षतयोनिः स्याद्गतप्रत्यागता सती । पौनर्भवेन विधिना पुनः संस्कारमर्हति ॥ बौधायन ( कन्येचें बलात्कारें हरण केलेलें असेल, आणि मंत्रादिविधीनें तिचें लग्न झालेलें नसेल तर, तिचा विवाह दुसऱ्याबरोबर करून देतां येतो. कारण ती कुमारीप्रमाणेंच समजावयाची. कन्यादान झाल्यानंतर अगर होमहवन झाल्यानंतरहि जिचा नवरा वारल्यानें ती परत घरीं आली असेल अशा कन्येचा पुरुषसमागम झालेला नसल्यास पुनर्विवाहाच्या विधीनें विवाह लावावा). या वा क्लीबं पतितमुन्मत्तं वा भर्तारमुत्सृज्यान्यं पतिं विन्दत मृते वा सा पुनर्भूर्भवती ॥ वशिष्टः ( जी नपुंसक, पतित, वेडा, मृत, अशा पतीला सोडून

दुसऱ्याशीं लग्न करिते तिला पुनर्भू असें म्हणतात. ) 'नष्टः प्रव्रजितः क्लीबः पतितो राजकिल्बषी । लोकान्तरगतो वापि परित्याज्यः पतिः स्त्रिया ॥ मृते भर्तरि जीवे वा विन्देतापरं पतिम् । सन्तत्यनाशार्थतया न स्वातंत्र्यस्तु योषितः ॥ अष्टौ वर्षाण्युदीक्षेत ब्राह्मणी प्रोषितम् पतिम् । अप्रसूता च चत्वारी ततोऽन्यं समाश्रयेत् ॥ प्रजा प्रवृत्तौ नारीणां वृत्तिरेषा प्रजापतेः । अतोऽन्यगमने स्त्रीणामेष दोषो न विद्यते ॥ देवल ( बेपत्ता झालेला, बैरागी, नपूंसक, पतित, राजद्रोही अगर मेलेला अशा पतीला स्त्रीनें टाकून द्यावें, नवऱ्याच्या निधनानंतर अगर त्याच्या हयातींत स्त्रीला दुसरा पति करावयाचा असेल तर वंशक्षय न होऊं देण्याकरितां असावा. नवरा प्रवासास गेला असल्यास ब्राह्मणाच्या स्त्रीनें आठ वर्षें वाट पहावी, मूल नसलें तर चार वर्षें वाट पहावी. त्यानंतर तिनें दुसरा पति करावा. वंशवृद्धि होण्याकरितां स्त्रियांनीं हें असें वागावें अशी शास्त्राची आज्ञा असल्यानें दुसरा पति करण्यांत स्त्रियांना मुळींच पाप लागत नाहीं. ) यावरून निरनिराळ्या कारणाकरितां, आणि निमित्तावरून स्त्रियांना पहिल्या नवऱ्याच्या हयातींत दुसऱ्या पुरुषाशीं लग्न लावण्याचा अधिकार असल्याचें स्पष्ट होतें. त्याचबरोबर दुसरीहि गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे ती म्हणजे ही कीं, स्त्रीपुरुषसमागम होण्याच्या पूर्वी कन्येवर पित्याचा हक्क असे आणि ती कुमारिका म्हणूनच तिचें पुनः लग्न तिचा बाप करीत असे. 'पाणिग्रहणिका मंत्राः कन्यास्वेव प्रतिष्ठिताः । ना कन्यासु क्वचित् नृणां लुप्तधर्मः क्रियाहिताः ॥ मनु. ( लग्नसंस्काराचे मंत्र कुमारिकेस लागू पडतात. कारण ज्यांचें कौमार्य नष्ट झालें आहे अशा स्त्रियांना हे मंत्र लागू पडत नाहींत). कन्यैवाक्षतयोनिर्या पाणिग्रहणदूषिता । पुनर्भूः प्रथमा प्रोक्ता पुनः संस्कारमर्हति ॥ नारद ( लग्नसंस्काराचा केवळ दोष लागलेली परंतु अक्षतयोनि अशी कन्या पुनर्भूच होय. आणि तिचा लग्नविधि पुनः असल्या पतीबरोबर करुन देण्यास ती पात्र आहे. ) उद्वाहितापि या कन्या नयेत् सम्प्राप्तमैथुना । पुनः संस्कारमर्हति यथा कन्या तथैव सा ॥ नारद. निर्णयसिंधू ( लग्न झालेल्या कन्येचा जर पतिसमागम झालेला नसेल तर पुनः लग्नविधि करण्यास ती पात्र आहे.कारण लग्नाच्या पूर्वीप्रमाणेंच ती कुमारिका आहे.) तिचें कौमार्य नष्ट झाल्यावर पित्यानें तिचें कन्यादान करण्याचें राहत नाहीं. पाहिजे तर तिनें स्वेच्छेनें दुसरा पति करावा असा भावार्थ दिसतो. स्वेच्छेनें तिचें कौमार्य नष्ट होण्याच्या अगोदर तिचें वस्तुतः लग्न झालेलें असलें तरी ती कुमारिकाच होय ही गोष्ट येथें नमूद करण्याचें खास कारण म्हणजे अज्ञानावस्थेंत झालेलें लग्न रद्द ठरविण्याचा हक्क जो स्त्रियांना देण्यांत यावा असें आम्ही म्हणतों त्याची इयत्ता या गोष्टीवरून निश्चित होते. पतीशी तिचा समागम होण्यापूर्वी तिनें पाहिजे तर ठराविक कांहीं कारणामुळें लग्न रद्द करून घ्यावें. मात्र एकवार तिचें कौमार्य नष्ट झालें म्हणजे पसंती नापसंती दाखविण्याचा तिचा हक्क जावा, कारण स्त्रियांच्या पातिव्रत्याची आणि पावित्र्याची इतकी उदात्त कल्पना आपणांत रूढ आहे कीं, अक्षतयोनी कुमारिकांनाच कांहीं सवलत दिली पाहिजे. पतीशीं समागम झाल्यावर लग्न रद्द करण्याचा हक्क नष्ट होतो असें जर ठरविलें नाहीं, तर एकाद्या स्त्रीनें लग्न रद्द करून टाकलें तरी तिच्याशीं दुसरें लग्न लावण्यास सहसा कोणी तयार होणार नाहीं. आणि याच भीतीनें कोर्ट लग्न रद्द करण्यास होतां होईतों नाखूष असतें.

आतां आपण सध्यां प्रचलित असलेल्या कायद्यांत दरेक प्रकारच्या पतिदोषांना लग्नाच्या दृष्टीनें काय महत्त्व दिलेलें आहे तें पाहूं.

**वेडा**—वेड्यास लग्नाचा पूर्वी अधिकार नव्हता असें दिसतें. कारण लग्नसंस्कारांत त्यानें भाग घेणें जरूर असतें. कन्यादान घेण्यास तो पात्र असला पाहिजे इतकेंच नव्हे तर वैवाहिक मंत्रावरून असें असतें, कीं, लग्नसंस्कारापासून उत्पन्न होणाऱ्या जबाबदारीची त्याला नुसती कल्पना होऊन पुरें होणार नाहीं; परंतु ती जबाबदारी स्वतःच्या शिरावर घेतल्याची त्याला स्पष्ट कबुली द्यावी लागते. यावरून कायद्याप्रमाणें जो संमती देण्यास नालायक आहे अशास लग्नाचा अधिकार नसल्यास तें क्रमप्राप्तच आहे. परंतु टीकाकारांच्या मतानें वेडा, नपुसंक अगर अशा तऱ्हेच्या दोषानें युक्त अशा पतीच्या पत्नीस दुसऱ्याकडून पुत्र होण्याबद्दलची मोकळीक असल्यानें त्या संततीस इस्टेटींत भाग मिळतो. अशा संततीस कुटुंबाच्या मिळकतींत भाग मिळू शकतो असें जीमूतवाहन, मिताक्षरा, विविधचिंतामणी, व्यवहारमयूख,

स्मृतिचंद्रिका इत्यादि टीकाकारांचें मत आहे. परंतु लग्न कायदेशीर होतें कीं नाहीं, आणि लग्नसंस्काराची शिरावर घेतलेली जबाबदारी पार पाडण्याची शक्ती पतीच्या ठिकाणीं आहे कीं नाहीं याचा विचार न करितां त्यांच्या मुलास भाग मिळूं शकतो या आधारावर लग्नविधीचें समर्थन करणें होतें तें कळणें कठीण आहे. उदाहरणार्थ नपुंसकास संततीहि होणें शक्य नाहीं, व पूर्वी ज्या काळीं नियोगाची पद्धति (दुसऱ्या पुरुषाकडून स्त्रियांनीं संतति निर्माण करण्याचा मार्ग) अमलांत होती त्यावेळीं कदाचित् या नियमाचें समर्थन होण्यासारखें होतें. आज कलियुगांत नियोग वर्ज असतांहि त्या नियमाच्या आधारावर सम्मत असलेला विवाह आजहि कायदेशीर होतो ही आश्चर्याचीच गोष्ट आहे, याशिवाय जास्त काय ह्मणावें. वेड्यास इतर ऐहिक व्यवहार करण्यास अपात्र जरी धरण्यांत आला असला तरी लग्नास तो पात्र आहे आणि अशाचें लग्न कायदेशीर होय. ( दाहीचरण मित्र वि. राधाचरण मित्र २ मो० ९९: नंदलाल वि० तापिदास १ मोर्ले २८७: मधुसुदन वि० जबुदचंद्र ३. वी. री. १९४ ) मौंजीलाल वि० चंद्रावती कुमारी ३८ क. ७०० या कामांत प्रिव्ही-कौन्सिलनें वेड्याचें लग्न कायदेशीर होतें कीं नाहीं हें जरी ठरविण्याचें टाळलें तरी असे उद्गार काढले आहेत कीं, लग्न रद्द करण्यास अपात्र ठरविणारा बुद्धिनाश हा कोणत्या पायरीचा होता या प्रश्नाच्या विचारावर लग्नाचा कायदेशीरपणा अवलंबून राहील.

पूर्वीच्या काळीं पुनर्विवाह अशा स्थितींत युक्त होता. पारशी लोकांच्या लग्नासंबंधींच्या कायद्याचें कलम २७ मध्यें असें ठरविलेलें आहे कीं, उभयतां वधूवरांपैकीं कोणी जर लग्न झालें त्या वेळीं वेडें असेल तर दुसऱ्यास तें लग्न रद्द करून घेण्याचा अधिकार आहे. अज्ञानावस्थेंत झालेलें लग्न मुलगी वयांत येतांच रद्द करूं शकते असें मुसलमानी धर्मांत सांगितलेलें आहे.

आंधळे, बहिरे, मुके अशा पुरुषांनाहि लग्नसंस्कारांत भाग घेतां येत नाहीं असें वर स्मृतिवचनावरून दाखविलें आहे; आणि सध्यांच्या कायद्यांतहि असें मानण्यांत आलें आहे कीं, बहिरे, मुके अगर भयंकर रोगांनीं पछाडलेले अशा पुरुषांना लग्नसंस्कारांत भाग घेतां येत नाहीं. तथापि खरोखर एखाद्या कन्येचा अशाशीं विवाह झाला तर सदर लग्न रद्द ह्मणून समजलें जात नाहीं, मात्र पतीला अशा स्थितींत वैवाहिक जबाबदारी पुरे पाडण्याचा हक्क अमलांत आणितां येत नाहीं. असें बाई प्रेमभूषण वि. भिकाकल्याणजी ५ मुं. हा. री. २०९ यांत ठरविलें आहे. न्यायाधिशांच्या मताप्रमाणें अशा लोकांना लग्न करण्याचा अधिकार नाहीं असें ठरविलें असतां अशीं लग्नें कायम ठेवण्यांत उघडउघड अन्याय होत आहे. घोष यांच्या मतानें अशीं लग्नें मुलींच्या मर्जीनुरूप रद्द झालीं पाहिजेत. अशा पुरुषांना लग्न करण्याचा अधिकार नाहीं असें सरस्वतीविलासाचें मत असून नारद, कात्यायन आणि पाराशर यांच्या मतें अशा स्थितींत स्त्रियांना पुनर्लग्न करण्याचा अधिकार आहे. आणि अर्थात् स्त्रियांच्या मर्जीप्रमाणें तें लग्न टाळतां येईल असें दिसतें.

**नपुंसकः**—शास्त्रांत अशा नवऱ्यास टाकून दुसरें लग्न करण्याबद्दल स्पष्ट अनुमति आहे. परंतु प्रचलित धर्मशास्त्राप्रमाणें अशा प्रकारचा दोष असतां लग्न रद्द होऊं शकत नाहीं असें पुरुषोत्तमदास वि. बाई मोनी २१ मुंबई ६१० यांत मत दर्शविलें आहे. पारशांच्या कायद्यांत उभयतांपैकीं जर कोणी अशा दोषानें पिडीत असेल तर दुसऱ्या पक्षाच्या मर्जीनुरूप असें लग्न रद्द करितां येतें असें कलम २८ मध्यें सांगितलेलें आहे.

**धर्मांतरः**—पूर्वीच्या स्मृतिवचनांत पतित अशा नवऱ्यास टाकून दुसरें लग्न करण्याची स्त्रियांना मोकळीक होती. परंतु सध्याच्या कायद्याप्रमाणें लग्नाचें बंधन धर्मांतराबरोबर तुटत नाहीं. पतिपत्नीपैकीं कोणीहि धर्मांतर केलें, मुसलमानी धर्म स्वीकारला तरी लग्न रद्द होत नाहीं ( सुंदरी वि. पितांबरी ३२ क. ८७१: ) तसेंच जातीबहिष्कृत जरी कोणीं झालें तरी लग्न रद्द होत नाहीं. (गव्हर्नमेंट ऑफ बॉम्बे वि. गंगा ४ मुं. ३३०:–बुधं सारौतर वि. फातमाबाई २६ म. लॉ. ज २६० ). फक्त वैवाहिक जबाबदारी पुरी करण्याचा हक्क अमलांत आणण्यास कोणी कोर्टांत मागणी करील तर ती नाकारण्यांत येते, ( मोसा लेवी वि. जीवन्मल ६ अ. ६१७ ). खरोखर पहातां उभयतांपैकीं एकानें धर्मांतर केलें म्हणजे अर्थात् हिंदु-धर्माच्या कक्षेच्या बाहेर तो इसम जातो. अशा स्थितींत हिंदुधर्मशास्त्रानें उत्पन्न झालेल्या जबाबदाऱ्या कायम रहातात असें ह्मणणें अत्यंत गैर आहे असें घोष यांचेंहि

ह्मणणें आहे. त्याचा परिणाम असा होतो कीं एखाद्या स्त्रीचा पति परधर्मांत गेला तर त्याचें लग्न कायम राहत असल्यानें तिला दुसरें लग्न करितां येणार नाहीं. इतकेंच नव्हे तर एखादा हिंदुपति ज्या प्रकारचें कायद्याचें रक्षण वैवाहिक संबंधांत मागूं शकेल तसें रक्षण त्याला मागता येतें. तिच्याशीं लग्न लावणारा व ती दोघेहि गुन्ह्यास पात्र होतात. लग्नविधि हा धार्मिक संस्कार आहे असें मानिलें तरी धर्मांतराबरोबरहि त्या संस्कारापासून उत्पन्न होणाऱ्या जबाबदाऱ्या नष्ट झाल्या पाहिजेत. नाहीं तर त्याचा सरळ अर्थ असा होतो कीं ज्या हिंदुधर्माचा त्याग उभयतांपैकीं एकानें केला त्या हिंदुधर्माप्रमाणें लागलेलें लग्न कायम राहून पतिपत्नीसंबंध चालू राहतो. नवऱ्यानें धर्मांतर केलें तरी त्याच्या बायकोस धर्मांतर न करितां राहावयाचे असलें तर त्याची बायको ह्मणून तिनें जवळजवळ विधवेचें आयुष्य कंठिलें पाहिजे. तिला अशा धर्मांतर केलेल्या नवऱ्यापासून पोटगी मागतां येते आणि तिला पतीपासून स्वतंत्र राहण्याची मोकळीक कायद्यानें जरी दिलेली आहे तरी ती अपुरी आहे असेंच ह्मणावें लागेल.

**सगोत्र विवाहः**—सगोत्री वधूवरांचा विवाह हिंदुकायद्याप्रमाणें होत नाहीं. यद्यपि असा विवाह चुकून झाला तर पूर्वीच्या शास्त्राधाराप्रमाणें अशा कन्येचें पुनर्लग्न करून देण्याची मोकळीक होती. आजच्या कायद्याप्रमाणें अशा भार्येस फक्त अन्नवस्त्राचा अधिकार तिच्या पतीविरुद्ध मिळतो. तिची प्रजा ही अनौरस ठरते आणि औरस संतती ह्मणून त्यांना वारशाचे हक्क मिळत नाहींत. हा खरोखर अन्याय आहे. मुलीच्या आईबापांच्या अगर पालकांच्या हलगर्जीपणामुळें सगोत्र अगर सपिण्ड विवाह झाला तर त्याचा भयंकर परिणाम विवाहित स्त्रीला भोगावा लागतो. खरोखर जर असले विवाहच शास्त्राप्रमाणें होऊं शकत नाहींत असें जर आहे तर तें लग्न गैरकायदेशीर असून रद्दबातल समजलें जावें. आणि अशा स्त्रीस पुनर्लग्नाची मोकळीक असावी हें ह्मणणें वाजवीच होईल. आजच्या कायद्यानें तिला सुवासीनि विधवेचें आयुष्य कंठावें लागतें. पतीच्याबरोबर हक्कानें संसार करितां येत नाहीं. कदाचित् तिचा संसार झाला तरी कायद्याच्या दृष्टीनें त्यांचा पतिपत्नीसंबंध गौण समजला जातो; इतकेंच नव्हे तर त्यांचीं मुलें हीं अनौरस म्हणून गणलीं जातात. याचा परिणाम असा होतो कीं तिच्या नवऱ्याच्या मिळकतीवर तिचा अगर तिच्या मुलांचा वारसा हक्क चालत नाहीं. आणि त्याचे लांबचे नातलगहि मिळकत घेऊं शकतील. यांनां फक्त पोटगीपुरतेंच मिळूं शकेल.

**विजातीय विवाहः**—हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें विजातीय विवाह होऊं शकतच नाहीं आणि अशा विजातीय नवराबायकोचा संबंध वरीलप्रमाणेंच असतो. मात्र सिव्हिलमॅरेज ॲक्टखालीं अशा निरनिराळ्या जातींतील विवाह संबंध होऊं शकतात व त्याजकरितां आपण कोणत्याही धर्मांतले नाहीं असे उभयतां वधूवरांस जाहीर करावें लागतें.

**पतीचें निधनः**—पतीच्या निधनानंतर पुनर्विवाह करण्याची मोकळीक पुनर्विवाहाच्या कायद्यानें ( ॲक्ट १५ सन १८५६ ) दिलेली आहे.

लग्न रद्द करून घेण्याबद्दल अशी सूचना करितां येण्यासारख्या आहेत कीं—

**५ ) स्त्रीपुरुष यांच्यांत झालेलें लग्न त्यांच्यापैकीं कोणाच्याहि एकाच्या मर्जीप्रमाणें खालील कारणांकरितां रद्द करण्याची मोकळीक असावी.**

**( अ ) सपिंड अगर सगोत्र विवाह झालेला असेल आणि रूढीप्रमाणें असला विवाह त्या जातींत मान्य नसेल तर,**

**( आ ) शारिरीक वैगुण्यामुळें पतिपत्नी समागम त्यांच्यांत होणें अशक्य असेल तर,**

**( इ कोणीहि वेडा अगर भयंकर असाध्य रोगानें पीडित असेल तर,**

**( ई ) शास्त्रास संमत नाहीं असा द्विजातीयांच्यांत विवाह घडून आला असेल तर,**

**( ६ ) स्त्रीस लग्न रद्द करून घेण्याचा हक्क खालील कारणांकरितां असावा.**

**( अ ) पतीचें धर्मांतर,**

**( आ ) योग्य कारणावांचून अगर तिच्या संमतीवांचून पतीनें तिच्या लग्नानंतर दुसऱ्या स्त्रीशीं लग्न केलें असेल तर,**

**( इ ) पती व्यभिचारी असून, तो अमानुषपणें तिचा छळ करीत असेल; दोन वर्षांपेक्षां जास्त काल पत्नीचा त्यानें योग्य कारणावांचून त्याग केलेला असेल. तो पशुवृत्ती आणि अघोरकर्मी असेल तर,**

**लग्न रद्द करून घेतल्यानंतर उभयतांसहि दुसरें लग्न करण्याचा हक्क असावा.**

## बहुपत्नीकत्व

वैवाहिक बंधनानें स्त्रीपुरुषांचा संबंध निगडित होणें ही सामुदायिक नैतिक उत्क्रांतीची वरची पायरी ह्मणून समजली तरी स्त्री आणि पुरुष यांचा एकाकीच संबंध असणें ही त्याच्याहि वरची नैतिक उत्क्रांतीची पायरी आहे असें ह्मणावें लागेल. बहुपतित्व अगर बहुपत्नीकत्व हे दोन्हीहि प्रकार थोड्या फार प्रमाणांत सर्व राष्ट्रांतून त्यांच्या रानटी अवस्थेंत प्रचारांत होते आणि एकपतित्व व एकपत्नीकत्व हें आज वैवाहिक घटनेचें अंतिम ध्येय म्हणून आजच्या सर्व सुधारलेल्या कायद्यांनीं मान्य केलेलें आहे. इतकेंच नव्हे तर बहुपतित्व आणि बहुपत्नीकत्व हे दोन्ही प्रकार सारखेच त्याज्य ठरवून ते दण्डनीय ठरविण्याचा दरेक कायद्याचा रोख आहे. एका पुरुषास एका वेळीं एकाच स्त्रीचा पत्नी म्हणून स्वीकार करतां येईल आणि एका स्त्रीस एका वेळीं एकाच पुरुषास पति म्हणून वरण्याची मोकळीक असेल. लग्नसंबंध मोडून पुनः दुसऱ्याशीं लग्न करितां येतें. तथापि जोंवर तो लग्नसंबंध कायद्यानें रद्द ठरवून घेतला गेला नाहीं, तोंपर्यंत दुसरा संबंध करितां येत नाहीं, तो गुन्हा ठरतो. ही नैतिक उन्नतीची कसोटी जर प्रचलित हिंदुधर्मशास्त्रास लाविली तर बहुपत्नीकत्वाच्या कलंकानें काळवंडलेली आमची विवाहसंस्था अर्थातच इतरांच्या पुढें हिणकस दिसेल. क्षेत्राचें पवित्र राखण्याचा खोटा ढोल मारून या उघड उघड पक्षपाताचें समर्थन होणार नाहीं. तसेंच स्त्रीयांनां होणाऱ्या अन्यायाचें परिमार्जनहि होणार नाहीं. बहुपतित्वाबरोबर बहूपत्नीकत्वास आळा न घालतां त्याला विवक्षित मर्यादाहि आंखून देण्याची जबाबदारी कोणास भासली नाहीं, यास कारण केवळ पक्षपात अगर एकतर्फी अन्याय होय असें स्त्रीवर्गानें म्हटल्यास दुसरें सयुक्तिक उत्तर तरी काय देतां येण्यासारखें आहे? "यदेकस्मीन् यूपे द्वे रशने परिव्ययति तस्मादेको द्वे जाये विन्दते." ( तैत्तीरीय संहिता ) ज्याप्रमाणें यूपामध्यें दोन दोऱ्या असूं शकतात तद्वतच एका पुरुषास दोन भार्या असूं शकतील. यांत दोन बायका करण्याची मोकळीक दिलेली असली तरी तें ऋषींनां संमत होतें असें ह्मणतां यावयाचें नाहीं. त्यांनां एकपत्नीकत्वच मान्य होतें असेंच ह्मणावें लागेल. तैत्तीरीय संहितेंत पुरुषास दोन बायका करण्याची मोकळीक ठेवल्याचें ग्राह्य केलें तरी आजच्या कायद्याप्रमाणें बायकांच्या संख्येवर कसलेंच नियंत्रण नाहीं आणि अगणित स्त्रियांशीं लग्न लावण्याचा हक्क हिंदु पुरुषास कायद्यानें दिलेला आहे. मुसलमानी धर्मांतहि एका वेळीं चाराहून अधिक बायका करितां येत नाहींत. 'एकस्य बव्हो जाया भवन्ति नैकस्य बहवः।' (ऐतरेय ब्राह्मण) पुरुषास अनेक भार्या असूं शकतात, परंतु स्त्रीस पुष्कळ पति असणार नाहींत अशीं वचनें जरी अगणित स्त्रियांशीं एकट्या पुरुषानें लाविलेल्या लग्नाचें समर्थन करीत असलीं तरी स्मृतिकारांनां सर्वसाधारणपणें एकपत्नीकत्वच मान्य होतें असेंच दिसतें. "अनुकूलामवाग्दुष्टां दक्षां साध्वीं प्रजावतीम् । त्यजन् भार्यामवस्थाप्यो राजा दण्डेन भूयसा ॥" ( नारद ) आज्ञाधारक, प्रियभाषणी, सुग्रण, पतिव्रता आणि पुत्रवती भार्येस सोडून देतो ( जो दुसरीशीं लग्न करितो ). त्याला राजानें कडक शिक्षा करून स्वकर्तव्याची जाणीव करून द्यावी. इतकेंच नव्हे तर याज्ञवल्क्यांनीं ह्मटल्याप्रमाणें 'आज्ञासंपदिनीं दक्षां वीरसूं प्रियवादिनीम् । त्यजन् दाप्य स्तृतीयांशमद्रव्यो भरणं स्त्रियाः ॥ याज्ञवल्क्य ( आज्ञाधारक, प्रिय बोलणारी, दक्ष व पुत्रवती भार्येस जो टाकून देतो त्याजकडून राजानें मिळकतीपैकीं तिसरा हिस्सा तिला द्यावा.) निर्धन असेल तर अन्नवस्त्राचा बंदोबस्त करावा. या दोन वचनांवरून योग्य कारणावांचून पहिल्या भार्येस टाकून देणें शास्त्रास संमत नव्हतें असें दिसतें. एकपत्नीकत्व हा अत्यंत मोठा गुण समजला जात असे आणि श्रीरामचंद्राच्या अवताराचें रमणीयत्वहि या अलौकिक गुणांतच आहे. आणि म्हणूनच त्याला पूर्णावतार मानण्याचा प्रघात आहे. प्रजोत्पादन करून आपली जात जिवंत ठेवावयाचा उद्देश प्रत्येक देशांतील लग्नसंस्थेच्या मुळाशीं असतो. त्याचप्रमाणें हिंदु धर्मशास्त्रासहि तें मान्य आहे. आणि पहिली बायको जिवंत असतां दुसरें लग्न करण्यास मोकळीक प्रथमतः अशाकरितां ठेविलेली असावी असें वाटतें. 'वन्ध्याष्टमेऽधिवेद्याऽब्दे दशमे तु मृतप्रजा। एकादशे स्त्रीजननीं सद्यस्त्वप्रियवादिनीं ॥ ( मनु ) मुलें न होणाऱ्या स्त्रीची आठ वर्षें, मुलें होऊन मरणाऱ्या स्त्रीची दहा वर्षें, केवळ मुली होणाऱ्या

स्त्रीचीं अकरा वर्षे वाट पाहून पतीनें दुसरा विवाह करावा. पुत्ररहित असून स्त्री अप्रियभाषणी असेल तर पतीनें तत्काल दुसरा विवाह करावा. या श्लोकाचें भाषांतर मिरजकर शास्त्री यांनीं असें केलें आहे आणि कंसांत अशीहि पुस्ती जोडली आहे कीं, मुलें होत आहेत परंतु स्त्री केवळ अप्रियभाषणी आहे येवढ्याकरितां पतीला दुसरा विवाह करितां येत नाहीं; अनेक उपायानें त्यानें तिचें मन स्वाधीन केलें पाहिजे. 'धर्मप्रजासंपन्ने दारे नान्यां कुर्वीत । अन्यतराभावे भार्या प्रागग्न्याधेयात् ॥ ( आपस्तंभ ) धर्मकृत्यांत दक्ष आणि पुत्रवती भार्या असेल तर त्या पुरुषानें दुसरा विवाह करितां कामा नये. पण या दोन गोष्टींपैकीं एकींतहि न्यून असलें तर त्यानें अग्नीहोत्राचा अग्नि पेटविण्यापूर्वी दुसरा विवाह करावा. विवाहामुळें उभयतांच्या सुखाची वृद्धि व्हावयाची त्याच्या उलट जर त्यापासून ताप होऊं लागला तर अशा तापदायक भार्येसह आमरण झुंजत आयुष्य कंठिलें पाहिजे असला कडक आणि अशक्य नीतिनियम न घालतां स्मृतिकारांनीं दुसरींहि कारणें दुसरें लग्न करण्यास योग्य अशीं ठरविलीं आहेत. आणि तीं अशीं. 'मद्यपा साधुवृत्ता च प्रतिकूला च या भवेत् । व्याधिता व्याधिवेतव्या हिंस्रार्थघ्नी च सर्वदा ॥ (मनु) मद्य पिणारी, दुष्टाचरणी, पतीच्या विरुद्ध जाणारी, रोगी, खराब व ऐपतीबाहेर खर्च करणारी भार्या असेल तर दुसरा विवाह पुरुषानें करावा. रोगी पत्नी असेल तर दुसरें लग्न करण्यास मोकळीक दिलेली आहे. त्याचबरोबर तिची संमती दुसऱ्या विवाहास घ्यावी असेंहि सांगितलें आहे. ' या रोगिणीस्यात्तु हिता संपन्ना चैव शीलतः । सानुज्ञाप्याधिवेतव्या नावमन्या च कर्हिचित् ॥ अधिविन्ना तु या नारी निर्गच्छेद्रुषिता गृहात् । सा सद्यः सन्निरोद्धव्या त्याज्या वा कुलसंनिधौ ॥ ( मनु ) स्त्री रोगी आहे परंतु पतीच्या विरुद्ध वागत नाहीं, शील शुद्ध ठेविते असें आढळल्यास तिच्या परवानगीनें पतीनें दुसरा विवाह करावा व तिचा कधींहि अपमान करूं नये. याप्रमाणें अडचणीनें पतीनें दुसरा विवाह केल्यास जी स्त्री रागानें घर सोडण्यास तयार होईल तिचा पतीनें प्रतिकार करावा. किंवा माहेरच्या माणसांस बोलावून त्याच्या स्वाधीन तिला करावें. याज्ञवल्क्यस्मृतींत सांगितलें आहे. 'सुरापी व्याधिता धूर्ता वन्ध्याऽर्थघ्न्यप्रियंवदा । स्त्रीप्रसूश्चाधिवेतव्या पुरुषद्वेषिणी तथा ॥ मद्यपी, रोगी, विरुद्ध वागणारी, वांझ, उधळी



निष्ठुरभाषिणी, कन्याप्रसवा, नवऱ्याचें अहित करणारी अशी भार्या असतां दुसरें लग्न पुरुषानें करावें. तथापि प्रथम भार्येचा आदरसत्कार ठेवावा. असेंहि सांगितलें आहे ' अधिविन्ना तु भर्तव्या महदेनोऽन्यथा भवेत् । यत्रानुकूल्यं दम्पत्योस्त्रिवर्गस्तत्र वर्धते ॥ पहिल्या भार्येचें मानसन्मानानें पूर्वीप्रमाणें पालनपोषण करावें. नाहींतर मोठें पाप होईल. पतिपत्नीचें चित्तैक्य असेल अशा ठिकाणीं धर्मार्थकामाची अभिवृद्धि होत असते. गुणवती भार्येचा त्याग करणारासहि पूर्वी दंड असे आणि व्यवहारमयूख ह्मणतो ' तत्र भर्तुः सगुणपत्नीत्यागे दंडमाह ' । गुणवती भार्येचा त्याग करणाऱ्या पतीस दण्ड सांगितलेला आहे. केवळ कामार्थ दुसऱ्या स्त्रीशीं लग्न करणारानें प्रथम पत्नीला द्रव्य देऊन संतुष्ट करावें असें ' एकामुत्क्रम्य कामार्थमन्यां लब्धुं यदिच्छति । समर्थस्तोषयित्वाऽर्थैः पूर्वोढामपरां वहेत् ॥ ( देवल ). केवळ कामार्थ दुसरी भार्या करण्यास इच्छिणारानें पहिल्या भार्येस द्रव्य देऊन संतुष्ट करावें व नंतर दुसरीशीं विवाह करावा. दुसऱ्या लग्नाचे वेळीं पहिल्या भार्येस द्रव्य द्यावें असें याज्ञवल्क्याचेंहि मत आहे. 'अधिविन्नस्त्रियै दद्यादाधिवेदनिकं समम् । न दत्तं स्त्रीधनं यस्यै दत्ते त्वर्धं प्रकीर्तितम् ॥ स्त्रीधन मिळालेलें नाहीं अशा पहिल्या भार्येस दुसऱ्या लग्नाच्या निमित्तानें होणाऱ्या खर्चाच्या बरोबरीनें धन द्यावें. स्त्रीधन दिलेलें असेल तर त्याच्या निम्मे द्यावें. स्मृतिचंद्रिकेंत याबद्दल असें सांगितलें आहे कीं, ' तत्र देवलः स्वदारांस्त्यज्यतो मोहान्नरस्यान्यायमोचिनः । धर्मवंशपरित्यक्तुर्निष्कृतिर्न विधीयते ॥ शास्त्रोक्तत्यागहेतून् विनैव यो मोहादिना स्वयं त्यजति तस्यान्यायेन स्वदारमोचिनस्तन्मोचद्वारेण तथा सहविदित श्रौतस्मार्तादि धर्मस्य तस्यामुत्पाद्य संतानस्य च त्यक्तुर्दुष्कृतनिष्कृतिर्नास्तीत्यर्थः । इह लोकेऽपि तस्य राज्ञा चोरवद्दण्डनं कार्यम् । तथा च चोरवच्छास्य इत्यनुवृत्तौ विष्णुः " निर्दोषायां परित्यजन्पत्नीं च " इति । त्यागहेतुभूतदोषरहितां भार्यां परित्यजन्नपि चोरवद्दण्ड्य इत्यर्थः । गुणवतीं पुनः परित्यजन्महता दण्डेन वशीकृत्य तस्यामेव भार्यायामवस्थायाः । भावार्थ. शास्त्रांत सांगितलेल्या त्यागाच्या कारणावांचून केवळ मोहानें जो आपल्या भार्येचा त्याग करतो तो धर्मकार्याचा आणि पुत्रसंतानाचा त्याग करितो आणि त्याच्या कृत्याचें क्षालन होत नाहीं. या लोकींहि राजानें त्याला चोरा

प्रमाणें शासन करावें. विष्णूनेंहि निर्दोषी भार्येस टाकून देणारास चोराप्रमाणें दंड सांगितला आहे. शास्त्राप्रमाणें ज्या दोषांमुळें त्याग करितां येतो तसे दोष जिच्यांत नाहींत अशा भार्येचा त्याग करणारास चोराप्रमाणें शिक्षा करावी असा अर्थ होय. याहींकरून गुणवती भार्येचा त्याग करणारास जबर शिक्षा करून त्याला जर्जर करून त्याच भार्येबरोबर संसार करण्यास लावावें.

याप्रमाणें पूर्वीच्या काळीं पुरुषांच्या अनेक लग्नें करण्याच्या हक्कावर नियंत्रणें होतीं. आज पुनर्लग्न करण्याच्या त्याच्या हक्कावर दारिद्र्याशिवाय कसलेंच नैतिक अगर कायद्याचें नियंत्रण राहिलें नाहीं. पूर्वीच्या काळीं योग्य कारणावांचून केलेल्या लग्नासाठीं पुरुषास शिक्षा भोगावी लागत असली तरी शिक्षेचा कायदा आज पीनलकोडाच्या संपुष्टांत आल्यानें असा प्रकार गुन्हाईत म्हणून ठरविण्यांत आलेला नाहीं. करितां कांहीं जणांनां प्रथम भार्या पसंत नाहीं, तर कांहींनां अधिक रूपवती भार्या असावी अशी इच्छा झाल्यानें त्यांनीं दोन दोन चार चार लग्नें करण्याचा सपाटा चालविला. लग्नांतील तंटे वर्दळीवर जाऊन पहिल्या लग्नाच्या मंडपांतच दुसऱ्या वधूशीं पुनः लग्न लाविल्याचीं उदाहरणें ज्याप्रमाणें आहेत, तद्वतच " आतां मुलगी कोण देणार?" ही थट्टा सहन न झाल्यानें अगर ती खोटी ठरविण्याच्या ईर्षेस पेटलेल्यांनीं दुसरीं लग्नें केल्याचेहि दाखले सांपडतील. गुलामांच्या संख्येवरून ज्याप्रमाणें मालकाची प्रतिष्ठा ठरविण्यांत येत होती, तद्वतच बायकांच्या संख्येवरून पुरुषाचा वडेजाव समजला जातो. जुन्या पिढींत हा अनेक लग्नें करण्याचा नाद विशेष होता. तथापि अनेक भार्या असणें हा एक शोकाचा प्रश्न असल्यानें पहिल्या पत्नीसहि ते तितक्याच आस्थेनें बाळगीत असत आणि तिच्याशीं संसार करीत असत. दारिद्र्यामुळें त्या चालीस आळा पडत आहे. तथापि संस्थानिक लोक आणि खुशालचेंडू सुखवस्तू श्रीमंत लोक यांच्यांत या चालीचा अवशेष अजूनहि दिसून येतो. पतिपत्नीसंबंध एकाकी असला पाहिजे आणि पतिप्रेमाची विभागणी होऊन आवडतीनावडतीच्या झगड्यांत आपलें भवितव्य टाकून पतिप्रेमाच्या भरतीओहटीकडे चातकाप्रमाणें दृष्टी लावून बसण्याची वेळ येणें ही गोष्ट दांपत्यसंबंधांत स्त्रियांनां अत्यंत दुःखदायक आणि अपमानास्पद अशी असून अगणित जीवांनीं या सवतीमत्सराच्या होमकुंडांत आपल्या प्राणांची आहूती दिलेली आहे, तर बाकीच्यांनीं जिवाचें बरेंवाईट करण्याचें धैर्य न झाल्यावद्दल पश्चात्तापांत दिवस कंठले आहेत. पुरुषांनां बायकोस वाटेल तेव्हां आणि कांहीं कारण नसतांहि टाकून देऊन दुसऱ्या स्त्रीबरोबर लग्न करण्याची जी मुभा ठेवलेली आहे त्यामुळें तिच्या गृहसौख्यावर ही तरवार लटकत असल्याप्रमाणें भासत आहे. गृहकृत्यांत स्त्रियांनां अपलें मतहि जोरानें पुढें मांडतां येत नाहीं, दुर्गुणी पतीस आळाहि घालतां येत नाहीं. खतःची व कच्च्याबच्च्यांची लाजहि रक्षण करितां येत नाहीं, या सर्वांच्या मुळाशीं जर कांहीं गोष्ट असेल तर ती ही कीं, पुरुषांच्या जवळ असलेली त्यागाची अमोघ शक्ति होय. जुनी पिढी जेवढी अशिक्षित तेवढीच लोकापवादाच्या दडपणाखालीं दडपलेली; तेव्हां पत्नीस टाकून देण्याचे प्रकार घडले तरी लोकांच्या मध्यस्तीनें त्यांचा पुनः पूर्ववत् संसार होत असे. नवीन पिढींतील लोक शिक्षणानें जेवढे हेकेखोर झालेले आहेत, तितक्याच प्रमाणांत त्यांच्या आवडीनिवडी मनस्वी होऊन गेलेल्या आहेत आणि कोणत्या क्षुल्लक कारणावरून ते भार्येचा त्याग करतील हें सांगता येत नाहीं. तसेंच तिच्याशीं पुनः संसार करण्यास केव्हां तयार होतील हेंहि सांगता येणार नाहीं. या विषयाबद्दल अधिक विस्तृतहि लिहितां येईल, परंतु तो एक मोठा ग्रंथ होईल. वाचकांच्या माहितीकरितां ह्मणून येवढें सांगण्यास आम्ही तयार आहोंत कीं, कित्येक चांगले शिकलेले, परदेशांतूनहि जाऊन आलेले, शेंकड्यावारी पगार मिळविणारे अशा प्रतिष्ठित दिसणाऱ्या गृहस्थांनीं पहिल्या भार्येस तिच्या पोटापाण्याचीहि तरतूद न करितां टाकून दिल्याचीं उदाहरणें पुष्कळ देतां येतील. आतां त्या स्त्रिया दुर्गुणी असतील, कुरूप असतील, आवडत नसतील, परंतु लग्नबंधनांतून त्यांनां मोकळें होतां येत नसल्यामुळें वस्तुतः विधवेचें आयुष्य त्यांनां कंठावें लागतें. विधवेस शेजाऱ्यापाजाऱ्यांची सहानुभूति तरी असते परंतु अशा टाकून दिलेल्या स्त्रियाच वाईट असल्या पाहिजेत असा सर्वांचा समज असल्यानें इतरांची सहानुभूतीहि नसते. तेव्हां ही स्थिति पालटणें अत्यंत जरूर आहे. आणि त्याबद्दल अशी सूचना करणें कीं:—

**( ६ ) पुरुषास एका भार्येच्या ह्यातींत दुसरें लग्न कांहीं कारणांखेरीज करण्याचा हक्क नसावा आणि पहिली पत्नी ह्यात असतां केलेलें दुसरें लग्न गैरकायदेशीर ह्मणून समजण्यांत यावें; अगर पहिलें लग्न रद्द करण्यासाठीं तें एक योग्य कारण समजलें जावें. अशा दुसऱ्या लग्नास पत्नीची संमती मिळविली असतां लग्न कायदेशीर गणलें जावें. फक्त खालील गोष्टींकरितांच तशी संमती चालेल, आणि त्या पुरुषाची भार्या ह्मणून तिची राहण्याची इच्छा असेल तर दुसऱ्या लग्नापूर्वीं तिच्या पोटापाण्याचा योग्य बंदोबस्त पतीनें केला पाहिजे.**

**( अ ) योग्य अवधी होऊन गेल्यानंतर ह्मणजे वयांत आल्यावर दहा वर्षेपर्यंत मूल झालें नाहीं, अगर शेवटच्या गर्भधारणेनंतर दहा वर्षेपर्यंत मूल झालें नसलें आणि पुत्रसंतति नसेल तर स्त्रीची संमती न घेतां खालील कारणांकरितांच फक्त पुरुषांस लग्न करितां येईल.**

**( आ ) स्त्री स्वतः रोगानें अगर व्यंगानें कायमची संसार करण्यास निरुपयोगी असेल तर,**

**( इ ) स्त्री दुर्वृत्त असेल, अगर कर्कशा असेल व पतीचें अनहित करीत असेल तर,**

**( ई पहिली बायको योग्य कारणें दाखवून निराळी राहूं लागली असेल, आणि तिला पुरुषसंतती नसेल तर,**

या कारणांखेरीज पतीनें दुसरें लग्न केलें तर पतीच्या मिळकतीच्या अगर हिश्याच्या तिसऱ्या हिश्याइतकी मिळकत अगर मिळकतीचें उत्पन्न पतीपासून अगर पति ज्या अविभक्त कुटुंबाचा भागीदार असेल त्या कुटुंबापासून वेगळें करून घेण्याचा पहिल्या भार्येस हक्क असावा. मात्र लग्न रद्द न करितां ती पहिल्या पतीची पत्नी ह्मणून जोपर्यंत राहील तोंपर्यंतच त्या मिळकतीचा उपभोग घेण्याचा तिला अधिकार असावा.

या सूचनेंतील शेवटच्या वाक्यांत नमूद केलेल्या विचारसरणीस कांहींसा पोषक असा ठराव ( बाई रमाबाई वि. त्रिंबक ९ मु. हा. को. रि. २८३) असून तो अवश्य ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. त्यांत असें ठरविण्यांत आलें आहे कीं, कारणावांचून पत्नीस टाकून देणाऱ्या पतीच्या अविभक्त कुटुंबासहि नवऱ्याच्या हिश्याच्या मानानें तिसऱ्या हिश्यापर्यंत तिला अन्नवस्त्र ह्मणून यावें. पति विभक्त असतांना अर्थात् तो फायदा मिळेल यांत नवल नाहीं.

## व्यभिचार

आजच्या कायद्याप्रमाणें व्यभिचार हा सर्वसाधारणपणें दंडनीय असा गणला जात नाहीं. फक्त पतीच्या ह्यातींत त्याच्या पत्नीशीं जर कोणी दुष्कर्म करील तर त्यास फौजदारी कायद्याप्रमाणें शिक्षा होते. एखाद्या स्त्रीचा पति मरण पावला ह्मणजे ती अर्थात् दुसऱ्याची भार्या ह्मणून समजली जात नाहीं आणि अशांशीं ह्मणजे विगतधवांशीं दुष्कर्में करणारांस शासन मिळत नाहीं. पुरुषाच्या दुराचारास त्यामुळें कसलाच आळा बसत नाहीं. उलट विधवांचा पुनर्विवाह लोकप्रिय अजून होत नसल्यानें असे दुराचार करण्यास अनायासें वाटेल तेवढी संधि पुरुषास मिळते. नवरा दुराचारी असला तरी आजच्या प्रचलित हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें त्याच्या पत्नीस कांहीं करितां येत नाहीं. फार काय पतीच्या दुराचाराच्या सबबीवर तिला निराळेंहि राहतां यावयाचें नाहीं अगर तिचा कबजा घेण्याचा तिच्या नवऱ्यानें दावा केला तर नवरा व्यभिचारी आहे या सबबीवर तिला त्या दाव्यांत स्वतःचा बचाव करितां येणार नाहीं. घरीं दुसऱ्या बाईस राहण्यास आणावयाचें व पत्नीस आणि मुलांनां घरांतून काढून लावावयाचें व पत्नीला मारझोड करून तिचा जीव घेण्याची धमकी द्यावयाची असें जर क्रूरपणाचें वर्तन नवऱ्याच्या हातून घडलें असेल तर मात्र त्याच्या पत्नीस निराळें राहतां येतें व नवऱ्याच्या ताब्यांत न राहण्यास योग्य कारण ह्मणून तें समजलें जातें. ( डुलर कुवर वि. द्वारकानाथ मिश्र ३४ क. ९७१: ) पुरुषानें यवनी रक्षा ठेविली तर त्याच्या पत्नीस निराळें राहतां येतें ( लाला गोविंद वि. दौलत १४ वी. री. ४५१ ) पण तिला टाकून दिल्यावर जर त्यानें कबजा घेण्याचा असेल तर मात्र पत्नीस पतीच्या घरीं राहिलें पाहिजे. ( पैगी वि. शिवनारायण ८ अ. ७८) असें ठरविण्यांत आलें.

पुरुषाचें असें वर्तन अक्षय निर्दयतेंत गणलें जातें व अशा वेळीं निराळें राहण्याचा व अन्नवस्त्र मागण्याचा

हक्क त्याच्या भार्येस मिळतो. पुरुषानें घरांत अनेक रक्षा ठेवणें व त्यांच्या सांगण्यावरून बायकोस मारझोड करणें, लाथाखालीं तुडविणें आणि तिचे तुकडे तुकडे करून टाकीन अशी धमकी देणें व घरांतून घालवून देणें आणि तिच्यावर निराधार असे निंद्य आरोप करणें अशा स्थितींत त्याचें हें कृत्य निर्दयतेचें आणि त्यागाचें असून निराळें अन्नवस्त्र त्याच्या बायकोस मागता येतें ( सीताबाई वि० रामचंद्रराव भोंसले, १२ मुं. लॉ. री ३७३ ) पूर्वीच्या धर्मशास्त्राप्रमाणें स्वस्त्री-व्यतिरिक्त अन्य स्त्रीशीं केलेलें दुष्कर्म पातक आणि गुन्हा ह्मणून समजलें जात होतें, इतकेंच नव्हे तर त्यास दंडापासून ते वधापर्यंत निरनिराळ्या शिक्षा सांगितलेल्या होत्या. दुराचारी पुरुषाचा त्याग करण्यास स्त्रियांनां मोकळीक होती असें दिसतें.

पुरुषाच्या या गैरवर्तनास जर स्त्रियांनां कांहींच आळा घालतां आला नाहीं तर त्यांनां संसाराचें सुख तरी कसें लाभणार ? पुरुष दुसऱ्या स्त्रियांच्या नादीं लागले म्हणजे भार्येचा ते त्याग करितात, इतकेंच नव्हे तर त्यांच्या नादानें आणि सांगण्यानें पत्नीचा अमानुष छळ करण्यास प्रवृत्त होतात. याचीं उदाहरणें प्रत्यहि घडून येतात. तेव्हां व्यभिचारी पुरुषापासून स्वतंत्र राहण्याची व अन्नवस्त्र मागण्याची स्त्रियांनां मोकळीक असणें जरूर आहे. तसेंच पुरुष व्यभिचारी असेल व त्यानें दोन वर्षांवर पत्नीचा त्याग केलेला असेल, तिच्या अन्नवस्त्राची तरतूद ठेवित नसेल तर, तिला निर्दयतेनें वागवित असेल तर, पशुवृत्ती असेल, अगर व्यभिचार निंद्य प्रकारचा असेल तर स्त्रीला तें लग्न रद्द करून घेण्याचा ह्मणजे घटस्फोट मागण्याचा हक्क असला पाहिजे हें मागणें वाजवी होणार आहे.

## फारकती

उभयतां स्त्रीपुरुषांचा दांपत्यसंबंध घटस्फोटानें मोडून न टाकतां फारकतीनें उभयतांनां राहतां येईल अशी योजना वैयक्तिक हक्कांच्या दृष्टीनें घटस्फोटाच्या हक्काइतकीच महत्त्वाची आहे. फारकतींत उभयतांचा संबंध कायम रहात असला तरी दुसऱ्यापासून परस्परांनां त्रास न पोहोंचता उभयतांनां स्वतंत्र राहतां येतें. अशीं कांहीं कारणें असतात कीं जीं अल्पकाळ टिकणारीं, क्षुल्लक स्वरूपाचीं असून पुढें मागें उभयतांचा सलोखा घडवून आणणें अशक्य कोटींतील करण्यासारखीं महत्त्वाचीं नसतात, तेव्हां अशा वेळीं लग्नसंबंध मोडून न टाकतां लग्नसंबंधाचें अभेद्य स्वरूप उभयतांच्या मनावर बिंबवून त्यांनां गुण्यागोविंदानें एकत्र राहण्यास भाग पाडणें हें समाजाच्या स्थैर्यास आणि लग्नसंस्थेच्या उच्च हेतूस पोषक असतें. अशी कांहींशीं व्यवस्था प्रचलित कायद्यांत झालेली असली तरी तिचें स्वरूप स्पष्ट नाहीं; तसेंच कित्येक बाबतींत ती असमाधानकारक अशी आहे. आजच्या कायद्याप्रमाणें पतीपासून वेगळें राहून अन्नवस्त्र मागतां येतें. तसेंच नवऱ्यानें पत्नीसंबंध पुरा करण्यासाठीं कोर्टांतून दाद मागितली तर कांहीं कांहीं कारणांमुळें अशा दाव्यांत स्त्रीला आपला बचाव करितां येतो व एका अर्थानें फारकतीसारखे हक्क मिळवितां येतात. स्त्री जेव्हां घर सोडून जाते त्यावेळीं लग्नासंबंधानें उत्पन्न होणारी जबाबदारी पार पाडण्याकरितां तिचा ताबा मिळण्यासाठीं तिचा नवरा दावा करूं शकतो व अशा दाव्यास इंग्रजींत Restitution of Conjugal Rights चा दावा असें संबोधिण्यांत येतें.

लग्नानंतर पति हा पत्नीचा कायदेशीर पालक ह्मणून समजला जातो आणि ती वयानें कितीहि जरी लहान असली तरी तिनें आपल्या नवऱ्याच्या घरीं राहिलें पाहिजे असा त्याचा ह्मणण्याचा हक्क आहे (धरणीधरघोष १७ क. २२८) परंतु कांहीं कारणांवरून अशा प्रकारचा नवऱ्याचा पत्नीस आपल्याजवळ ठेवून घेण्याचा हक्क अमलांत अणतां येत नाहीं. तीं कारणें अशीं.

अक्षमित निर्दयताः—पत्नीला मारझोड अशा प्रकारची करणें कीं तिचें जीवित धोक्यांत येईल अशी वाजवी भीति उत्पन्न होत असेल तर त्या नवऱ्याच्या येथें स्त्रीनें रहावें असें भाग पाडतां येत नाहीं (यमुनाबाई वि० नारायण मोरेश्वर पेंडसे १ मु. १६४. जोगेंद्र नंदन वि० हरी ५ क. ५००: मातंगिनी दासी वि० जोगेंद्रनाथ मलिक १९ क. ८४ ). घरांत वेश्या आणून ठेवणें आणि स्त्रीस मारहाण करणें, ठार मारण्याच्या धमक्या देणें असा प्रकार असेल तरीहि तिला निराळें राहतां येईल. (डुलर कुवर वि. द्वारकानाथ ३४ क० ९७१: सीताबाई वि० रामचंद्रराव १३ मुं. लॉ. री. ३७३ ).

व्यभिचारः—घरांत वेश्येस आणून ठेवणें अगर यवनीबरोबर दुष्कर्म करणें ( लाला गोविंद वि. दौलत १४ वी. री. ४५१ ) हीं जरी योग्य कारणें

असलीं तरी घरांत राजरोसपणें वेश्यांना घेऊन येणें आणि स्त्रीला सुऱ्यांनीं ठार मारण्याची धमकी देणें या गोष्टी घडल्या असतांनाहि ते सर्व अपराध स्त्रीनें माफ केले तर, अशीं कारणें होतीं येवढ्यावरूनच स्त्रीस स्वतंत्र राहण्याची मोकळीक न देतां नवऱ्याचा दावा देवविण्यांत आला ( जोगेंद्रनंदिनी वि. हरीदास ५ क. ५०० ). यवनीस ठेविल्याबद्दल जातिबहिष्कृत झालेल्या पुरुषानें यवनीस सोडून दिल्यावर जर असा दावा आणिला तर त्यानें पुनः आपणास पावन करून घ्यावें अशा अटीवर त्याचा पत्नीस कबजांत घेण्याचा दावा देण्यांत आला. ( पैंगी वि. शिवनारायण ८ अ. ७८ )

धर्मांतरः—नवऱ्यानें धर्मांतर केलें असल्यास त्याजबरोबर स्त्रीनें राहिलें पाहिजे असें ह्मणतां येणार नाहीं. ( मोषा लेवी वि. जीवन्मल ६ अ. ६१७ ).

जातिभ्रष्टः—एका ठरवांत असें ठरविण्यांत आलें कीं नवरा जातिभ्रष्ट झाला या कारणामुळें त्याला बायकोचा सहवास मागतां यावयाचा नाहीं अगर त्यानें आपणास पंक्तिपावन करून घ्यावें अशी अट घालावयाची या दोन्ही गोष्टी बरोबर नाहींत. ( शाहदर वि. राजवंत २७ आ ९६; बिन्द वि. कौसल्या १३ अ. १२६ ). उभयतांपैकीं कोणीहि जातीभ्रष्ट झाली तथापि लग्नसंबंध त्यामुळें तुटत नाहीं. कांहीं प्रायश्चित्तें घेऊन परत जातींत कोणासहि दाखल होतां येतें.

( सुब्बराया वि. रामस्वामी पिले २३ म. १७१ )

महाव्याधि, नपुंसकत्वः—स्मृतिकारांच्या मताप्रमाणें महारोगी अगर नपूंसक अशा नवऱ्यास सोडून जाण्याची मोकळीक स्त्रीला आहे. महारोग इत्यादि भयंकर रोगानें पछाडलेल्या नवऱ्यापासून स्त्रीला वेगळें राहतां येईल असें ' बाई प्रेमकुंवर वि. भिका कल्याणजी' (५ मुं. हा. री. २०९ ) मध्यें ठरविलें आहे.

दुसरें लग्नः—पुरुषानें दुसरें लग्न केलें आणि सवत घरांत राहण्यास आली या कारणावरून स्त्रीला निराळें राहण्याचा हक्क नाहीं. अगर नवऱ्यानें तिच्या दागिन्यांचा अपहार केलेला असला तरी तिला स्वतंत्र राहतां येत नाहीं ( जी. बोधन वि० मु० सिंधु १७ वी.४री. ५२२ ). दुसरें लग्न करणें ही कांहीं अक्षमित निर्दयता होत नाहीं आणि ह्मणून स्त्रीला निराळें राहण्याचा हक्क नाहीं व निराळी राहण्याजेवणाची तजवीज करून देण्यास नवऱ्यास सांगतां येत नाहीं असें मुंबई हायकोर्टानें ठरविलें ( मोतीलाल वि० बाई चंचल ४ मुं. लॉ. री. १८७; चिमणलाल वि. बाई नर्मदा ८२० ). आणि तेंच मत अलाहाबाद हायकोर्टाचें आहे. दुसरें लग्न करणें व पहिल्या बायकोस टाकून देणें व तिला घरांत निकृष्टावस्थेंत दिवस कंठण्यास लावणें ही निर्दयता ह्मणून ह्मणतां येत नाहीं असें ( अदली वि० परसोनी १८ ई. के. ७१३ ) ठरविलें आहे.



## फारकत मिळविण्यासाठीं कारणें:—

**( ८ ) लग्नसंबंध कायम ठेवून पतीपासून फारकत मिळवून स्त्रीला खालील कारणांकरितां स्वतंत्रपणें राहण्याचा व पतीपासून योग्य ती पोटगी मागण्याचा हक्क असावा.**

**( अ ) अक्षमित निर्दयता, अगर अमानुष छळ, कीं ज्यामुळें स्त्रीच्या जीवितास धोका पोहोंचण्याचा संभव आहे,**

**( आ ) पतीचा व्यभिचार अगर योग्य कारणाकरितां पतीनें केलेलें दुसरें लग्न,**

**( इ ) पतीनें त्याग केला असेल तर,**

याप्रमाणें स्त्रियांचे वैयक्तिक हक्क असले पाहिजेत. म्हणजेच त्यांच्या सौख्याची पूर्ण खबरदारी राहील. आजची परावलंबी स्थिति त्यांच्या केविलवाण्या स्थितीस कारणीभूत आहे. पुरुषांच्याकडून होणाऱ्या अनेकविध जुलमांचा प्रतिकारहि तिला करितां येत नाहीं तर त्या जुलमावर विजय मिळविण्याची गोष्टच नको. लग्नसंबंध अत्यंत नाजुकांतला नाजूक संबंध आहे. आणि म्हणूनच हिंदुधर्मशास्त्रांत त्यास संस्काराच्या उच्चतर कोटींत बसविलें आहे. आणि होतां होईतोंवर त्यांत कांहींहि विकल्प उत्पन्न होणें रास्त नाहीं हें जरी खरें असलें तरी सध्यांची एकांगी शांतता अगर सुस्थिति हीहि समाजाच्या स्थैर्यास पूर्ण विघातक आहे. पुरुष आणि स्त्री यांची जबाबदारी समसमान असतां फक्त स्त्रियांच्यावरच सर्व नियमांचें ओझें लादून पुरुष नियमांना लाथेनें झुगारून देण्याच्याच नादांत असले तर असला समाज लवकरच भ्रष्ट होईल; त्याची नीतिमत्ता एकदम रसातळास जाईल. नियम हे पाहिजेत, मात्र ते समसमान असावेत. नियम पाहिजेत म्हणून स्त्रियांच्यावरच ते लादा आणि पुरुषांना मोकळे ठेवा असा विपरीत वितंडवादी कोणी असेल असें वाटत नाहीं. लग्नसंबंधाचा नाजूक ऋणानुबंध कायम ठेवावयाचा असेल तर शिस्तीच्या आणि नीतीच्या कडक नियमांचें वज्रच तें कार्य करूं शकेल. आणि त्या वज्राचा तडाखा फक्त गुन्हेगारांच्या

डोक्यांत बसेल. तेव्हां शिक्षचे नियम कडक केले ह्मणून जसे प्रामाणिक मनुष्यांनीं भिण्याचें कारण नाहीं. तद्वतच वैवाहिक संबंधाचें उल्लंघन उभयपक्षांपैकीं कोणाकडूनहि झाल्यामुळें कडक शिक्षा होण्याच्या योजनेनें नीतिनियमानें चालणारांनीं भीति बाळगण्याचें कारण नाहीं. क्षेत्राचें पावित्र्यरक्षण या शब्दजालानें बहकून जाऊन अशक्य अशीं नीतिबंधनें आपण स्त्रियांवर घालूं लागलों तर नैसर्गिक क्रीयेच्या विरोधाचाच तो एक कार्यक्रम होऊन तो अपेशी होणारच, आणि त्याचबरोबर अनीति लपविण्याकरितां इतर सहस्र गुन्हे करण्यास आपण पर्यायानें त्यांनां उत्तेजन देतों याकडे लक्ष कोणाचें कधीं जातें कां? क्षेत्राप्रमाणेंच बीजाचेंहि पावित्र्य राखणें जरूर आहे. उलट क्षेत्र दुर्बल असलें तथापि 'बीज जर शुद्ध' असेल तर वंशवृक्षावर लटकणारीं 'फळें रसाळ गोमटीं' अशींच असावयाचीं. वंशाची उत्क्रांति होण्यास क्षेत्रापेक्षां बीजाच्या जिवंतपणाचीच जास्त जरूर असते असा सिद्धांत इतिहास, आणि शारीरशास्त्र सांगत असतां नीतिनियम घालून देऊन बीजाचा पवित्रपणा शाबूत ठेवण्याची खबरदारी न घेणारे फक्त क्षेत्राच्या पावित्र्याचें रक्षण झालें पाहिजे असें प्रतिपादूं लागले म्हणजे त्यांच्या त्या करण्यांत पक्षपाती हटवादीपणा नसल्यास निरंकुश असा मूर्खपणा तरी असेल. त्याशिवाय तिसरें उत्तर निघत नाहीं. क्षेत्राची आणि बीजाची जोपासना चांगली झाली पाहिजे, त्यांत अनीतीचें विष कालविलें जातां कामा नये; असें विष दोहोंपैकीं एकांत जरी दृग्गोचर झालें तरी त्याचा संपर्क आपणांस लागूं नये म्हणून बाजूस सरण्याचा अगर कायमचा संबंध तोडण्याचा मार्ग मोकळा करून देण्यांतच आपण नीतिनियम अधिक प्रामाणिकपणानें आणि कसोशीनें पाळणार आहोंत. दांभिकपणा, परदुःखाबद्दलची बेफिकीरवृत्ति, अप्रामाणिकपणा, इत्यादि गोष्टी टाकून देऊन सरळ मनानें विचार केल्यास या रौरवांतून कांहीं तरी मार्ग काढला पाहिजे असेंच वाटेल. ज्यास इतकेंहि समजण्यास जरूर ती सदयता नाहीं, सहृदय नाहीं, अशाशीं वितंडवाद घालण्यांत अर्थ नाहीं; व ते विद्वान् असले तर त्यांच्या पाखंडास तत्त्वनिष्ठेचा खोटा डौल मात्र येतो. नवीन पिढी दंभ आणि अप्रामाणिकपणा याजपासून बरीच अलिप्त होत चालली आहे आणि अशा उदारमतवादी सुपुत्रांवरच जर स्वसंकटनिवारण्याचा भार आर्यांनीं टाकावयाचा नाहीं तर कोणावर?

## स्त्रियांचे मिळकतीवरील हक्क

स्त्रियांनां कन्या आणि भार्या अशा दोन लग्ननिमित्त निरनिराळ्या अवस्था प्राप्त होत असतात, आणि त्या दोन निरनिराळया अवस्थांनां अनुलक्षूनच स्त्रियांच्या हक्कासंबंधींचा कायद्याच्या दृष्टीनें विचार करण्यांत येत असतो, असें जरी असलें तरी वैधव्य स्थितींतील हक्कासंबंधींचीहि चर्चा एका स्वतंत्र मथळयाखालीं केल्यास विषयविवेचनाच्या दृष्टीनें सुलभ जाईल. याकरितां त्याजबद्दल स्वतंत्र एका भागांत लिहिण्याचें ठरविलें आहे. प्रस्तुतच्या भागांत सुवासिनींच्या मिळकतीवरील हक्कासंबंधीचाच विचार करावयाचा आहे.

## सुवासिनी

ज्या कुळांत जन्म घेतला त्या कुटुंबाची ती कन्या होय आणि तिच्या त्या कुटुंबांतील हक्काची चर्चा करितांना तिला कुटुंबाची कन्या ह्मणून संबोधितात. लग्नाच्या निमित्तानें तिचें जन्मदात्या कुटुंबाशीं असलेलें नातेंगोतें नाहींसें होऊन जणूं काय तिचा जन्म लग्नघटकेपासून पतीच्या कुटुंबांत झाला अशा तऱ्हेनें तिच्या हक्कांची वासलात लावण्यांत येते. आणि लिखितानें ह्मटल्याप्रमाणें 'एकत्वं सांगता भर्तुः पिण्डगोत्रे च सूतके' (भार्या ही पतीच्या पिण्डगोत्र आणि सूतकाच्या बाबतींत एकरूप होते) तसेंच तिचे माहेरच्या इस्टेटींतले वारसासंबंधाचे हक्क वगळले तर माहेरच्या कुटुंबाच्या मिळकतीशीं तिचा संबंध पार तुटतो. फार काय पण विपन्नस्थिति प्राप्त झाली असतांनाहि तिला माहेरच्या मंडळीकडून केवळ अन्नवस्त्रहि मागण्याचा हक्क मुंबई हायकोर्टाच्या एका ठरावानें नाकबूल केलेला आहे. तिला नवऱ्याच्या येथें आणि त्याच्या कुटुंबाच्या मिळकतींत काय काय हक्क मिळतात तें पाहूं. वास्तविकरीत्या पाहतां स्मृतिकारांच्या ह्मणण्याप्रमाणें तिला पतीच्या मिळकतींत समसमान मालकी मिळते. इतकेंच नव्हें तर पतिपत्नी यांची मिळून समायीक मिळकत समजावी असें 'दंपत्योर्मध्यगं धनम्' (दत्त. पतीपत्नी यांची मिळकत समायीक होय,) या वचनांत स्पष्ट ह्मटलेलें आहे. इतकेंच नव्हे तर खालील मिताक्षरामधील विस्तृत उतारा वाचूनहि तसेंच ह्मणावें लागेल.'जायापत्योर्न विभागो विद्यते' (पतिपत्नी

यांच्यांत वाटप होऊं शकत नाहीं ) या आपस्तम्वाच्या वचनावर टीका करितांना ह्मणतात ' सत्यम्। श्रौतस्मार्ताग्निसाध्येषु कर्मसु तत्फलेपु च विभागाभावो न पुनः सर्वकर्मसु द्रव्येपु च. ( बरोबर आहे. विभागाचा अभाव जो सांगितला आहे त्याचा संदर्भ फक्त श्रौतस्मार्त अग्निसाधना पुरताच आणि त्यापासून मिळणाऱ्या फलांपुरताच होय. परंतु सर्व कृत्यें आणि मिळकतीसंबंधीं तें युक्त नाहीं. ) असें सांगून अग्निहोत्र टेवणें हें प्रत्येक गृहस्थाश्रमी माणसाचें कर्तव्य असून पतिपत्नी यांनीं अग्निहोत्र संभाळलें पाहिजे, तेव्हां उभयतांचें ऐक्य धर्मकृत्यांत असणें जरूर आहे वगैरे विवेचन करून टीकाकार पुढें म्हणतात ' ननु द्रव्यस्वामित्वेऽपि सहत्वमुक्तम् । द्रव्यपरिग्रहेषु च । न हि भर्तुर्विप्रवासे नैमित्तिके दाने स्तेयमुपदिशन्तीति । सत्यम् । द्रव्यस्वामित्वं पत्न्या दर्शितमनेन । न पुनर्विभागाभावः यस्माद्द्रव्यपरिग्रहेषु चेत्युक्त्वा तत्र कारणमुक्तम् । भर्तुविप्रवासे नैमित्तिकेऽवश्यकर्तव्ये दानेऽतिथिभोजनभिक्षाप्रदानादौ हि यस्मान्न स्तेयमुपदिशन्ति मन्वादयस्तस्माद्भार्यायामपि द्रव्यस्वामित्व, मस्ति । अन्यथा स्तेयं स्यादिति । तस्माद्भर्तुरिच्छयभार्याया अपि द्रव्यविभागो भवत्येव न स्वेच्छया । यथा वक्ष्यति । ' यदि कुर्यात्समानंशान्पत्न्यः कार्याः समांशिका ' इति ॥ ( असेंहि म्हणतां येईल कीं पतिपत्नी यांची मिळकतीवरची समसमान मालकी मान्य केलेली आहे मिळकत संपादनाच्या बाबतींतहि नसेंच. कारण पतीच्या गैरहजिरींत पत्नीनें कारणपरत्वें द्रव्याचा व्यय केला असतां तें कृत्य चौरकर्म ह्मणून समजत नाहींत, तें बरोबर आहे; परंतु या वचनावरून पत्नीची मिळकतीवरची मालकी दाखविलेली असून वाटपाचा अभाव हा दाखविलेला नाहीं इत्यादि. कारण द्रव्यसंपादनाविषयीं सांगितल्यावर ग्रंथकारानें या सिद्धांताचा हेतु सांगितला आहे.तो असा,मनुआदिकरून ज्यापेक्षां पतीच्या गैरहजिरींत पत्नीनें नैमित्तिका आवश्यक प्रसंगीं, दानादि कार्यांत, अतिथीस भोजनदान इत्यादि कारणानें द्रव्य खर्च केलें तरी ती चोरी ह्मणून समजत नाहींत; त्याअर्थीं पत्नीस मिळकतीवर स्वामित्व अर्थात् असतें. नाहींतर तें कृत्य चौरकर्म होईल. ह्मणून पतीच्या इच्छेनुसार पत्नीस भाग मिळूं शकतो. परंतु तिच्या इच्छेनुसार नव्हे. ग्रंथकार पुढें ह्मणतातच कीं, त्यानें जर समान भाग केले तर पत्नींनां समान भाग द्यावेत. ) यावरून दिसून येईल कीं, स्मृतिकालीं पत्नी ही पतीच्या मिळकतींत समसमान मालक ह्मणून समजली जात असे. खुद्द आपस्तम्वाच्या सूत्रांतहि तसाच अर्थ अभिप्रेत आहे " जायापत्योर्न विभागो विद्यते पाणिग्रहणाद्धि सहत्वं कर्मसु तथा पुण्यफलेषु द्रव्यपरिग्रहेषुच न हि भर्तुविप्रवासे नैमित्तिकेदाने स्तेयम् उपदिशन्ति । ( पतिपत्नी यांच्यांत वाटणी होणार नाहीं. कारण लग्नापासून सर्व कार्यांत एकत्रपणा उक्त आहे. तसेंच पुण्यफलाचें ठायीं, तसेंच मिळकतीच्या मालकीविषयीं. कारण पतीच्या गैरहजिरींत नैमित्तिक दानादिकार्यांत मिळकत खर्च करणें ही चोरी नव्हे असें ह्मटलेलें आहे. ) पतीच्या मालमिळकतींत पत्नीचा समसमान मालकी हक्क असून ज्याप्रमाणें खुद्द पुरुषाला स्वतःच्या मुलाच्या बरोबरीचा हिस्सा वांटणींत मिळतो त्याचप्रमाणें त्याच्या पत्नीसहि वांटणीचे प्रसंगीं मुलाबरोबर हिस्सा देण्याची आज्ञा आहे. या योजनेंतहि स्त्री ही पुरुषाची सहभागदार आहे असेंच निष्पन्न होतें. पतीच्या हयातींत त्यानें जर वाटण्या केल्या तर 'यदि कुर्यात्समानांशान्पत्न्यः कार्याः समांशिकाः । न दत्तं स्त्रीधनं यासां भर्त्रा वा श्वशुरेण वा ॥' (याज्ञवल्क्यः–त्यानें जर समसमान भाग केले तर ज्यांनां सासऱ्याकडून अगर नवऱ्याकडून स्त्रीधन मिळालें नाहीं अशा भार्यांनां समसमान भाग वाटणींत द्यावे.) पित्याच्या पश्चात् पुत्रांनीं अविभक्त मिळकतीची वांटणी केली तर त्या प्रसंगींसुद्धां मातेला पुत्राबरोबर हिस्सा मिळतो असे ' पितुरुर्ध्वं विभजतां माताऽप्यंशं समं हरेत् ।' (याज्ञवल्क्यः–पित्याच्या पश्चात् वारसांनीं वांटणी केल्यास मातेलाहि समान भाग द्यावा ) तसेंच ' मातरः पुत्रभागानुसारिभागहारिण्यः ।' ( विष्णुः— मातांनां पुत्रांच्या बरोबरीनें भाग मिळतो ) इतकेंच नव्हे तर निपुत्रिक अशा मातांनां, तसेंच आज्यांनां मुलाच्या हिश्याबरोबर हिस्सा मिळावा असें सांगितलें आहे. ' असुताश्च पितुः पत्न्यः समानांशाः प्रकीर्तिताः । पितामह्यश्चताः सर्वा मातृतुल्याः प्रकीर्तिताः ॥' (व्यासः– निपुत्रिक मातांनांहि समसमान हिस्सेदार समजावेत. तसेंच आज्या या मातृतुल्य होत. ह्मणजे त्यांनांहि सारखा हिस्सा द्यावा ). प्रथम पत्नी हयात असतांना तिला टाकून योग्य कारणाशिवाय दुसरें लग्न करणाऱ्या पतीपासून जो तिसरा हिस्सा प्रथम भार्येस देण्याविषयीं " आज्ञासंपादिनी दक्षां वीरसूं प्रियवादिनीम् ।

त्यजन्दाप्यस्तृतीयांशमद्रव्योभरणं स्त्रियाः ॥" जी आज्ञा आहे तिचेंहि मर्म तेंच होय. प्रथम भार्येचा दुसऱ्या लग्नानंतर अर्थात् सारखा हिस्सा न राहतां तिसरा हिस्सा झाला तेव्हां तो हिस्सा तिला देण्याची व्यवस्था केलेली असावी. पतीच्या हयातींत वांटणी झाली असतां त्याच्या पत्नीस पुत्रांच्या बरोबरीनें हिस्सा देण्याचें धोरण प्रचलित कायद्यांतहि आहे. पतीच्या हयातींत पति आणि पुत्र यांच्यांत वांटणी होण्याचा प्रसंग आल्यास पत्नीस मुलाच्या हिश्याच्या बरोबरीनें हिस्सा मिळूं शकतो. इतकेंच नव्हे तर स्वतःच्या पतीच्या हिश्यापासून स्वतंत्र रीतीनें त्याचा तिला उपभोग घेतां येतो. ( दुलार कुवारी वि. द्वारकानाथ ३२ क. २३४: जयराम वि. नथु ३१ मुं. ५४: सुमरून वि. चंद्रमण ८ क. १७ ) मात्र तिला स्वतः वांटणी मागण्याचा हक्क नाहीं. ( पुन्हा बी. बी. वि. राधाकिसन ३१ क. ४७६ ) तसेंच नवऱ्याच्या पश्चात् पुत्रांच्यामध्यें वांटणी होण्याचा प्रसंग आल्यास तिजला पुत्राच्या बरोबरीनें हिस्सा मिळतो (दामोदर वि. सेनापती ८ क ५३७: दामोदरदास वि० उत्तमराम १७ मुं. २७१: गणेशदत्त वि० जेवाच ३१ क. २६२ ) मात्र तिला स्वतःला भाग पाडून मागतां येत नाहीं. तसेंच आजीलाहि नातवांच्यांत वांटणी होत असेल तर स्वतःच्या पुत्राबरोबर आजीला भाग मागतां येतो ( कन्हैयालाल वि. गौरा ४७ अ. १२७: विठ्ठल वि. प्रल्हाद ३९ मुं. ३७३ ) वरच्याच प्रमाणें तिला स्वतःला वांटणी करून भाग मागतां येत नाहीं. आजीच्या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट म्हणजे ही आहे कीं, नातवांच्यांत वाटणी होणार असली तरी तिच्या मुलाचा जेवढा भाग पडला असता तेवढा भाग ती मागूं शकते. वांटणीच्यावेळीं जो भाग द्यावयाचा तो फक्त अन्नवस्त्राची तरतूद म्हणूनच जर द्यावयाचा असता तर निराळा भाग न देतां तशी व्यवस्था करण्यास फर्माविलें असतें तरी पुरे होतें. अनंश अगर वांटणींत भाग मिळण्यास असमर्थ म्हणून कायद्यानें ज्यांना ठरविलें आहे अगर त्यांच्या विधवा स्त्रिया यांचा ज्याप्रमाणें अन्नवस्त्राचा बंदोबस्त वांटणीच्या वेळीं करण्यांत येतो तद्वतच बायको, आई अगर आजी यांची व्यवस्था करण्यास हरकत नव्हती. इतर समाश्रित व विधवा यांच्या पंक्तीस त्यांना नेऊन बसविलें नाहीं याचें कारण म्हणजे मिळकतींत असलेला त्यांचा अंशतः मालकी हक्कसंबंध होय. स्त्रियांनां अन्नवस्त्राशिवाय पतीच्या कुटुंबांत जास्त कांहीं हक्क मिळूं नयेत असा धर्मशास्त्रकारांचा अभिप्राय दिसत नाहीं. पतीनें स्वतःच्या मुलांच्या वांटण्या करून दिल्या त्यावेळीं अर्थात् भार्येस निराळा मुलाच्याबरोबरीनें भाग देण्याचें काय कारण? उलट भार्येचें पोषण करण्यास पति हा व्यक्तिशः जबाबदार असतां तिला स्वतंत्र हिस्सा देण्याचें काय प्रयोजन? शिवाय पतीनें स्वतःकरितां ठेवलेला हिस्सा त्याच्या पश्चात् तिच्या अन्नवस्त्राचा बोजा सहन करूं शकला असता. अशी व्यवस्था न करितां भार्येस, मातेस, आणि पितामहीस मुलांच्या समसमान हिस्से द्यावेत असें ठरविण्यांत त्यांचें कुटुंबाच्या मिळकतीवरील सहभागित्व, कबूल केल्याप्रमाणें होत आहे.

प्रचलित कायद्याच्या ठरावांत या गोष्टीचा बराच विपर्यास झालेला दिसत असून, सहमालकीपणाचा जुन्यापुराण्या काळचा स्त्रियांचा आधार काढून घेण्यांत आल्यानें त्यांनां निराधार आणि बापुड्या स्थितींत लोटल्याचें श्रेय आजच्या कायद्यास द्यावें लागतें. भार्या अगर विधवा यांच्या अनुकंपनीय स्थितीचें मूळ कारण यांतच आहे. पतीच्या मिळकतीवर अन्नवस्त्राशिवाय त्यांचा दुसरा मालकी वगैरे हक्क नाहीं इतकेंच नव्हे तर या अन्नवस्त्राचा हक्कहि विशेष प्रयासाशिवाय नष्ट करितां येतो. स्त्रियांच्या कायदेशीर दुर्दशेचें जर निवारण करावयाचें असेल तर त्यांनां पतीच्या मिळकतींत समसमान मालकीपणाचे हक्क दिले पाहिजेत आणि त्या एकाच सुधारणेनें स्त्रियांच्या वैवाहिक आयुष्यांतील महान् कष्टमय स्थिति नाहींशी होणार आहे. आजच्या कायद्यानें एका ठरावांत पत्नीहि पतीच्या मिळकतींत गौण अर्थानें मालक आहे असें मानिलेलें असलें ( जम्ना वि. मचुळ २ अ. ३१५ ) तरी ही गौणप्रकारची मालकी म्हणजे मालकी या शब्दांत फक्त केलेल्या मुख्य लक्षणाशिवायची पोकळ मालकी होय असें मुंबई हायकोर्टाचें मत आहे ( नर्मदाबाई वि. महादेव ५ मुं. १०३ ) त्यावर कलकत्ता हायकोर्टानें असें ठरविलें कीं, मिळकतीची वांटणी मागणें अगर तिऱ्हाईताच्या पासून अन्नवस्त्र मागणें या दोन गोष्टी अमलांत आणण्याच्या दृष्टीनें ही मालकी समजावयाची नाहीं. बाबु गोलपचंद्र शास्त्री यांचें मत असें आहे कीं, नवऱ्याच्या हयातींत अगर पश्चात् मुलांच्यांत वांटणी होते त्या प्रसंगीं

मातेस जो हिस्सा मिळतो तो, लग्नाच्या घटकेपासून पतीच्या मिळकतींत तिची समसमान मालकी जी उत्पन्न होते त्या सहमालकीपणामुळेंच होय; मिताक्षराच्या मतें वांटणीच्यामुळें नवीन हक्क अगर मालकी उत्पन्न होत नसून अस्तित्वांत असलेल्या हक्कहितसंबंधाच्या अनुरोधानेंच वांटणी होत असते. गोलपचंद्रशास्त्री यांचा हा अभिप्राय कलकत्ता हायकोर्टनें एका ठरावांत पर्यायानें पसंत केला आहे. ( दुलर कुवारी वि. द्वारकानाथ मित्र ३४ क० २३४ ).

वरील सूचनेचें महत्व खालील चर्चेवरून समजण्यासारखें आहे. पतीच्या हयातींत आज पत्नीस त्याजपासून अन्नवस्त्र मागतां येतें परंतु त्या रकमेबद्दल पति हा व्यक्तिशः जबाबदार असून त्या अन्नवस्त्राचा बोजा त्याच्या मिळकतीवर पडत नाहीं, त्याचा परिणाम असा होतो कीं, नवऱ्यानें आपली मिळकत विकून टाकली अगर त्याच्या कर्जांत त्या मिळकतीचा लिलांव झाला तर त्याच्या पत्नीस अगर विधवेस त्या मिळकतींतून अन्नवस्त्राचा हक्क मागतां येत नाहीं; अगर पतीच्या घरांत राहण्याचा हक्क अमलांत आणितां येत नाहीं. फार काय पण पत्नीचा अन्नवस्त्र मिळण्याचा हक्क आहे असें माहीत असूनहि जो मिळकत विकत घेतो त्याच्यावरहि तिच्या अन्नवस्त्राच्या रकमेची जबाबदारी पडत नाहीं; तसेंच कुटुंबाच्या अगर पतीच्या मिळकतींतून अन्नवस्त्र मिळालें पाहिजे असें तिला ह्मणतां येत नाहीं. ( मणिलाल वि. बाई तारा १७ मुं. ३९८: जयन्ती वि. आलमेलु २७ म. ४५: गंगाबाई वि. जानकीबाई ४५ मुं. ३३७:) मात्र बायकोच्या अन्नवस्त्राच्या हक्कास बाध येईल या हेतूनें जर तिचा नवरा आपली सर्व मालमिळकत कोणास बक्षीस देईल अगर मृत्युपत्र करून देईल तर मात्र तिचा अन्नवस्त्राचा हक्क मिळकत घेणाराच्या विरुद्ध तिला अमलांत आणिता येतो. ( बचु वि. मोतीना २३ अ ८६ जयतारा वि. रामहरी १० क. ६३८ वगैरे ).

आईबाप, भार्या आणि लहान मुलें यांनां पोसण्याची जबाबदारी व्यक्तिगत अशी शास्त्रानें टाकली असली तरी ती फक्त व्यक्तिमात्रापुरतीच मर्यादित आहे असें ह्मणणें बरोबर होणार नाहीं. बायकोला पोसण्याची जबाबदारी नवऱ्याच्या शिरावर आहे मग त्यास मिळकत असो वा नसो असें जे शास्त्राचें ह्मणणें आहे त्यावरून फक्त व्यक्तिशः नवराच कायतो जबाबदार आहे; परंतु त्याची मिळकत जबाबदार मुळींच होणार नाहीं असें ह्मणणें युक्तीला धरून नाहीं अगर तर्कशुद्ध नाहीं. जर दरेक स्त्रीचा अन्नवस्त्रापुरता हक्क तिच्या नवऱ्यावरच व्यक्तिशः पडावयाचा तर त्याच्या पश्चात तो मिळकतींतून पुरा करण्याची तरी कां आज्ञा असावी ? रमाबाई वि. त्रिंबक ९ मुं. हा. को. री. २८३ च्या कामांत अविभक्त कुटुंबांतून आणि तेहि पण नवऱ्याच्या हयातींत इतर बंधूच्याजवळून भार्येस नवऱ्याच्या उत्पन्नाच्या तिसऱ्या हिश्यापर्यंत अन्नवस्त्राकरितां उत्पन्न देण्याचा ठराव झाला; त्यांतूनहि कांहीं अर्थ निष्पन्न होण्यासारखा आहे. एकतर असें कीं अन्नवस्त्राचा बोजा जरी नवऱ्याच्या शिरावर त्याच्या हयातींत असला तरी तो त्याच्या व्यक्ती पुरताच मर्यादित नसून त्याची जी जी मिळकत ह्मणून ह्मणतां येईल त्यांतून पुरा केला पाहिजे; आणि दुसरें असें कीं, अविभक्त कुटुंबांतहि नवऱ्याचा विशिष्ट भाग असल्यानें आणि त्याच्या भागाचा उपयोग इतर करीत असल्यानें त्याच्या भार्येस जणूं काय तो विभक्त आणि स्वतंत्र हिस्सेदार ह्मणून समजून त्याच्या हिश्शाचा तिसरा भाग अन्नवस्त्राकरितां देतां येतो. अशीं दोन सुंदर प्रमेयें त्या ठरावांतून निघूं शकतात. आजच्या कायद्यांत नवऱ्याच्या मिळकतींतील सहभागित्व अल्पांशानें जरी इतर कांहीं कारणाकरितां मान्य करण्यांत आलें असलें तरी त्यास पर्यायानें हरताळ फासण्यांत आलेला असून भार्येला पतीच्या मिळकतीवर अन्नवस्त्राचा बोजाहि टाकतां येत नाहीं. येथपर्यंत त्या विवेचनाची मर्यादा जाऊन पोहोंचते त्याअर्थीं भार्येस अत्यंत निराधार स्थितींत आणून सोडण्यांत आलें आहे असेंच ह्मणावें लागेल. एका अर्थानें विधवेपेक्षांहि तिची अनुकंपनीय स्थिति आहे. कारण विधवेस मयत पतीच्या मिळकतींतून अन्नवस्त्र तरी मागतां येते, या अन्यायाचें दुष्परिणाम पहाण्यास समाजव्यवस्थेच्या खालच्या थरापर्यंत नजर टाकली पाहिजे. सुव्यवस्थित आणि निर्व्यसनी आयुष्य कंठणारांनां यांत अन्याय असेल असें वाटणार नाहीं, उलट ही एक काल्पनिक भीतीची चिथावणी दिल्यासारखें दिसेल. नवरा दुर्व्यसनी आहे, मद्यादि व्यसनांत, व्यभिचारादि दुष्कृत्यांत, शर्यती सट्टेबाजींच्या भोंवऱ्यांत सांपडला असून स्वतःच्या मिळकतीची बेपर्वाईनें उधळपट्टी करीत आहे अशा वेळीं मिळकत बचावण्यास त्याच्या

पत्नीच्या हातांत कांहींच साधन नाहीं. तसेंच त्यानें कुटुंबाच्या पोषणासाठीं अगर दुसऱ्या जरूरीच्या योग्य कारणाकरितां नव्हे तर केवळ दुर्व्यसनाकरितां, सट्टेबाजीकरितां, कर्ज केलें आणि त्या कर्जापायीं मिळकतीचा जर लिलांव होऊं लागला तर तिला कशाच्याच आधारावर मिळकतीचा बचाव करितां येत नाहीं. तिचे मुलगे असें ह्मणूं शकतील कीं, पित्याचें कर्ज अनीतीचें होतें तेव्हां फक्त पित्याचा भागच कायतो जबाबदार होईल, सर्व मिळकत जबाबदार धरितां येणार नाहीं. आणि जेव्हां मिळकतीची वांटणी करण्याचा प्रसंग येईल त्यावेळीं पत्नी ह्मणून तिला मिळकतीपैकीं मुलांच्या बरोबरीनें हिस्साहि मिळूं शकेल.

हा खरोखर अन्याय आहे. लग्नामुळें तिचा जन्मच पतीच्या घरांत झाला असें मानावयाचें, तिला नवऱ्याच्या मिळकतीची बरोबरीनें मालकीण ह्मणून समजावयाची परंतु त्या मिळकतीवर तिचा कांहीं हक्क नाहीं असें ह्मणावयाचें हें बरोबर नाहीं; आणि भार्येच्या मिळकतीसंबंधीच्या हक्कांबद्दल अशी सूचना करणें कीं–

**लग्नघटकेपासून विवाहित स्त्री आपल्या नवऱ्याची मुलाप्रमाणें सहभागदारीण आहे असें समजून तिला पुत्राच्या बरोबरीनें सहभागीदारीपणाचे सर्व हक्क मिळावेत. मात्र नवऱ्याच्या हयातींत आणि त्याच्या इच्छेविरुद्ध तिला एक सहभागिदार ह्मणून वांटणी मागतां यावयाची नाहीं.**

## सूचनेचें महत्त्व

वरील सूचना अत्यंत महत्त्वाची असून स्त्रियांच्या हक्कासंबंधीचा बिकट प्रश्न सोडवितांना तर आमच्यामतें या सूचनेइतकी सुलभ आणि कार्यक्षम परंतु जुन्या परंपरेला धरून अशी दुसरी कोणतीच योजना असूं शकणार नाहीं. या सूचनेची विस्तृत चर्चा करण्याच्या अगोदर एका महत्त्वाच्या मुद्यासंबंधीचा विचार करूं. हिंदुधर्मशास्त्रांत कुटुंब हा एक समाजाचा अंतीम घटक ह्मणून समजला गेला असून कुटुंब या संस्थेचें अस्तित्व जेणेंकरून सुरक्षित राहील अशी योजना धर्मग्रंथांमधून केलेली आढळते. हिंदुधर्मशास्त्र हा व्यक्तींचा कायदा नसून प्रामुख्यानें कुटुंबाचा कायदा आहे; आणि पर्यायानें व्यक्तिमात्रांच्या हक्कहितसंबंधाचा विचार जरी त्यांत केलेला असला तरी तो, कुटुंबाच्या कोंदणांत दरेक व्यक्तीस बिनबोभाट कसें बसविनां येईल आणि एकंदर कुटुंबव्यवस्था सुरळीत कशी चालेल, याच दृष्टीनें केलेला असावा असें वाटतें. कुटुंबांत स्त्रीपुरुषांचा समावेश होत असला तरी कुटुंबाचा मुख्य घटक पुरुष असतो. त्यावरून स्त्रियांना कुटुंबांत कांहींच दर्जा नाहीं अगर मालकी नाहीं असें ह्मणणें मात्र बरोबर होणार नाहीं. बाह्य जगाशीं संबंध आला तर पुरुष हा जरी कुटुंबाचा कर्ता ह्मणून दिसला तरी अंतर्व्यवस्थेंत त्याची स्त्रीहि तितक्याच प्रकारानें मालकी हक्क उपभोगूं शकते. 'दम्पत्योर्मध्यगं धनम्' यांत दर्शविल्याप्रमाणें सर्व इस्टेटहि पतिपत्नींची समायीक मालकीची आहे. कुटुंबें दोन प्रकारचीं आहेत. एका पूर्वजापासून उत्पन्न होऊन पुत्रपौत्रादि शाखांनीं युक्त अशा एकाद्या प्रचंड वडाच्या वृक्षाप्रमाणें भासणारा वंशवृक्ष एकत्र रहात असतां त्यांस अविभक्त कुटुंब ह्मणतात; परंतु मूळच्या झाडाशीं असलेला डाहळीचा संबंध तोडून टाकला ह्मणजे दरेक पारंबीगणिक जसें स्वतंत्र वडाचें झाड उत्पन्न करितां येतें तद्वतच निरनिराळे वंशज विभक्तपणानें मूळच्या कुटुंबापासून निराळे होऊन स्वतःचें लहानसें कुटुंब तयार करूं शकतात; आणि अशा कुटुंबास स्वतंत्र असें विभक्त कुटुंब ह्मणून समजतात. भार्येच्या दृष्टीनें विभक्त अगर अविभक्त कुटुंबांत फारसा फरक पडत नाहीं; वैधव्य स्थितींत फार मोठा फरक पडतो परंतु त्याचें विवेचन पुढें येणार आहे. तेव्हां वरची जी सूचना आम्ही मांडीत आहोंत ती विभक्त अगर अविभक्त कुटुंबास सारखीच लागू पडणारी अशी आहे. दोन्हीप्रकारच्या कुटुंबांच्या रचनेंत पुरुष घटक ह्मणून तिच्या पतीचा अबाधित असा कांहीं तरी विशिष्ट हक्कहितसंबंध आहे आणि त्या हक्कहितसंबंधाचीच पोट हिस्सेदार त्याची भार्याहि असावी असेंच सूचनेंत ध्वनित केलेलें आहे. कुटुंबव्यवस्था हें एक धर्मशास्त्राचें गमक असें धरिल्यावर अर्थात् त्या कुटुंबाच्या परिभाषेंतच आणि विशेषतः नुसता दिखाऊ नव्हे तर भरीव व दुसऱ्यास हिरावून घेतां येणार नाहीं असा हक्क व्यक्त करण्याच्या उद्देशानें वरील सूचनेंत तिला नवऱ्याची सहभागदारीण समजली जावी असें स्पष्ट नमूद केलेलें आहे. तिला भागिदार ठरविलें यांत पूर्वपरंपरा आणि शास्त्राधार यास विरोध येईल असें कांहींच केलें नाहीं. उलट जो अर्थ धर्मशास्त्रकारांच्या विवेचनांत अभिप्रेत असूनहि थोडाफार

अव्यक्त होता तो येथें स्पष्ट करीत आहोंत. वर विस्तारानें त्याबद्दलचें विवेचन येऊन गेलेंच आहे, आणि त्याची पुनरुक्ति करण्यांत हांशील नाहीं. तसेंच तिला जर सहभागदार ह्मणून ठरविलें असलें तरी तिचा हक्क-संबंध नवऱ्याच्या पुत्राच्या हिश्यापुरता मर्यादित केलेला आहे; त्यांतहि वांटणीच्या वेळीं जो तिला पुत्राच्या बरोबरीनें हिस्सा देण्याची योजना आहे, त्या योजनेनुसार आहे इतकेंच नव्हे तर त्या योजनेंत जें एक तत्त्व गोवलेलें आहे, त्या तत्त्वाचा पुरस्कारहि यांतच होणार आहे. तसेंच तिच्या नवऱ्याच्या मुलांचे हिस्सेहि अगदीं बिनचूक ठरवितां येणारे असल्यानें तिचा हिस्सा, मग तो विभक्त कुटुंबांत असो वा अविभक्त कुटुंबांत असो, ठरविण्यास कोणतीच अडचण येणार नाहीं. नवऱ्याच्या हयातींत तिला स्वतः वांटणी मागण्याचा हक्क नाहीं असें जें सुचविलें आहे तें समाजव्यवस्थेची घडी बिघडूं नये यासाठींच मुद्दाम नमूद केलेलें असलें तरी हारित याच्या 'जायापत्योर्विभागो न विद्यते' ( नवरा बायकोच्यांत वांटणी होत नाहीं ) या सुप्रसिद्ध वचनाचें पालनहि अनायासें होत आहे. स्त्रिया स्वतंत्र होऊन फटकून राहूं लागतील तेव्हां त्यांनां नवऱ्याच्या हयातींत स्वामित्व देऊं नये असें काकुळतीनें ह्मणणारा जुन्या मतवाद्यांचा पक्ष आहे, तेव्हां नवऱ्याच्या हयातींत त्यांनां वांटणी मागतां येत नाहीं या खबरदारीनें त्यांचें समाधान होईल तर कर्कशा स्त्रीस अन्नवस्त्रालाहि महाग करून तिला वठणीवर आणूं पहाणाऱ्या कठोर वृत्तीच्या पुरुषांनां भार्येचा दाणागोटा तोडून तिचा वृथाभिमानाचा किल्ला हस्तगत करण्याचें अमोघ अस्त्र हातीं कायम राहिल्याचेंहि या योजनेंत दिसून येईल; आणि त्याची भीति नाहींशी होईल.

## सूचनेपासून फायदे

आतां या योजनेपासून काय विषेश फायदे आहेत तें पाहूं. पतीच्या मिळकतींत पत्नीचा पुत्राप्रमाणें सहभागिदारीचा हक्क एकवेळ मानला ह्मणजे अर्थातच पुत्राला ज्याप्रमाणें कायद्याचें रक्षण मिळतें तद्वतच भार्येसहि मिळेल. नवऱ्यास सर्व मिळकत योग्यकारणांवांचून उडवून टाकतां यावयाची नाहीं. त्यानें जरी सर्व मिळकत विकली अगर त्याच्या कर्जापायीं मिळकत त्याच्या हयातींत अगर पश्चात् लिलांव होण्याची वेळ आली तरी त्यांतला फक्त नवऱ्याचाच हिस्सा काय तो विकला जाईल आणि त्यामुळें दुर्व्यसनानें नवरा आज बायकोची जी अन्नान्न-स्थिति करूं शकतो अगर करण्यास कारणीभूत होतो त्या आपत्तीपासून पत्नीचा बचाव होईल. पुत्रास ज्याप्रमाणें आज वडिलांचें कर्ज अनीतीचें आहे असें ह्मणून आपल्या हिश्याचा बचाव करितां येतो तसाच बचाव स्त्रीसहि करितां येईल. याहिपेक्षां विशेष लाभ ह्मणजे नवरा कांहीं कारणाकरितां कर्ज काढण्यास गेला तर आज जे सावकार त्याच्या बायकोच्या अन्न-वस्त्राच्या हक्काची विचारपूसहि करीत नाहींत तेच उद्यां कर्ज योग्य कारणाकरितां आहे कीं नाहीं, आणि योग्य कारणाकरितां असेल तरी भार्येची त्या कर्जास सही मागतील. आणि येणेंकरून पुरुषांच्या उधळपट्टीस त्याच्या भार्येस पुष्कळच आळा घालतां येईल. निदान स्वतःची अन्नान्नगत तरी ती होऊं देणार नाहीं. कुटुंबाच्या जरूरीच्या खर्चाकरितां ह्मणजे मुलामुलींचीं लग्नकार्ये, शिक्षण मिळकतीचें संरक्षण इत्यादि कारणा-करितां अर्थात् नवऱ्यास कुटुंबाचा कर्ता ह्मणून कर्ज काढण्यास, मिळकत गहाण फरोक्त करण्यास हक्क राहील; त्यामुळें दरेक वेळीं भार्येच्या संमतीची जरूरीहि पडणार नाहीं अगर तिच्या अभावीं सर्व व्यवहार अडकून राहाणार नाहींत. मात्र सावकार त्या कर्जाच्या जरूरीची विशेष छाननी करील आणि आजहि अविभक्त कुटुं-बाच्या कर्त्यास रक्कम व्याजी देतांना अगर मिळकत विकत घेतांना जी खबरदारी त्यांनां घ्यावी लागते तितकीच खबरदारी भार्येच्या हक्काबद्दलहि घ्यावी लागेल. ह्मणजे नवीन कांहीं एक उपक्रम करून पति-पत्नींत फूट पाडून संसाराच्या चालत्या गाड्यास खीळ घालून त्याची गति थांबवावयाची असा उद्देश जरी या योजनेच्या विरोधकांस भासत असला तरी वस्तुतः त्यांत फारसें तथ्य नाहीं. इतर पुरुष सहभागदारांचे हक्क ज्याप्रमाणें अविभक्त कुटुंबांत रक्षण केले जातात तद्वतच स्त्रियांचे हक्कहि रक्षण केले जावेत असें मागणें अत्यंत वाजवी असतांहि अशा योजनेंत जर त्यांस उलथापालथ दिसत असली तर दोष त्याच्या प्रामाणिक-स्वभावाचा नसून विकृत दृष्टीचा आहे कीं, जेणेंकरून त्यांनां सरळ गोष्टी उलट दिसतात. आज कन्या, भार्या, विधवा या सर्वांनां केवळ समाश्रित अगर आश्रितांच्या पंक्तीस बसवून त्यांनां ह्मणजे यच्चयावत् स्त्रीजातीस जन्मा-पासून मरेपर्यंत फक्त अन्नवस्त्र देण्याची जी योजना आहे

ती धर्मशास्त्रासहि संमत नव्हती, आणि धर्मशास्त्रास सम्मत असती तरीहि ही लाजिरवाणी स्थिति परिस्थित्यनुसार बदलली गेली पाहिजे. विवाहित स्त्रीस सहभागिदाराचे हक्क जोपर्यंत देण्यांत येणार नाहींत तोपर्यंत स्त्रीजीवन अत्यंत कष्टमय राहील आणि त्यांच्या आपत्तीचा,विपन्नावस्थेचा प्रतिकार करण्यासारखी महत्त्वाची, तितकीच सुटसुटीत योजना जर कोणती असेल तर ती आह्मी वर सुचविलेलीच होय. याच सूचनेच्या आधारावर कष्टांत कष्टतर असें जें विधवेचें जीवन त्याचेंहि निवारण होऊं शकेल. आणि तें कसें हें यापुढें लवकर सांगण्यांत येणार आहे. तेव्हां अशा एकंदर सर्व बाजूंनीं आणि सर्व दृष्टींनीं वरील सूचना, समर्पक, कार्यक्षम अशी असून जुन्या परंपरेशीं ती जितकी समरस पावणारी आहे तितकीच ती कुटुंबव्यवस्थेशीं एकजीव होणारी असूनहि सुटसुटीत अशी आहे, असें आमचें मत आहे.

## विधवा

हिंदु स्त्रियांच्या वैधव्य स्थितीइतकी दुसरी दुर्धर स्थिति नाहीं. विधवा स्त्रियांची कष्टमय स्थिति जी कायद्यानें घडवून आणिलेली आहे त्या स्थितीस विद्यमानकाळीं प्रचलित असलेल्या दुसऱ्या कोणत्याहि देशांतील अगर जातींतील कायद्यांत तोड मिळणार नाहीं. परंतु समता व भूतदया या दोन मूलभूत तत्त्वांपासून उगम पावून मनुष्यप्राण्यांच्या समूहांत शांतता आणि सुबत्ता चौफेर उधळीत जाणारा धर्मशास्त्राचा महानद लौकिकदृष्ट्या एखाद्या खडकाप्रमाणें निरुपयोगी भासणाऱ्या विधवा-जीवनावर केवळ निर्बंधनाच्या लाटांचे एकसारखे तडाखे मारीत असलेला पाहून त्या दोन उदात्त कोमल तत्त्वांचा अभाव त्याच्या ठिकाणीं आहे असें कोणी ह्मणू लागलें तर त्यास उत्तर देणें कठीण आहे. जन्मतःच गुलाम बनवून स्त्रियांनां पुरुषजातीच्या अंकित करून ठेवणाऱ्या धर्मशास्त्राच्या योजनेप्रमाणें कन्या आणि भार्या या पारतंत्र्याच्या एकावर एक अशा वरचढ पायऱ्या दाखविणाऱ्या अवस्था आहेत असें मानिलें तर त्या योजनेंत वैधव्यस्थितीस त्याच्यावरची पायरी म्हणून गणली पाहिजे. लहानपणीं जन्मदात्या वडिलांचा अभय हस्त व लग्नानंतर पतीचें कृपाछत्र याच्या सावलींत असतांना पारतंत्र्य जीविताचे केवळ कवडसेहि पाहण्यास मिळत नाहींत. तत्रापि तें कृपाछत्र दुर्दैवानें उडवून दिलें ह्मणजे आपत्तीच्या आगींत विधवेस कोणताहि प्रतिकार न करितां निमूटपणें होरपळत पडावें लागतें. सतीची चाल बंद केली हा त्यांच्यावर इंग्रज सरकारनें उपकार न करितां अपकारच केला. नाहीं तर पूर्वकालीन त्यांच्या भगिनींप्रमाणें त्यांनींहि जिवाचें मोल देऊन एका जन्मापुरती तरी या निकृष्ट स्थितींतून सुटका करून घेतली असती. सामाजिक अन्यायाच्या गोष्टी बाजूस ठेविल्या, धार्मिक समजुतीच्या बाबती वगळल्या, तर कायदेशीर हक्कांपुरतें पाहिलें तरी तीच अवस्था. हिंदु स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांचा विस्तार जर कोणत्या गोष्टींत प्रामुख्यानें आणि तावडतोब झाला पाहिजे असेल तर तो विधवांच्या बाबतींत होय, आणि अन्यायाची जाणीव होऊन जर कोणाच्या तोंडून स्त्रियांच्या कायदेशीर हक्कांबद्दल सहानुभूतीचे उद्गार निघत असले तर याच भेसूर आणि निराधार स्थितीमुळें. विधवांच्या हक्काविषयीं लिहितांना त्याचा आजपर्यंतचा इतिहास जर लक्षांत घेतला तर ज्या सुधारणा घडवून आणावयाच्या त्यास मार्गदर्शक होईल या हेतूनें तद्विषयक इतिहासाचें सिंहावलोकन करणें अस्थानीं होणार नाहीं.

## ऐतिहासिक समालोचन

पतिनिधनानंतर पत्नीनें सती जावें ह्मणजे तिला शाश्वत असा स्वर्गलोक प्राप्त होतो अशी धर्मशास्त्राची अनुज्ञा होती; आणि त्याप्रमाणें बहुतेक स्त्रिया पूर्वींच्या काळीं सती जात असत. पतीच्या प्रेतासमवेत दहन करून घेण्यांत सहमरणाचें पुण्य लागत असे; परंतु सहमरण जर शक्य नसलें तर अनुमरण-ह्मणजे पतीच्या प्रेतदहनाच्या नंतर पत्नीनें अग्निप्रवेश करणें पत्नीला सांगितलें असून त्याचेंहि पुण्य सहमरणाइतकेंच सांगितलेलें आहे. "मृते भर्तरि या नारी समारोहेद्धुताशनम्। साऽरुन्धतीसमाचारा स्वर्गलोके महीयते॥" (अंगिराः-पतिनिधनकालीं जी स्त्री अग्निप्रवेश करिते तिला स्वर्गलोक प्राप्त होतो). परंतु सर्वच स्त्रिया सती जात असत असें नाहीं. शिवाय गर्भवती, अर्भकमाता, अप्रौढ अशा स्त्रियांनीं सहगमन करूं नये अशी शास्त्राची आज्ञा होती. तेव्हां विधवांनीं नंतर उरलेलें आयुष्य कसें घालवावें याजबद्दल त्यांनीं नियम घालून दिलेले आहेत. "कामं तु क्षपयेद्देहं पुष्पमूलफलैः शुभैः।-आसीतामरणात्क्षांता नियता ब्रह्मचारिणी।"...(मनुः-फुलें मुळें इत्यादि भक्षण करून देह कृश करावा, व आमरण क्षमाशील, नियमशील व ब्रह्मचारी असें तिनें रहावें). "भर्तुः पितुः स्वजनस्य वा गृहमाश्रित्य संयत-

जिव्हा हस्तपादेन्द्रिया स्वाचारवती दिवा रात्रौ भर्तारमनुशोचन्ती व्रतोपवासैः कृशा आयुष्योऽन्ते पतिलोकं जयति । न भूयः पतिवियोगमाप्नोतीति" ( पति, पिता अगर नातलग यांच्या घरीं राहून जिव्हा, हस्तपादादि इंद्रियांचें दमन करून तपाचरण करणारी, रात्रंदिवस एकसारखी पतीचा शोक करणारी,व्रतवैकल्य उपासांनीं देह शुष्क करणारी विधवा मरणसमयीं पतिलोकास जाते; ह्मणजे तिला फार वेळ पतिवियोग होत नाहीं ). अशा तऱ्हेनें अत्यंत कडक रीतीनें ऐहिक सुखोपभोगांचा परित्याग करून तिनें आयुष्य कंठावयाचें असल्यानें अर्थात् पतिनिधनानंतर तिला मिळकतीवर स्वामित्व देऊन तरी काय उपयोग ? याच कल्पनेनें त्यांनां प्रथम वारशाचेहि हक्क दिलेले नव्हते आणि ही स्थिति विभक्त वा अविभक्त कुटुंबांत सारखीच होती. विधवा स्त्रियांनां वारसाई हक्क मिळत नाहीं, पण फक्त त्यांनां अन्नवस्त्र द्यावें अशा अर्थाचीं खालील वचनें निरनिराळ्या ग्रंथकारांची आहेत. "भ्रातॄणामप्रजाः प्रेयात् कश्चिच्चेत्प्रव्रजेत वा । विभजेरन् धनं तस्य शेषास्ते स्त्रीधनं विना । भरणं चास्य कुर्वीरन्स्त्रीणामाजीवनक्षयात् । रक्षन्ति शय्यां भर्तृश्चेदाच्छिद्युरितरासुत्विति "॥ ( नारदः–भावांच्यापैकीं कोणी जर निपुत्रिक मरण पावला तर त्याच्या स्त्रीच्या स्त्रीधनाशिवायचें धन इतरांनीं आपसांत वाटून घ्यावें. शुद्ध वर्तनाचरण करणाऱ्या त्याच्या स्त्रीस त्यांनीं अन्नवस्त्र द्यावें; परंतु तिचें वर्तन जर शुद्ध नसेल तर तोहि भाग भावांनीं (द्यावा). "पिता हरेदपुत्रस्य रिक्थं भ्रातर एव च" । ( मनुः–निपुत्रिकाचें धन त्याचा पिता अगर भाऊ घेतात ). फार काय, त्याची माता अगर आजीहि धन घेऊं शकेल; परंतु भार्येस कांहीं मिळत नाहीं असाहि मनुचा अभिप्राय दिसतो. "अनपत्यस्य पुत्रस्य माता दायमवाप्नुयात् । मातर्यपि च वृत्तायां पितुर्माता हरेद्धनमिती" ॥ (निपुत्रिक पुत्राच्या निधनानंतर त्याची माता अगर माता हयात नसेल तर बापाची आईहि त्याचें धन घेते ). तसेंच "स्वर्यातस्य ह्यपुत्रस्य भ्रातृगामि द्रव्यं तदभावे पितरौ हरेयातां ज्येष्ठा वा पत्नीति ।" ( शंखः–निपुत्रिकाचे मरणानंतर त्याचें धन त्याच्या भावांकडे जाते, त्यांच्या अभावीं आईबाप अगर त्याच्या वडील भार्येकडे जाते ). अशा प्रकारचीं वचनें असतांहि विधवेच्या वारसाई हक्कांबद्दल ग्रंथकारांच्यांत मतभेद उत्पन्न झालेला असून जुन्या कल्पनांनां चिकटून राहणाऱ्या धर्मशास्त्रकारांनीं इतरत्र विधवेचे वारसाईचे हक्क कबूल केलेले आढळतात. विधवा-स्त्रियांच्या वाजवी हक्कांचें रक्षण जुन्या योजनेंत होत नाहीं असें त्यांचें मत झालें ह्मणा अगर न्यायदृष्टीनें असलेल्या हक्कांमध्यें सुधारणा करण्याची जरूरी त्यांनां वाटली ह्मणा, कसेंहि असो परंतु विधवा स्त्रियांच्या हक्क सुधारणेचें जहाज पुढें लोटण्यास अनुकूल असा वारा सुटला होता असें कित्येक ग्रंथकारांच्या वचनांच्या गवताच्या काडीनें अजमावितां येतें. अशीं वचनें ह्मणून कांहीं दाखवितां येतील तीं येणेंप्रमाणें "अपुत्रा शयनं भर्तुः पालयन्ती व्रते स्थिता । पत्न्येव दद्यात्तत्पिंडं कृत्स्नमंशं लभेत चेति"। (वृद्धमनुः–निपुत्रक पतीच्या पश्चात् शुद्धाचरणानें राहणारी आणि व्रत करणारी पत्नी त्यास पिंड देऊं शकते आणि त्याचा सर्व भाग घेऊं शकते ). "अपुत्रधनं पत्न्यगामिनी, तदभावे दुहितृगामिनी" ( बृहद्विष्णूः–अपुत्राचें धन त्याच्या पत्नीस, तिच्या अभावी मुलीस,आईबापास अनुक्रमानें मिळतें ). "पत्नी पत्युर्धनहारी या स्यादव्यभिचारिणी" । ( कात्यायन–सुवृत्त अशा पत्नीस पतीच्या धनाचा वारसा मिळतो). "कुल्येषु विद्यमानेषु पितृभ्रातृसनाभिषु । असुतस्य प्रमीतस्य पत्नी तद्भागहारिणी" ॥ ( बृहस्पतिः–आईबाप भाऊ इत्यादि नातेवाईक हयात असतांहि मयत होणाऱ्या निपुत्रकाचा भाग त्याच्या पत्नीस मिळतो ). या दोन परस्पर विरोधी मतांचा मिलाफ घालून विधवा स्त्रियांच्या हक्कांचा थोड्या प्रमाणांत कां होईना पण धैर्यानें आणि मोठ्या युक्तीवादानें पुरस्कार करण्याचा उपक्रम जर कोणी केला असेल तर तो विज्ञानेश्वरानें होय. स्त्रियांच्या हक्कासंबंधीं सहानुभूतीपर विचार जर कोठें प्रथम प्रगट झालेले असतील तर ते याज्ञवल्क्यस्मृतींत होय, आणि प्रतिपक्षीयांचें अमोघ तर्कवादानें खंडन करून याज्ञवल्क्यांच्या वचनांतील अर्थगांभीर्य विशद करून सांगण्याची बहुमोल कामगिरी जर कोणी केली असेल तर ती विज्ञानेश्वरांनींच होय; व त्यांनींच पत्नीच्या हक्कास हरताळ फांसणाऱ्या निरनिराळ्या स्मृतिवचनांची यथेच्छ हजिरी घेतली. उपर्युक्त विरोधी मतांचा मिलाफ घालण्याच्या हेतूनें धारेश्वरानें अशी युक्ति सुचविली कीं, "पत्नी गृह्णीयादित्येतद्वचनजातं विभक्तभ्रातृस्त्रीविषयम् । सा च यदि नियोगार्थिनी भवती ।" ( पत्नीला धन मिळावें अशा अर्थाचीं जीं वचनें आहेत त्यांनीं विभक्त झालेल्या

भावांच्या पत्नीचा हक्क दर्शविलेला आहे आणि तेंहि पण पतीच्याकरितां ह्मणून पुत्र नियोगानें उत्पन्न करूं इच्छिणाऱ्या पत्नीस). आणि विज्ञानेश्वरांनीं धारेश्वराच्या व्यवस्थेचा पहिला भाग म्हणजे विभक्त कुटुंबव्यवस्थेपुरताच विधवांचा वारसाई हक्क मान्य केला; मात्र नियोगाची अट त्यांनीं त्याज्य ठरविली. नियोगाच्या चालीचा त्यांनीं निषेध केला आणि नियोगाच्या व्यवस्थेवर अवलंबून विधवेस पतीचें धन देण्याची जी योजना गौतम, मनु, वसिष्ठ, नारद, इत्यादिकांच्या वचनांतून दिसून येते ती अशास्त्र असून तर्कदुष्ट आहे असें त्यांनीं सप्रमाण सिद्ध करून दाखविलें. तसाच दुसरा आक्षेप असा मांडण्यांत येत असे कीं, धन हें यज्ञार्थ संपादन केलेलें असतें आणि ज्या अर्थी स्त्रियांनां यज्ञाचा अधिकार नाहीं त्याअर्थी त्यांनां धनाचाहि अधिकार नाहीं; फक्त त्यांनां अन्नवस्त्र मिळावें. (यज्ञार्थं द्रव्यमुत्पन्नं तत्रानधिकृतास्तु ये। अरिक्थविभाजस्ते सर्वे ग्रासाच्छादनभाजनाः ॥ यज्ञार्थं विहितं वित्तं तस्मात्तद्विनियोजयेत्। स्थानेषु धर्मदुष्टेषु स्त्रीमूर्खविधर्मिष्विति ॥). त्या आक्षेपाचेंहि मिताक्षरामध्यें असें निराकरण केलें आहे कीं, यज्ञाकरितांच सर्व माल मिळकतीचा उपयोग करावयाचा असेल तर यज्ञयागादि कार्यहि असिद्ध राहिलें (द्रव्यजातस्य यज्ञार्थत्वे दान होमाद्यसिद्धेः।) धर्मकार्याशिवाय अर्थ आणि काम यांचीहि जोपासना करणें जरूर आहे तेव्हां त्यांतहि द्रव्य खर्चिलें पाहिजे. यज्ञ या शब्दाचा अर्थ जर धर्मकृत्य असा घेतला तर स्त्रियांनांहि वारशाचा हक्क मिळाला पाहिजे. कारण त्यांनांहि पूर्ण धर्माधिकार आहेत. (यज्ञ शब्दस्य धर्मोपलक्षणपरत्वे स्त्रीणामपि पूर्तधर्माधिकाराद्धनग्रहण युक्ततरम्।). 'स्त्रियांनां स्वतंत्रता देऊं नये' या पारतंत्र्यवचनाचा विचार करितां, पारतंत्र्य नसलें तरी धन स्वीकाराच्या ठायीं कोणती हरकत येते. (यत्तुपारतंत्र्यवचनं "न स्त्री स्वातंत्र्यमर्हती" त्यादि तदस्तु पारतंत्र्यं, धनस्वीकारे तु को विरोधः।). तसेंच श्रीकरादिकांनीं अल्प धनाचे ठायीं विधवेस वारशाचा हक्क असावा असें जें सुचविलें तेंहि चुकीचें आहे. (एतेनाल्पधनविषयत्वं श्रीकरादिभिरुक्तं निरस्तं वेदितव्यम्।).कारण औरस पुत्र असतांहि त्याच्या हयातींत अगर पश्चात् वांटणी झाली असतां पुत्राच्या बरोबरीनें पत्नीस हिस्सा देण्याची आज्ञा आहे. (तथा ह्यौरसेषु पुत्रेषु सत्स्वपि जीवद्विभागे अजीवद्विभागेच पत्न्या, पुत्रसमांशग्रहणमुक्तम्). तेव्हां निपुत्रिकाच्या निधनानंतर त्याच्या भार्येस अन्नवस्त्रापेक्षां जास्त कांहीं मिळत नाहीं असें ह्मणणें धडधडीत चुकीचें आहे. (तथा सत्पुत्रस्य स्वर्यातस्य धनं पत्नी भरणादतिरिक्तं न लभते इति व्यामोहमात्रम्।). पत्नीला समसमान हिस्सा द्यावा, तसेंच मातेला समान अंश द्यावा यांत अन्नवस्त्रापुरतेंच धन तिला मिळतें असें मत चुकीचें होय. कारण त्यांत समसमान आणि अंश या दोन शब्दांच्या अर्थाचा विपर्यास होतो. ("अथ पत्न्यकार्या समांशिका" इत्यत्र माताऽप्येशं समं हरेदितित्यत्रच जीवनोपयुक्तमेव धनं स्त्री हरतिती मतं तदसत्। अंश शब्दस्य सम शब्दस्य चानर्थक्यप्रसंगात्।). पुष्कळ धन असेल त्यावेळीं फक्त अन्नवस्त्र मिळतें आणि अल्पधन असलें त्यावेळीं पुत्राच्या हिश्याच्या बरोबरीनें धन मिळतें असेंहि एक मत आहे पण तेंहि चुकीचें आहे. त्यांत धर्मवचनांतर्गत व्यवस्थेंत विषमता उत्पन्न होते. बहुधन असतांहि पत्नीला समसमान हिस्सा द्यावा अगर मातेला अंश मिळतो, या वचनाचा अर्थ अन्नवस्त्रापुरती मिळकत मिळते असा अर्थ दुसऱ्यावचनांमुळें करावा लागेल आणि त्या वचनांनीं फक्त अन्नवस्त्र देण्याचीच व्यवस्था दाखविली आहे पण धनजर अल्प असले तर याच वचनांचा अर्थ पुत्राच्या समसमान भाग मिळावयाचा. ह्मणजे त्यांत विरोध येतो. (स्यान्मतम्। बहुधने जीवनोपयुक्तं धनं गृह्णाति अल्पे तु पुत्रांशसमांशं गृह्णातीति तच्च न। विधिवैषम्यप्रसंगात्। तथाहि। "पत्न्याः कार्याः समांशिका माताऽप्यंशं समं हरेदिति" च बहुधने जीवमात्रोपयुक्तम् वाक्यान्तरमपेक्ष्य प्रतिपादय अल्पधने तु पुत्रांशासममंशं प्रतिपादयती।). अशा निरनिराळ्या युक्तिवादानें विज्ञानेश्वरानें विधवेच्या वारसाई हक्काचा पुरस्कार केला. तथापि याज्ञवल्क्याच्या "पत्नी दुहितरश्चैव पितरौ भ्रातरस्तथा। तत्सुता गोत्रजा बन्धुः शिष्यः सब्रह्मचारिणः ॥" (पत्नी, कन्या, मातापितर, भाऊ आणि त्यांचे पुत्र, गोत्रज, बंधु, शिष्य आणि बरोबर शिकणारा विद्यार्थी असे अनुक्रमानें वारस होत). या श्लोकाचा त्यांनीं असा अर्थ केला कीं ही व्यवस्था फक्त विभक्त झालेल्या अशा निपुत्रकाच्या वारसासंबन्धानें होय. अविभक्त झालेल्या पण कुटुंबी अगर विभक्त झालेले पण पुनः संसृष्ट झालेल्यांच्या वारशास ही व्यवस्था लागू पडत नाहीं— (तस्मादपुत्रस्य स्वर्यातस्य विभक्तस्यासंसृष्टिनः परिणीता स्त्री संयता सकलमेव धनं गृण्हातीति स्थितम्।). विधवां-

च्या हक्कांचा पुरस्कार जरी त्यानें केला तरी त्याच्या सिद्धांताच्या विरुद्ध मत प्रतिपादन करणारे असे अधिकारी धर्मशास्त्राधार होते ही जाणीव त्याला असावी आणि म्हणूनच त्यानें ह्या दोन परस्परविरोधी मतांतून मधला मार्ग काढला असावा. तसेंच त्यानें केलेल्या नवीन उपक्रमानें जनतेंत खळबळ उडूं नये ह्मणून कीं काय त्याची जाणीव फारशी जाचक होऊं नये, येवढ्यासाठीं त्यानें ही योजना फक्त विभक्त कुटुंबासच लागू केली असावी असें बाबू त्रैलोक्यनाथ मित्र यांचें मत आहे. त्या काळांत अविभक्त कुटुंब हीच व्यवस्था सरसहा प्रचारांत होती आणि विभक्त कुटुंब व्यवस्था केवळ अपवादात्मक अशी होती, तेव्हां विज्ञानेश्वराच्या उपक्रमानें अर्थात् जनतेंत खळबळ उडणें कठीण होतें. विज्ञानेश्वरानें घालून दिलेली व्यवस्थाच बंगाल प्रांताशिवाय इतरत्र आजमितीसहि प्रचलित आहे आणि विभक्त व अविभक्त कुटुंबाची विधवा ह्मणून आज जी निपुत्रिकाच्या विधवेच्या हक्कांत विषमता दिसून येत आहे, त्या विषमतेचें बीजहि विज्ञानेश्वरानेंच मिताक्षरा ग्रंथांत पेरिलें, असें मोठ्या कष्टानें ह्मणावें लागतें. विज्ञानेश्वराचा काळ साधारणपणें अकरावा शतकाचा उत्तरार्ध ह्मणून गणला जातो. स्त्रियांच्या हक्कविस्ताराच्या दृष्टीनें कालखंड केले तर विज्ञानेश्वराचा काल यास त्यांतील दुसरा कालखंड ह्मणावें लागेल. विधवा स्त्रियांनां अन्नवस्त्राशिवाय मिळकतीचे कोणतेच हक्क नाहींत या मताचें युग बदलून विभक्त कुटुंबापुरतें तरी कां होईना परंतु निपुत्रिकाच्या विधवा पत्नीस वारशाचे हक्क मिताक्षरामध्यें देण्यांत आले त्यामुळें त्यास द्वितीय खंड काल म्हणतां येईल. स्त्रियांच्या हक्काची चर्चा जोरानें होऊं लागून त्यांच्या न्याय्य मागण्यांची जाणीव अधिकाधिक होऊं लागल्याचें प्रत्यंतर ह्मणजे त्यानंतर अवघ्या दोनशें वर्षांच्या अवधींतच जीमूतवाहन यानें दाय भाग हा ग्रंथ लिहिला आणि त्यांत विज्ञानेश्वरानें जी योजना भीतभीत विभक्त कुटुंबापुरती पुढें मांडली तीच योजना जीमूतवाहनानें मोठ्या धडाडीनें अविभक्त व संसृष्ट कुटुंबासहि लागू पडत असल्याचें प्रतिपादन केलें. जीमूतवाहनाचा काल तेरावें शतक असून हा या इतिहासांत तिसरा कालखंड ह्मणून धरितां आला तरी त्यानंतर कांहीं विशेष सुधारणा घडून आली नसल्यानें त्यास शेवटचाच युगकर्ता ह्मणून समजावा लागेल. जीमूतवाहनानें निपुत्रिकाच्या निधनानंतर त्याच्या पत्नीस वारसा मिळण्याबद्दलचे परस्पर विरोधीस्मृतिवचनांचें समालोचन केल्यावर विज्ञानेश्वरानें सुचविलेल्या व्यवस्थेचा विचार करितांना ह्मटलें कीं कांहीं जणांनीं या विरोधी मताचा मिलाफ घडवून आणण्याच्या हेतूनें असें सुचविलें कीं, भावाचा जो वारसाचा अग्र हक्क आहे तो अविभक्त आणि संसृष्ट कुटुंबव्यवस्थेंत होय. आणि विधवेचा हक्क विभक्त झालेला आणि संसृष्ट न झालेल्याच्या पश्चात् अमलांत यावा. ( अत्र केचिदविभक्तसंसृष्टगोचरो भ्रात्राधिकारः प्रथमं विभक्तासंसृष्टगोचरस्य पत्न्याधिकार इति समादधति । ) असें सुचविलें आहे, तें बृहस्पतिच्या मताविरुद्ध होय. कारण संसृष्ट स्थितींतहि एखादा इसम मयत झाला तर त्याचा भाग त्याच्या भावांनां मिळतो खरा; परंतु त्यांत बहिणीसहि भाग सांगितला आहे. आणि ही व्यवस्था ज्यास पुत्रसंतान, पत्नी अगर मातापितरें नाहींत त्यांच्याकरितांच आहे. तेव्हां त्यामुळें त्याच्या पत्नीच्या हक्कास बाध कसा येईल? तसेंच त्याचा भाग लुप्त होत नाहीं ( न लुप्यते तस्य भागः- बृहस्पति ). सर्व भावांच्या समागित मालकीच्या वाटण्यांत जरी त्याचा एखाद्या विशिष्ट जिनसेपुरता अगर मिळकतीपुरता स्वतंत्र भाग ह्मणून दाखवितां येत नाहीं तरी त्याचा हिस्सा आणि अंश हे नक्कीच आहेत आणि ही स्थिति अविभक्त वा संसृष्ट या दोन्ही व्यवस्थेंत सारखीच दिसून येते अर्थात् तो भाग त्याच्या भार्येस मिळण्यास कांहींच हरकत नाहीं. तसेंच पतीच्या निधनाबरोबरच पत्नीचा पतीच्या मिळकतींतील हक्कसंबंध नष्ट होतो आणि त्याकरितां पत्नीच्या अगोदर भावांनां वारसा अविभक्त कुटुंबांत मिळतो असें जें ह्मणणें आहे तेंहि पण चुकीचें आहे. कारण लग्नाच्या निमित्तानें पतीच्या मिळकतींत तिचा जो हक्कसंबंध उत्पन्न होतो तो त्याच्या मृत्यूनें नष्ट होतो या ह्मणण्यास शास्त्राधार नाहीं. ( परिणयनोत्पन्नं भर्तृधने पत्न्याः स्वामित्वं भर्तृमरणात् नश्यतीत्यत्र च प्रमाणाभावात् । ). प्रथम मुलास, मुलाच्या मुलास, आणि मुलाच्या नातवास वारसा मिळतो परंतु त्यांच्या अभावीं त्यांच्या विधवा पत्नीस वारसा मिळाला पाहिजे असा सरळ नियम त्यानें नक्की ठरविला. पत्नीलाहि श्राद्धादि धर्मकृत्यें करण्याचा आणि पतीचा उद्धार जेणेंकरून होईल अशीं व्रतवैकल्यें करण्याचा अधिकार व्यासांनीं असल्याचें सांगितलेलें आहे;

आणि म्हणूनच पत्नीला वारसा पुत्र, पौत्र प्रपौत्रांच्या नंतर प्रथम द्यावा अशी व्यवस्था आहे. ( प्रपौत्रपर्यन्ताभावे तु वैधव्यात्प्रभृति व्रतादिना भर्तुः परलोकहिताचरणेन पुत्रादिभ्योजघन्येति तेषामभावे धनहारिणी पत्नी । ). पत्नीच्या वारशाच्या हक्काचा निर्णय करितांना अविभक्त वा संसृष्ट स्थिति पाहण्याची जरूरी ठेवणें गौण होय, आणि तिचा पति विभक्त होता, अविभक्त होता कीं संसृष्ट होता हें न पाहतां त्याची सर्व मिळकत त्याच्या पत्नीस मिळावी हा जो जितेन्द्रियाचा सिद्धांत आहे तोच ग्रहण करण्यासारखा आहे. ( नत्वश्रुताविभक्तसंसृष्टगोचरत्वकल्पना अतोऽविशेषेणैव विभक्तत्वाद्यनपेक्ष्यैव अपुत्रस्य भर्तुः कृत्स्नधने पत्न्यधिकारो जितेन्द्रियोक्त आदरणीयः ). जीमूतवाहनाचा संप्रदाय बंगाल प्रांतांत प्रचलित असून तेथें त्याचाच अधिकार अप्रतिहत आहे. तेव्हां अविभक्त कुटुंबापैकीं निपुत्रिक असा जर कोणी भागदार वारला तर त्याचा अविभक्त असा अंश त्याच्या भार्येस वारशानें मिळतो इतकेंच नव्हे तर वांटणी करून भाग स्वतंत्र करून देण्याबद्दलची मागणी तिला करतां येते.

## अन्यायाचें बीज (१) मर्यादित स्वामित्व

निपुत्रिकाचा वारसा त्याच्या भावांस, मातापितरांस न मिळतां त्याच्या पत्नीस मिळतो ही विशेष सुधारणा विज्ञानेश्वरानें स्त्रियांच्या हक्कासंबंधानें घडवून आणिली; परंतु आपली सुधारणा विशेषेंकरून अप्रिय होऊं नये यासाठीं जसें त्यानें अविभक्त कुटुंबव्यवस्थेस धक्का पोहोंचूं नये म्हणून फक्त विभक्त झालेल्यापुरताच त्याचा अम्मल मर्यादित केला तद्वतच जीमूतवाहनानें जरी या सुधारणेची कक्षा विस्तृत करून अविभक्त अगर संसृष्टकुटुंबव्यवस्थेसहि ती लागू केली तत्रापि त्या सुधारणेची जाणीव जनतेस विशेष होऊं न देण्यासाठीं जीमूतवाहनासहि थोडें प्रतिगामी धोरण स्वीकारावें लागलें, आणि तें म्हणजे अशा रीतीनें वारशांत मिळालेल्या मिळकतीवरील स्त्रियांच्या मालकी हक्कासंबंधानें होय. स्त्रियांनां वांटणीच्या वेळीं पत्नी अगर माता म्हणून अगर वारसाई हक्कानें ज्या वेळीं मिळकत मिळते त्यावर त्यांचें स्वामित्व पूर्ण असावें, कीं मर्यादित असावें याजबद्दलहि विज्ञानेश्वराच्या कालांतहि ऊहापोह होत असावेसें दिसतें. आजच्या कायद्याच्या धोरणानें लग्नाच्या निमित्तानें ज्या कुटुंबांत स्त्री प्रवेश करिते त्या कुटुंबाच्या स्थावरजंगम मिळकतीवर तिला संपूर्ण मालकी केव्हांहि मिळत नाहीं परंतु तिला फक्त उपभोग घेण्याचाच हक्क मिळतो ही जी योजना आहे ती पूर्वींच्या टीकाकारांनां मान्य नव्हती. इतकेंच नव्हे तर ज्यांनीं ह्मणून अशा पद्धतिचा पुरस्कार करण्याचा प्रयत्न केला त्यांचे शास्त्राधार लंगडे असून तर्कपद्धति दुबळी होती असेंच दिसून येईल. इतकेंच नव्हे तर त्यांचे सिद्धांत एकमेकांशीं विरुद्ध आहेत. स्मृतींचें यथार्थ ज्ञान आणि टीकाकारांचा अधिकार यांचें तुलनात्मक रीतीनें परीक्षण करण्यास जरूर असलेलें साधन या दोन्ही गोष्टी इंग्रजी न्यायाधीशांनां नसल्यानें कोर्टांतील पक्षपाती पंडितांच्या एकतर्फी अभिप्रायावर भिस्त ठेवून त्यांनीं न्याय दिला त्यांत या महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या नजरेस न आल्यानें हें मर्यादित स्वामित्वाचें पिशाच्च हिंदु विधवांच्या बोकांडीं एकसारखें बसलें आणि त्यांचे हालहाल करण्याचें श्रेय मात्र पिशाच्चाकडे आहे. पत्नीला पुत्राच्या बरोबरीनें वांटणी मिळण्याची. 'यदि कुर्यात्समानंशान् पत्न्याः कार्याः समांशिकाः । न दत्तं स्त्रीधनं यासां भर्त्रा वा श्वशुरेण वा ॥ ११५ ॥ पितुरुर्ध्वं विभजतां माताऽप्यंशं समं हरेत् ( याज्ञवल्क्य ). या दोन वचनांत जी आज्ञा आहे त्यांत गर्भित रीतीनें स्वतंत्र स्वामित्व देण्याचाच उद्देश दिसतो. मुलांनां ज्या हक्कानें वाटणींत मिळकतीवर स्वामित्व मिळतें त्याच हक्कानें मातेसहि मिळालें पाहिजे. कारण उभयतांनांहि एकच शब्दयोजना योजलेली आहे, आणि पत्नी व पुत्र यांच्यांत तसा भेद श्लोकांत दर्शविलेला नाहीं. दुसरें असें कीं, ज्या स्त्रीस स्त्रीधन नवरा अगर सासरा याजकडून मिळालें असेल त्यांनां त्या प्रमाणांत हिस्सा कमी द्यावयाचा व स्त्रीधन आणि हिस्सा मिळून मुलांच्या एवढी मिळकत देण्याच्या व्यवस्थेंतहि तोच प्रतिध्वनि निघत आहे. तसेंच निपुत्रिकाच्या पश्चात् "पत्नी दुहितरश्चैव" ( याज्ञवल्क्य ) पत्नी, मुलगी, आईबाप भाऊ पुतणे इत्यादिकांचा अनुक्रमानें जो वारसाई हक्क ठरविलेला आहे त्यांत सर्वांनां एकच शब्दयोजना आणि एकच क्रियापद सारखेंच लागू असतांना त्यापैकीं फक्त पत्नी, माता अगर मुलगी यांच्यापुरता त्याचा अर्थ एक करावयाचा व त्यांस मर्यादित हक्क द्यावयाचा आणि बाप, भाऊ, पुतणे यांनां दुसरा अर्थ लागू करून संपूर्ण स्वामित्व द्यावयाचें हें युक्तीस अगर तर्कास धरून नाहीं.

पत्नी ह्मणून वांटणीच्या वेळीं अगर पश्चात् जी मिळकत मिळते ती फक्त अन्नवस्त्राच्याकरितांच होय, असा युक्तिवाद आजच करणारे निघतात असें नव्हे पण पूर्वींसुद्धां होऊन गेले आहेत आणि त्यांनां उत्तर जीमूत-वाहनाच्या शब्दांतच द्यावयाचें तर तें वर येऊन गेलेंच आहे. अन्नवस्त्राची बेगमी करावयाची तर मोठी इस्टेट असतांहि अंश ह्मणजे भाग देण्याचें कारण नव्हतें, तसेंच लहान इस्टेट असली ह्मणजे भाग द्यावा, मोठी असली ह्मणजे अन्नवस्त्र द्यावें असा विषम अर्थ सम-समान आणि अंश या शब्दांचा करणें तर्कदुष्ट आहे. तेव्हां हा भाग जो ती घेते तो ती पत्नी ह्मणून पतीच्या मिळकतींत तिचा सहभागिदारीचा अगर सहमालकीचा जो हक्क आहे त्या हक्काच्या अनुरोधानें घेते असें जीमूतवाहनानें वर विवेचन केलेलें आहे. तेव्हां हा भाग अगर हिस्सा तिला अन्नवस्त्राकरितां देतात असें ह्मणणें सयुक्तिक नाहीं. आजच्या कायद्याच्या धोरणानें अशा मिळकतीवर तिचा वास्तविक पाहतां अन्नवस्त्रा-पेक्षां कांहीं जास्त हक्क नसतो. त्यावरून मात्र असें अनुमान कोणी काढलें कीं अन्नवस्त्राकरितां तो हिस्सा देण्यांत आला तर ती त्यांची दिशाभूल होत आहे. ते त्यांचें विधान धडधडीत चुकीचें आणि स्मृतिकारांच्या व्यवस्थेशीं विसंगत असें आहे. तेव्हां अशा मिळकतीवर स्त्रियांचें स्वामित्वहि त्याच परिस्थितींत मिळकत धारण करणाऱ्या इतर पुरुष वारसाप्रमाणें संपूर्ण असावें असें ह्मणावें लागतें. बाबू गोलपचंद्र सरकार व रायबहादूर जोगेंद्रचंद्र घोष यांचें मतहि असेंच आहे. सुधारणाप्रिय विज्ञानेश्वरानें ही संधी वाया जाऊं दिली नाहीं आणि स्त्रियांनां स्वतंत्र स्वामित्व मिळतें असें त्यानें स्त्रीधनाची याज्ञवल्क्याची जी व्याख्या "पितृमातृपतिभ्रातृदत्त-( श्लोक १४३ )" आहे त्यावर टीका करितांना 'आद्य' या शब्दाचा अर्थ करितांना स्पष्ट सांगितलेलें आहे. तो ह्मणतो "आद्य शब्देन रिक्थक्रयविभागपरिग्रहाधिगमप्राप्तमेतत् स्त्रीधनं मन्वादिभिरुक्तम् ॥" ( मिताक्षरा-आद्य शब्दांत स्त्रीला वारशानें, फरोक्तानें, वांटणींत सांपडण्यानें, संपादण्यानें जी मिळकत मिळते व मन्वादिकांनीं ज्यास स्त्रीधन ह्मटलें आहे अशा मिळकतीचा समावेश होतो ) यांत कोणताहि संदिग्धपणा न ठेवितां त्यांनीं वांटणींत अगर वारशांत मिळणाऱ्या मिळकतीवर स्त्रीधन ह्मणून स्त्रियांचें संपूर्ण स्वामित्व दर्शविलें. तसेंच स्त्रीच्या पश्चात् अशी मिळकत कोणकोणते वारस घेतात त्याची व्यवस्थाहि मिताक्षरामध्यें सुचविलेली आहे. मिताक्षरा ग्रंथावर टीका करणाऱ्या विवादरत्नाकर आणि विवादचिंतामणि अशा दोन टीकाग्रंथांनीं या विज्ञानेश्वराच्या उदार धोरणी योजनेस हरताळ फांसला. कात्यायन याचे स्त्रीधनाबद्दलचे दोन श्लोक घेऊन त्यावरून त्यांनीं दोन सिद्धांत काढले. 'भर्तृदायं मृते पत्यौ विन्यसेत् स्त्री यथेष्टतः। विद्यमाने तु संरक्षेत् क्षपयेत् तत्कुलेऽन्यथा ॥ अपुत्रा शयनं भर्तुः पालयन्ती गुरौ स्थिता। भुञ्जीतामरणात्क्षांता दायादा उर्ध्वं आप्नुयुः ॥ ( कात्यायनः-पतीनें दिलेलें, पासून मिळालेलें धन पतीच्या पश्चात् पत्नीनें मर्जीस येईल त्याप्रमाणें खर्च करावें. परंतु त्याच्या हयातींत त्याचें रक्षण करावें, नाहींतर त्याच्या नातेवाईकांच्या हवालीं करावें. शुद्धाचरण ठेवणाऱ्या निपुत्रवती विधवेस आमरण पतीच्या मिळकतीचा व्यवस्थेशीर उपभोग घेण्याचा हक्क आहे, आणि त्यानंतर मिळकत वारस घेतात ). हे दोन्ही श्लोक पतीनें पत्नीस बक्षिस दिलेल्या मिळकतीसंबधानें होत. तथापि दत्य या शब्दाचे हें सुप्रसिद्ध दिलेलें दान, अगर वारसा असे दोन अर्थ होत असल्यामुळें उभयतां टीकाग्रंथांत त्या श्लोकांची वासलात अशी लावण्यांत आली कीं, बक्षीस मिळालेली मिळकत अगर वारशांत आलेली मिळकत या दोन्ही प्रकारच्या मिळकतीवर या श्लोकानें स्त्रीचें मर्यादित स्वामित्व सिद्ध केलें. ही विचारश्रेणी सुसंबद्ध नाहीं. एक तर कात्यायन याचे वरील दोन श्लोक सौदायिक स्त्रीधनाच्या-बद्दलचे असतां त्यावरून वारशांत आलेल्या मिळकती-बद्दलहि तशीच व्यवस्था असावी असा अर्थ खुद्द कात्यायनास तरी अभिप्रेत होता कीं नाहीं याज-बद्दल शंकाच आहे. आणि केवळ दाय शब्दाचे दोन निरनिराळे अर्थ होत असले तरी संदर्भाप्रमाणें कोणता तरी एकच विशिष्ट अर्थ अभिप्रेत धरिला पाहिजे हा जो नियम आहे त्या नियमाचें उल्लंघन यांत होत आहे. या टीकाकारांच्या दृष्टींतून विज्ञानेश्वराचा स्पष्ट अभिप्राय कसा वगळला गेला ? निदान त्यास त्यांनीं खोडून काढण्याचा प्रयत्न केला नाहीं ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मिताक्षरा ग्रंथाचा अधिकार अत्यंत मोठा आहे आणि त्यांत स्पष्ट दिलेल्या अभिप्रायास धाब्यावर बसविणाऱ्या रत्नाकर अगर चिंतामणि यांच्या ग्रंथास मान देणें योग्य नसतांहि तसा प्रकार या बाब-

तींत झाला आहे असें कष्टानें ह्मणावें लागतें. मिताक्षरा संप्रदायापैकीं मिथिला संप्रदाय ह्मणून जो पोटविभाग आहे त्या पोटविभागाचे आधारभूत ग्रंथ हे दोन असतांना मुख्य आधारभूत ग्रंथ जो मिताक्षरा त्याच्या अर्थाचा विपर्यास करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांत, उत्तेजन मिळण्यास नको होतें. परंतु तसें उत्तेजन मिळालें इतकेंच नव्हें तर मिताक्षरा ग्रंथाचा अनियंत्रित अधिकार मान्य करून प्रसिद्ध अभिप्रायाच्या इष्टानिष्टतेबद्दल विचक्षणा न करितां त्याप्रमाणें न्यायदानाचें कार्य करण्याच्या कर्तव्याचीच जबाबदारी इंग्रजी न्यायाधीशांच्यावर आहे असें बजावून सांगणारें प्रिव्हीकौन्सिल ( कलेक्टर ऑफ मदुरा वि. मथुरामलिंग सावपती १२ मु. ई. अ. ३९७ ) याच एका मुद्यावर घसरलें आणि मिताक्षरा ग्रंथाच्या स्पष्ट अभिप्रायास बाजूस सारून पतीच्या मिळकतींत विधवेस मर्यादित स्वामित्व असावें असें ठरविलें. जीमूतवाहनानेंहि असाच अर्थ केला होता; आणि त्यानें भीतभीत अविभक्त कुटुंबांतहि विधवेस जो पतीच्या अविभक्त हिश्याचा वारसाई हक्क मिळतो असें प्रतिपादन केलें, ती त्याची सुधारणा लोकांच्या विशेष डोळ्यावर येऊं नये ह्मणून त्याला विधवेस मर्यादित स्वामित्व द्यावें लागलें, असा आरोप त्याच्याबद्दल ग्रंथकार करीत असतात. खुद्द ज्या कात्यायनाच्या वचनावरून स्त्रियांच्या मयत पतीच्या मिळकतीवरचा हक्क मर्यादित केला त्याचा समग्र ग्रंथ उपलब्ध नाहीं. आणि जे श्लोक आधार ह्मणून घेतले तेहि पतीनें बक्षीस दिलेल्या मिळकतीसंबंधानें होत. ह्या दोन गोष्टी लक्ष्यांत घेतल्यावर असेंच ह्मणावें लागेल कीं योग्य विचाराशिवाय स्त्रियांचा हक्क मर्यादित केला गेलेला आहे. पतीपासून बक्षीस मिळालेली मिळकत आणि पतीच्या मरणानंतर वारशांत मिळालेली मिळकत यांत महदन्तर आहे.

स्त्रियांनां वारशांत अगर अन्य तऱ्हेनें पुरुषापासून मिळणाऱ्या मिळकतीवर त्यांचें स्वामित्व पूर्ण नसून मर्यादित आहे, या सिद्धांताच्या कक्षेंत कुटुंबाची कन्या अगर मरणाराची बहीण ह्मणून वारसा मागणाऱ्या स्त्रियांचाहि अंतर्भाव होतो असें मुंबईखेरीज सर्व हायकोर्टांनीं ठरविलेलें आहे. फक्त मुंबई हायकोर्टानें बहीण अगर मुलगी यांनां मिळणाऱ्या मिळकतीवर स्वतंत्र स्वामित्व दिलें आहे. ( गुलाप्पा वि. तायभा ३१ मुं. ४५३: विठाप्पा वि. सावित्री ३४ मुं. ५१०: विनायक वि. लक्ष्मीबाई १ मुं. हा. को. रि. ११७: ) दायभाग संप्रदायांत या मर्यादित मिळकतीचें धोरण जें स्वीकारण्यांत आलें, तें मुंबईखेरीज इतर सर्व प्रांतांत दाखल झालें इतकेंच नव्हे तर मिळकतीवरच्या स्त्रियांच्या स्वामित्वाबद्दल दायभाग हाच शेवटला शब्द होऊन राहिला. वास्तविक पाहतां दायभागाचें वर्चस्व बंगाल प्रांतांत पाहिजे तर राहील. परंतु मुंबई, मद्रास, अलाहाबाद वगैरे कोर्टांच्या हुकमतीखालीं येणाऱ्या इतर सर्व प्रांतांत मिताक्षरा ग्रंथास अग्रहक्क दिलेला असतांहि, या ग्रंथांतील अभिप्रायाशीं अत्यंत विसंगत असें हें मर्यादित स्वामित्वाचें तत्त्व प्रस्थापित व्हावें हा खरोखर अन्याय आहे. त्याचा परिणामहि विचित्रच असा झालेला आहे. दायभागाप्रमाणें अविभक्त अगर विभक्त असा भेद न राखतां मयत पतीचा वारसा त्याच्या पत्नीस मिळतो, असें जें ठरविलेलें आहे तें तत्त्व बंगाल प्रांताखेरीज इतरत्र कोठेंच अमलांत आणिलेलें नाहीं. इतर प्रांतांत फक्त विभक्त अशा निपुत्रिक पतीचा वारसा त्याच्या पत्नीस मिळावयाचा,पति जर अविभक्त कुटुंबी अशा स्थितींत मयत झाला तर त्याचा वारसा त्याच्या बंधूंनां मिळतो; पत्नीस फक्त अन्नवस्त्रच मिळेल. असें मिताक्षराग्रंथाच्या आधारानें ठरविण्यांत आलें. मात्र अशा वारशांत मिळालेल्या मिळकतीवर संपूर्ण स्वामित्व देण्याची जी विज्ञानेश्वराची योजना त्याऐवजीं जीमूतवाहनाची मर्यादित स्वामित्वाची प्रतिगामी योजना अमलांत येते यावरून असेंच ह्मणावें लागेल कीं, या दोन सांप्रदायांतील जेवढें टाकाऊ धोरण तेवढेंच नेमकें स्त्रियांच्या वांट्यास आलेलें आहे. ज्या बाजूनें जास्त नाडणूक होईल, ज्या मार्गानें पुरुषांनां जास्त हक्क मिळतील आणि ज्या युक्तीनें स्त्रियांनां सर्वथैव कायमचें परतंत्र करून ठेवितां येईल या दृष्टीनेंच जाणूनबुजून हा प्रकार घडला असे पक्षपातीपणाचे आरोप पंडितांच्यावर कोणी लादले तर त्यांस ते उत्तर काय देतील बरें ?

मर्यादित स्वामित्वाचें तत्त्व सर्वसामान्यतः एकवार लावण्यांत आल्यानें किती घोटाळा झाला आहे त्याचें दिग्दर्शन करण्यासाठीं विशेष ठळक उदाहरण घेऊं. एकदां पुरुषानें आपल्या हयातींत अगर पश्चात् आपल्या स्वतंत्र मिळकतीचें बक्षीसपत्र अगर मृत्यु-

पत्र करून ती मिळकत आपल्या पत्नीस दिली तर वास्तविक पाहतां दुसऱ्या एखाद्या पुरुषमनुष्यास मिळकत ज्याप्रमाणें मिळते तद्वतच संपूर्ण मालकीची ह्मणून स्त्रियांनां मिळाली पाहिजे. असें असतांहि न्याय-कचेऱ्यांतून अशा प्रकारच्या व्यवहाराचा अर्थ असा करण्यांत येतो कीं ज्याअर्थीं हिंदुधर्मशास्त्रांत स्त्रियांनां फक्त मर्यादित हक्क दिलेला आहे त्याअर्थीं बक्षीस देणाऱ्याच्या मनांतहि तशाच प्रकारची मालकी द्यावी असेंच असलें पाहिजे, आणि त्यामुळें पतीनें हयातींत अगर पश्चात् आपली मिळकत पत्नीस बक्षीस दिली असली तरीसुद्धां अशा मिळकतीवर तिचें फक्त मर्यादित स्वामित्व उत्पन्न होतें असें ठरविण्यांत आलें आहे ( कुंज वि. प्रेमचंद्र. ५ क. ६८४ ). मात्र अलीकडे या मुद्यावर अनुकूल असें कायद्याचें धोरण होऊं लागलें असून बक्षीसपत्रांत अगर मृत्युपत्रांत जर मर्यादित स्वामित्व दर्शविणारी शब्दयोजना नसेल तर स्त्रीला संपूर्ण स्वामित्व मिळतें असें ठरविण्यांत आलें आहे. ( रामचंद्रराव वि. रामचंद्रराव ४२ म. २८३ सुररगणी वि. रविनाथ ओझा ३० अ. ८४वगैरे फैसले ). वास्तविक पहातां बक्षीस देणारास जे जे हक्क असतात, ज्याप्रकारची मालकी असते ते हक्क आणि त्या प्रकारची मालकी बक्षीस घेणारास मिळाली पाहिजे हें कायद्याचें मूलभूत तत्त्व आहे. पतीच्या पश्चात् वारस ह्मणून मिळकत उपभोगण्याचा हक्क पत्नीस मिळतोच तेव्हां दुसरा एक लेख करून ठेवण्याची जरूरी काय आणि त्यांत उद्देश काय ? आणि तो हाच उद्देश असणार कीं सामान्य कायद्यानें जी मर्यादित मालकी मिळावयाची त्यापेक्षां जास्त कांहीं तरी देण्याचा उद्देश असावा; परंतु स्वामित्वाचें प्रतिगामी स्वरूपाचें तत्त्व हिंदुकायद्यांत शिरल्यानें अर्थाचा अनर्थ होतो आणि स्पष्ट उद्देशाचा विपर्यास होऊन स्त्रियांच्या दुःखास तें एक कारण होऊन राहिलें आहे.

## ( २ ) अविभक्त कुटुंबांतील विधवेची स्थिति

बंगालशिवाय इतर प्रांतांत विधवांच्या हक्कासंबंधींचा विचार करितांना तिचा नवरा विभक्त कीं अविभक्त कुटुंबी होता यावर विशेष भर देण्यांत येत असतो. विभक्त कुटुंबी निपुत्रिक पुरुषाची मिळकत मर्यादित स्वरूपाची असली तरी त्याच्या विधवेस वारसाई हक्कानें मिळते व यावज्जीव तिला त्या मिळकतीचा उपभोग घेतां येतो. अविभक्त कुटुंबी पुरुषाच्या मरणानंतर त्याचा मिळकतींतील अंश–हिस्सा अनुजीवित्वाच्या हक्कानें इतर सहकुटुंबी पुरुष सहभागिदारांच्याकडे जात असल्यानें त्याच्या विधवेस कुटुंबांतून अन्नवस्त्र व राहण्यापुरता घरांतील कांहीं भाग एवढेंच कायद्यानें मिळतें. खुद्द तिच्या नवऱ्यानें जरी लक्षावधि रुपये मिळवून कुटुंबास हलाखीच्या स्थितींतून वर काढून चांगल्या श्रीमान् घराण्यांच्या पंक्तीस आणून बसविलेलें असलें तरी त्याचे अविभक्त भाऊ, बाप, पुतणे इत्यादिकांनां त्याची सर्व स्थावर जंगम इस्टेट मिळते व त्याच्या विधवेस फक्त अन्नवस्त्रच काय तें मिळतें. तसेंच खुद्द त्या स्त्रीच्या लग्नानिमित्त कुटुंबांत हुंडा, देणगी वगैरेच्या द्वारें हजारो रुपये जरी येऊन रितले असले तरीसुद्धां तिला अन्नवस्त्रापेक्षां जास्त कांहींच मिळण्यासारखें नसतें. या अन्नवस्त्राच्या योजनेनें विधवांनां कुटुंबाच्या गुलामगिरींत निमूटपणें दिवस काढावे लागतात. त्यांनां स्वतः काडीचीहि सत्ता नसल्यानें लाखाची मत्ता असूनहि नसल्यासारखीच असते. चोवीस तास कामाखालीं राबावें, पुढें येईल तें खावें, देतील तें नेसावें, कर्त्या पुरुषांच्या बायका जे बोलतील ते निमूटपणें गिळावें व सांगतील तो हुकूम पाळावा. अशी दिनचर्या त्यांची असल्यानें एकाद्या गुलामापेक्षां त्यांची काय जास्त चांगली स्थिति आहे ? विधवांनां अन्नवस्त्रापेक्षां जास्त हक्क नाहीं ही जाणीव उभयपक्षीं असल्यानें इतरांच्याकडून होणाऱ्या छळास ज्याप्रमाणें कसलाच अडथळा येण्याची भीति नसल्यानें त्याची धार बोथट न होतां अधिकाधिक तीक्ष्ण होत जाते तशीच विधवेस वाटणारी भीति जास्तजास्त होत जाऊन त्या छळाचा प्रतिकार करण्याचें तिला अशक्य होत जातें. विधवांनीं स्वतंत्र राहण्यापेक्षां कुटुंबांत राहून मुलामाणसांच्या परिवारांत दिवस काढावेत असें ह्मणणारे पुष्कळ आहेत. परंतु घरांत विधवेस जोंवर एकाद्या गुलामापेक्षां जास्त दर्जा देण्याची त्यांची तयारी नाहीं तोपर्यंत पोटावारी काम करणारा नोकर आपणास मिळावा या उद्देशाचा आरोप त्यांच्या या कळकळीच्या वाटणाऱ्या उपदेशावर कोणी केल्यास तो अप्रस्तुत आहे असें कोण ह्मणेल ? आतांपर्यंत आपण फक्त निपुत्रक विधवेची गोष्ट घेऊन चाललों होतों, परंतु पुत्रवती विधवेसहि पतीच्या

पश्चात् आपल्या मुलांच्या कुटुंबांत जास्त मानाची जागा कायद्याच्या योजनेंत हक्कानें मिळत नसल्यानें तिलाहि आश्रित ह्मणून रहावें लागतें. मुलगे लहान असेतोंवर ही परावलंबी स्थिति विशेष भासत नाहीं. परंतु त्यांच्या बायका नांदूं लागल्या म्हणजे त्यांच्या तंत्रानें चालणारे मुलगे प्रत्यक्ष आईची अवहेलना अगर अपमान करणारे कांहीं कमी निघत नाहींत. आणि हीं उदाहरणें घरोघरीं इतकीं सांपडतील कीं चांगल्या उदाहरणांच्या तुरळक अपवादानें हा नियम प्रस्थापित होतो. ही जी विधवांची करुणामय आणि असह्य स्थिति होते त्यास कारण पाहूं. त्यांनां कुटुंबाच्या मिळकतींत अन्नवस्त्रापेक्षां जास्त कोणताच हक्क नाहीं यामुळेंच त्या आश्रिताप्रमाणें वाटतात, जड वाटूं लागतात. हाच जर त्यांनां अत्यंत अल्प कां होईना, परंतु कुटुंबाच्या मिळकतींत सहभागीपणाचा हक्क असता तर अशी अवहेलना कधींच झाली नसती. अविभक्त कुटुंबांत टाकाऊ, दुराचारी, खोडसाळ, आडदांड असे पुरुष कांहीं थोडेथोडके नसतात. परंतु अशांचीहि हेळसांड होत नाहीं, याचें कारण म्हणजे त्यांचा विवक्षित भाग कुटुंबांत असून तो वेगळा करून त्यांस वाटेल त्या वेळेस घेतां येतो. एवंच व्यक्तीस कुटुंबव्यवस्थेंत जो मान असतो तो मिळकतीवर असलेल्या सत्तेवर आणि मत्तेवर अवलंबून असतो हें नाकबूल करण्यांत हांशील नाहीं. विधवेस समाश्रित म्हणून अविभक्त कुटुंबांत समजण्यांत आलें व तिला अन्नवस्त्र देण्याची जबाबदारी कुटुंबावर असली तरी अन्नवस्त्राचें प्रमाणहि इतकें किमान ठरविण्यांत येतें कीं साधारण कुटुंबांतील विधवेस निराळें अन्नवस्त्र घेऊन रहातां येणें शक्य नसतें. तेव्हां जास्तींत जास्त म्हणजे अन्नवस्त्र घेऊन माहेरच्या मंडळींच्या सहवासांत सुख मिळण्याच्या आशेवर त्यांच्या आश्रयास रहाण्याशिवाय गत्यंतर नसतें. पूर्वी स्मृतिकालीं विधवेनें कंद, फळें मुळें खाऊन राहण्याचा प्रघात होता तेव्हां केवळ पोटापुरती अन्नवस्त्राची तरतूद होत असावी. तो नियम आजहि अमलांत असून विधवेचें अन्नवस्त्र ह्मणजे हा शब्दप्रचार उपाशीं मरूं न देतां केवळ जिवाची धुगधुगी राहील अशा वेतानें देण्यांत येणारी पोटगी या अर्थानें उपमा ह्मणून रूढ झालेले आहेत. अलिकडे तिच्या नवऱ्याच्या स्थितीप्रमाणें अन्नवस्त्र द्यावें असें उदार धोरण कायद्यांत प्रस्थापित होत चाललें आहे त्याचें बहुतांशीं श्रेय कनवाळू आणि मोठ्या मनाच्या इंग्रजी न्यायाधीशांनां द्यावें लागेल. अजूनहि विधवेस मिळणाऱ्या अन्नवस्त्राची रक्कम तिच्या नवऱ्याच्या मिळकतीच्या मानानें देण्यांत येत नाहीं. पूर्वींच्या काळीं, कीं ज्यावेळीं विधवेनें देह कृश करून जितक्या लवकर तो इहलोकीं ठेवितां येईल तितक्या लवकर तिला स्वर्गसुख मिळेल अशी भावना होती त्या वेळींहि पण अविभक्त कुटुंबांतील विधवेस तिच्या नवऱ्याचा जो भाग अगर हिस्सा तो आमरण उपभोगण्याचा हक्क असे. 'स्वर्याते स्वामिनी स्त्री तु ग्रासाच्छादनभागिनी। अविभक्तधनांशं तु प्राप्नोति मरणान्तिकम् ॥ ( कात्यायन—पतिनिधनानंतर त्याच्या विधवेस अन्नवस्त्र दिलें पाहिजे, तत्रापि अविभक्त मिळकतीचा भाग तिला मरणापर्यंत मिळतो). आतां या अन्नवस्त्राची सुरक्षितता किती आहे याचा विचार करतांना असेंच ह्मणावें लागेल कीं त्याची स्थिति पाण्याच्या फुग्याप्रमाणें अत्यंत बेभरंवशाची आहे. विधवेच्या अन्नवस्त्राच्या हक्काचा बोजा कुटुंबाच्या मिळकतीवर कायदेशीर रीतीनें उत्पन्न केलेला असल्याशिवाय ती मिळकत विकत घेणाऱ्यासमोर विधवेचें कांहींच चालत नाहीं. कुटुंबांतील इतर भागदारांनीं सकारणच नव्हे तर अकारण अगर विनाकारण कर्ज केलें आणि त्या पायीं मिळकत विकली गेली अगर प्रत्यक्ष मिळकत विकली तरीसुद्धां विधवेच्या हक्कावर गदा येते आणि विकत घेणारा मुळींच त्याबद्दल जबाबदार होत नाहीं. अशी ही आजच्या कायद्याची योजना अत्यंत भयंकर असून मिळकत असलेल्या कुटुंबांतील विधवांनां देशोधडीस लावण्यास कारणीभूत होत असते. (लक्ष्मण वि. सत्यभामाबाई २ मुं ४९४: रामकुंवर वि. रामदय २२ अ. ३२८: दिगंबरी देवी वि. धनकुमारी बिबि १० घ. वी. नो १०७४ वगैरे ). कुटुंबाच्या घरांत राहण्याचा तिला जो हक्क आहे तोहि मिळकतीवर बोजा ह्मणून समजला जात नाहीं; तथापि योग्य कारणावांचून मिळकत विकलेली आहे, असा हक्क असल्याचें विकत घेणारास माहित असलें आणि तो हक्क बुडविण्याच्या उद्देशानें सदर व्यवहार केलेला असेल तर विकत घेणाऱ्याविरुद्धहि तो हक्क तिला अमलांत आणितां येतो ( किसनदास वि. रंगुबाई ९ मुं लॉ. रि. ३८२ ). तेव्हां त्यांच्या विपन्नावस्थेंतून त्यांची सुटका करावयाची असेल तर केवळ अन्नवस्त्राऐवजीं त्यांनां कुटुंबांत भागिदार म्हणून कांहींतरी अंशाची मालकी

दिली पाहिजे. म्हणजे अन्नवस्त्राची रक्कम विधवेस किती द्यावयाची याबद्दल ओढाताण राहणार नाहीं, तिच्याशीं योग्य मानसन्मानानें इतर कुटुंबी स्त्रीपुरूष वागूं लागतील आणि अपमानाच्या पदोपदीं ठेंचा लागणार नाहींत. इतर सहभागिदारांस मिळकत उडवून टाकून विधवेस अन्नान्न दशेप्रत नेतां येणार नाहीं व शेवटीं म्हणजे तिन्हाइतांच्याकडे इस्टेट गेली तरीहि तिच्या हक्कास बाध येणार नाहीं. अविभक्त कुटुंबांत निपुत्रिक स्थितींत पति जर वारला तर त्याचा वारसा त्याच्या पत्नीकडे न जातां त्याच्या इतर नातेवाईकांस मिळतो, आणि त्याच्या पत्नीस कुटुंबाची विधवा म्हणून फक्त अन्नवस्त्रापुरताच हक्क मिळतो ही जी विज्ञानेश्वराची योजना तिच्या फोलपणाचें विवेचन, त्यावर जीमूतवाहनानें केलेल्या खरमरीत टीकेंत आणि त्यानें रचलेल्या बिनतोड युक्तिवादांत वर येऊन गेलेंच आहे. आणि त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. पतीच्या मिळकतींत पत्नीहि लग्नघटकेपासून सहभागदारीण होते असें वर दर्शविलेंच आहे. आणि तसें तत्त्व जर आपण ग्राह्य मानलें तर विज्ञानेश्वराचा युक्तिवाद अर्थात् लंगडा पडतो. एखाद्या मिळकतींत दोन भागदार, सहमालक आहेत असें मानिलें तर त्यांपैकीं एकाच्या मरणानें दुसऱ्यास संपूर्ण मालकी मिळेल. अगर निदान मरणाराची मालकी कायम राहून त्याचे वारस त्याच्या भागापुरते मालक होतील व दुसऱ्या जिवंत असलेल्या सहभागदाराचा हक्क कायम राहील. हें अगदीं सरळ आणि तर्कास धरून आहे. दोन मालकांपैकीं एकाच्या मृत्यूनें दुसऱ्याचा हक्क नष्ट व्हावा ही व्यवस्था अविभक्त कुटुंबांतील निपुत्रिक पतीच्या मरणानें पत्नीच्या हक्कसंबंधांत उत्पन्न होते ती धडधडीत चुकीची आहे. पतीपत्नीचा मिळकतीवरचा हक्क निरनिराळ्या प्रमाणांत ठरवितां येण्यासारखा नाहीं असा अभिन्न असेल तर पतीच्या मरणानें त्याच्या पत्नीसच त्या मिळकतीचा वारसा मिळाला पाहिजे आणि त्याच्या मिळकतीची ती स्वतंत्र मालक झाली पाहिजे. जरकरितां त्या उभयतांचें मिळकतींतलें स्वामित्व ठराविक प्रमाणांत असेल, उदाहरणार्थ निम्मेनिम असेल तर, जास्तींत जास्त येवढेंच होईल कीं पतीचे अविभक्त कुटुंबी वारस त्याचा अर्धा भाग घेतील आणि बाकी राहिलेला अर्धा भाग त्याच्या पत्नीस मिळाला पाहिजे. बृहस्पतीनें ह्मटल्याप्रमाणें 'अम्नाये स्मृतितन्त्रे च लोकाचारे च सूरिभिः । शरीरार्धं स्मृता जाया पुण्यापुण्य फले समा ॥ यस्य नोपरता भार्या देहार्धं तस्य जीवति । जीवत्यर्धे शरीरे च कथमन्यः समाप्नुयात् ॥ कुल्येषु विद्यमानेषु पितृभ्रातृसनाभिषु । असुतस्य प्रमीतस्य पत्नी तद्भागहारिणी ॥ (भावार्थ, वेदस्मृति लोकाचार यांत पत्नी ही पतीची पापपुण्यादि कर्मांत अर्धांगी आहे असें मानलेलें आहे. तेव्हां ज्याची भार्या त्याच्या पश्चात् जिवंत आहे त्याचें अर्धे शरीर अर्थात् विद्यमान असतांना दुसरा त्याचें धन कसा घेऊं शकेल? तेव्हां बाप, भाऊ इत्यादि वारस जिवंत असतांहि निपुत्रिक अशा मरणाऱ्या पुरुषाची भार्याच त्याचा अंश घेते ). तेव्हां वर जी सूचना केलेली आहे कीं, लग्नघटकेपासून विवाहित स्त्री आपल्या नवऱ्याच्या मुलाप्रमाणें सहभागदारीण आहे असें समजून तिला पुत्राच्या बरोबरीनें सहभागदारीपणाचे सर्व हक्क मिळावेत, त्या सूचनेस सुसंगत आणि पोषक अशी योजना होणें जरूर आहे आणि तेवढ्यासाठीं अशी सूचना करणें कीं—

**( अ ) पत्नी ह्मणून नवऱ्याच्या मुलाच्या हक्काबरोबरीनें जो तिला पुरुष सहभागदाराचा हक्क मिळावयाचा आहे तो पतीच्या निधनानंतर नष्ट होऊं शकत नाहीं; आणि**

**( आ ) स्त्रियांना वारसा, वांटणी, बक्षीस अगर अन्य तऱ्हेनें मिळणाऱ्या मिळकतीवर त्यांचा संपूर्ण मालकी हक्क असावा.**

## उत्तराधिकारी

पत्नीला नवऱ्याच्या पश्चात् जी मिळकत मिळते त्यावर तिचें मर्यादित स्वामित्व–मरेपर्यंत अन्नवस्त्रापुरतें अगर उपभोगापुरतें–स्वामित्व असतें व तिच्या पश्चात् त्या मिळकतीचे वारस तिचे वारस नसून तिच्या नवऱ्याचे वारस होतात असें वर दर्शविलेलें आहे. विधवेच्या पश्चात् आपणास वारसा मिळणार अशी आशा करणारे जे वारस त्यास उत्तराधिकारी ( reversioner ) अशी संज्ञा देतात. त्यांपैकीं कोणता वारस होऊं शकेल हें नक्की सांगता येत नसतें; कारण विधवेच्या हयातींतच त्यांपैकीं पुष्कळ आशाळभूत प्राणी इहलोक सोडून जातात. तेव्हां विधवेच्या नवऱ्याशीं चवदा पिढ्यांपर्यंत नातें काढणारे सर्व वारस आपणास उत्तराधिकारी समजतात आणि जणूं काय तूर्त त्यांचा मिळकतीवर हक्क उत्पन्न झालेला आहे अशा अधिकारानें विधवेवर मिळकतीच्या उपभोगासंबधानें निर्बंधनें

घालण्यासाठीं दावे आणितात. स्मृतिकालीं उत्तराधिकारी यांच्या या उपद्यापास कितपत उत्तेजन मिळत असावें तें नक्की सांगतां येत नाहीं व याज्ञवल्क्याची उदार व्यवस्था पाहिली म्हणजे स्त्रियांनां स्वतंत्र आणि संपूर्ण स्वामित्व दिलें जात असल्यास उत्तराधिकारी यांची वासलात आपोआप लावली जात होती असें म्हणावें लागेल. स्त्रियांनीं पतीच्या मिळकतीचा फक्त उपभोग घ्यावा ही मर्यादा जाचक होईल आणि केवळ अन्नवस्त्र पुरें होण्यासहि अडचण येईल. यासाठीं टीकाकारांनीं ही मर्यादा वाढविली आणि अन्नवस्त्र, मुलाबाळांचीं लग्नकार्यें, इतर कौटुंबिकांचें भरणपोषण, दानधर्म, मिळकतीचें संरक्षण इत्यादि कारणांकरितां विधवेस मिळकत विकतां येते अगर गहाण टाकतां येते असें त्यांनीं ठरविलें. ही जी मर्यादा वाढविली त्यामुळें विधवांचा अगर उत्तराधिकारी यांचा फायदा कितपत झाला हें सांगणें कठीण आहे आणि त्यावद्दल विवेचन पुढें करणार आहोंतच. तथापि असें म्हणावें लागतें कीं, त्यामुळें विधवांनां ज्याप्रमाणें कपटाचे, खोटे व्यवहार करण्याची मोकळीक मिळाली, त्याचप्रमाणें अमूक एक कृत्य मिळकतीस अपायकारक आहे, अगर अमूक एक व्यवहार योग्य आणि जरूरीच्या कारणाकरितां झालेला नाहीं अशीं विधानें करून विधवेस कोर्टांत खेंचून तिचा छळ करण्याची मुभा उत्तराधिकारी यांस देण्यांत आली आहे. असे उत्तराधिकाऱ्यांचे दावे चालविण्याबद्दल शास्त्राधार नाहीं अगर धर्मग्रंथांत तशी योजना नाहीं. इंग्रजी अम्मल सुरू झाल्यामुळेंच अशा प्रकारच्या दाव्यांनां विशेष ऊत आलेला आहे. उत्तराधिकारी यांच्या भविष्यकालीन हक्कास बाध येऊं नये आणि तो जतन केला जावा यासाठीं असे दावे (Equity) शुद्ध न्यायाच्या धोरणानें देण्यांत येऊं लागल्यापासून अशा दाव्यांची संख्या अतोनात वाढत चालली आहे. आणि त्यांच्या दाव्यांत दिसून येणारी कुटिल नीति दुसऱ्या कोणत्याच प्रकारच्या कज्यांत दिसून येत नाहीं. शुद्ध न्यायाच्या हुकमतीच्या आश्रयानें रहाणाऱ्या या उत्तराधिकारित्वाच्या हक्काखातर खोटे व्यवहार करण्यास आणि त्रासदायक दावे दाखल होण्यास येवढी सवलत करून दिली आहे कीं, त्याच्या त्रासांतून न्यायाच्या निरनिराळ्या कचेऱ्यांत तंट्यापायीं धुळीस मिळूं पहाणाऱ्या विधवेसच नव्हे तर तिच्या आपत्तींत आनंद मानणाऱ्या उत्तराधिकारीस त्राही भगवान् होऊन जातें.

विधवेस अडचणी कोणत्या येतात हें जर पाहिलें तर तिला जरूरीच्या कारणाशिवाय मिळकत गहाणदान, फरोक्त, बक्षीस करितां येत नसल्या कारणानें खरोखर अडचणीचा प्रसंग आला तरी तिला पैसे उभे करितां येत नाहींत. विधवेस असलेल्या मर्यादित हक्काचें पिशाच्च तिला नाडतें, इतकेंच नव्हें तर तिच्याशीं व्यवहार करण्यास कोणी चांगला माणूस त्यामुळें धजत नाहीं. सरळ व्यवहार करणारा गृहस्थ हा तर विधवेच्या कोणत्याहि व्यवहारांत पडत नाहीं. अगदीं तिला जरूरीचे कारणाकरितां कर्ज पाहिजे असलें तरी तें देण्यास अगर तिची मिळकत विकत गहाण घेण्यास कोणी मनुष्य तयार होत नाहीं. तेव्हां थोडी किंमत घेऊन, अगर कांहींहि न देतां किंवा कांहीं रक्कम मागाहून देण्याची कबूल करून उत्तराधिकारी यांचे दावे बळें पाठीमागें लावून घेण्यास उत्सुक असलेले, कज्जेदलाल, खटपटी, कपटी, खोटे व्यवहार करणारे सावकार तिला भेटतात आणि अर्थातच खोटे व्यवहार वाटेल तसे तिला करावे लागत असल्यास त्यांत दोष विधवेचा नसून तिला तसें वागण्यास भाग पाडणाऱ्या कायद्याच्या धोरणाकडे आहे. कांहींहि रक्कम मिळालेली नसतां पुरेपुरी रक्कम मिळाल्याचें कबूल करणें, त्याकरितां खोटे दस्तैवज जमाखर्च करणें, जरूरीच्या खर्चाच्या खोट्या बाबती फुगवून सांगणें, जिनसांची अफरातफर करणें, नासधूस करणें इत्यादि निंद्य प्रकार विधवेस नाइलाजानें करावे लागतात. रोजच्या चरितार्थापुरतें निव्वळ उत्पन्न येईल अशी मिळकत असेल तरच विधवेस अब्रूत दिवस काढतां येतात. मिळकतींतून उत्पन्न होण्यासारखें नसेल अगर ती लहान असेल तर ती मिळकत तिला असून नसल्यासारखीच असते, आणि केवळ रोजच्या चरितार्थाकरितां तिला ती मिळकत विकण्याची कायद्यानें मुभा ठेवलेली असून व अडचणीच्या दृष्टीनें तसें करणें जरूर असतांहि तिची मिळकत योग्य किंमतीस घेणारे कोणी भेटत नाहींत; आणि क्षुल्लक किंमतीस विकत घेणाऱ्यास नाइलाजानें तिला जरी विकावी लागली तत्रापि तिची अडचण दूर होण्यास त्या व्यवहारापासून कांहींच मदत होत नाहीं. एखादा उत्तराधिकाऱ्यानें तिच्यावर दावा लावला तर कित्येक प्रसंगीं मिळकत हातांत असून दाव्याकरितां तिला रक्कमहि उभी करतां येत नाहीं. अशा तऱ्हेनें सर्वतोप्रकारें विधवेची स्थिति अनुकंपनीय अशी होते.

बरें, उत्तराधिकारी यांनां तरी या विशिष्ट हक्कापासून कितपत लाभ होतो असें विचारल्यास त्याचेंहि उत्तर निराशाजनक असेंच द्यावें लागेल. असंख्य उत्तराधिकारी वारसांपैकीं विधवेच्या मरणसमयीं जे जे जिवंत असतील त्यांपैकींच्या जवळच्या वारसास मिळकत मिळावयाची असल्यानें विधवेच्या हयातींत त्यापैकीं कोणालाच असें सांगतां किंवा मानतां येत नाहीं कीं ही इस्टेट आपणासच मिळावयाची आहे. तेव्हां विधवेनें जरी मिळकतीची अफरातफर चालविली तरी त्या मिळकतीचा वारसा आपणाकडेसच येईल ही खात्री नसल्यानें त्यालाहि विशेष खर्चांत उतरून दावे करण्याची उत्सुकता नसते. असें जरी असलें तरी विधवेस आणि तिच्याशीं व्यवहार करणाऱ्यांनां त्यांतल्यात्यांत जवळच्या उत्तराधिकाऱ्यांचा बाऊ वाटतच असतो आणि एवढ्यासाठीं अशा जवळच्या उत्तराधिकाऱ्यांची संमति त्या व्यवहारांत विकत घेण्यांत येते, कारण कायद्यानें असें मानण्यांत येतें कीं उत्तराधिकारी यांची संमति कोणत्याहि व्यवहारास असेल तर तो व्यवहार जरूरीच्या कारणाकरितां झाला आहे असें मानावें. जवळच्या उत्तराधिकारी वारसास विधवेच्या पश्चात् मिळकत मिळेलच अशी खात्री नसते, कारण विधवेच्या मरणसमयीं जे हयात असतील अशापैकींच्या जवळच्या वारसासच मिळकत मिळावयाची असते. तेव्हां भविष्यकालांत कदाचित् मिळणाऱ्या अशा अनिश्चित वारशापेक्षां आजच जी कांहीं कमी फार किंमत हातांत पडेल त्यावर तो संतोष मानून अशा व्यवहारास संमति देण्यास तयार असतो. परंतु विधवेचें दुःख जवळच्या वारसास किंमत दिल्यानें दूर होत नाहीं. जवळच्या उत्तराधिकाऱ्याचें कपट असेल, तो स्वस्थ बसेल, अगर तो विधवेच्या व्यवहारांत सामील असेल, स्त्री असेल तर त्याच्या नंतरच्या उत्तराधिकाऱ्यास दावा लावितां येतो. आपल्यापैकीं एकास संमतीची किंमत मिळाली या गोष्टीनें चिडून गेल्यानें इतर उत्तराधिकारी वारसांनां ईर्षा चढते आणि तेहि दावे लावितात. ह्मणजे विधवेचें दुःख उलट दुणावतेंच. विधवेनें सर्व मिळकतीवरचा आपला हक्क काढून घेऊन जवळच्या नातेवाइकास दिल्यास जणूं काय त्या घटकेस ती मयत झाली असें समजून त्यास संपूर्ण मालकी मिळते, आणि दूरच्या भांडखोर उत्तराधिकारी वारसांचे काटे उपटून काढण्याचा मार्ग ह्मणून हा बहुतेक वेळीं स्वीकारण्यांत येतो. सर्वन्यास अगर इंग्रजींत त्यास Acceleration वा Surrender असें संबोधितात. वार्धक्यानें वा वैराग्यानें विधवेनें ऐहिक व्यापारास कंटाळून त्यांतून मन काढून घेतलें आणि परमार्थाचा पंथ स्वीकारला ह्मणजे मिळकतीच्या वहिवाटीच्या दृष्टीनें ती मृतवत् आहे असें समजून नंतरच्या वारसास मिळकत मिळते, ही जरी या सर्वसंगपरित्यागाच्या बुडाशीं उदात्त कल्पना असली तरी उपर्युक्त कारणांच्या अभावीं जेव्हां असे व्यवहार होतात तेव्हां बहुतेक प्रसंगीं विधवा आणि उत्तराधिकारी हे आपआपसांत मिळकतीचें वाटप करतांना दिसून येतात. हा सर्वसंगपरित्याग विधवा जो कारिते तो मिळकतीची वांटणी करण्याच्या उद्देशानेंच होय आणि निम्मी अधिक मिळकत जरी उत्तराधिकाऱ्यास द्यावी लागली तरी तेवढ्या किंमतीचा मोबदला ह्मणून त्याच्यापासून ती परत जी मिळकत घेते त्यावर तिचा संपूर्ण ताबा राहील अशी खबरदारी घेते. म्हणजे एकंदरींत कपटाचे निंद्य असे व्यवहार उभयतांना करावे लागतात याचें कारण म्हणजे विधवेस दिलेलें मर्यादित स्वामित्व होय.

हे उत्तराधिकारी कोण असा प्रश्न सहज उद्भवतो. तर त्याचें उत्तर असें कीं, मरणाऱ्या पुरुषाचे चौदा पिढ्यापर्यंतचे कुटुंबांतले वारस हे त्याचे उत्तराधिकारी वारस होऊं शकतात. सपिंड, सकूल्य, समानोदक, बंधू असे सर्व निरनिराळे गट यांच्यांतहि समावेश होत असल्यानें मरणाऱ्याच्या हयातींत ज्यांच्या नात्यागोत्याचा मागमूस नव्हता, ज्यांचें तोंडहि पाहिलें नाहीं, जे मरणाराचे कट्टे दुश्मन आणि वैरी ह्मणूनच माहित होते, अशा अनोळखी, अत्यंत लांबच्या, शत्रुरूप विघ्नसंतोषी लोकांचा त्यांत अंतर्भाव होतो. मरणारास श्राद्धादि धर्मकृत्यांत पिण्ड देणारा, अगर जवळचा जिव्हाळ्याचा असा नातेवाईक हे त्याचे वारस असावेत असा जो सर्वसामान्य सिद्धांत आहे, तो उत्तराधिकाऱ्यांच्या जमावास लागू पाडला तर त्यांतले कितीजण बरें त्या कसोटीस उतरतील ? त्यांनां उपमाच द्यावयाची असेल तर अत्यंत अमंगल अशा पक्षाची ह्मणजे गिधाडाचीच उपमा द्यावी लागेल. मृत प्राण्याच्या हयातींत त्यांचेहि त्याजकडे लक्ष नसतें. मात्र त्याच्या मरणानंतर लगेच त्याच्या मालमिळकतीच्या मांसाचे लचके तोडण्यास हे प्रवृत्त होत्साते एकदम भोंवतालीं जमतात. आणि त्याच्या आधारें

धनतृष्णेच्या आड येणाऱ्या मरणाराच्या विधवेस ते जर्जर करितात.

वर विधवेस पतीचा वारसा मिळावा; आणि अशा वारशांत मिळालेल्या मिळकतीवर तिचें संपूर्ण स्वामित्व असावें अशी सूचना केलेली आहे आणि वास्तविक त्या सूचनेच्या उत्तरार्धानेंच या आशाळभूत उत्तराधिकाऱ्यांनां अर्धचंद्र मिळणार आहे. तेव्हां वाचकांस त्या सूचनेचें महत्त्व आणि जरूरी जास्त पटेल असें वाटतें. तथापि या प्रकरणीं होणाऱ्या अन्यायांतून स्त्रियांची सुटका करण्याच्या उद्देशानें अशी वैकल्पिक सूचना करणें जरूर आहे कीं—

**उत्तराधिकारी ह्मणून जे वारस आहेत तो वर्ग नष्ट करावा, विधवेसच संपूर्ण मालक ह्मणून तिच्या नवऱ्याची अगर नवऱ्याच्या नातेवाईकांची मिळकत मिळावी.**

**जरकरितां उत्तराधिकारी यांचा वर्ग वारस ह्मणून कायम ठेवावयाचा असेल, तर मिताक्षरामध्यें ज्यास पहिल्या गटांतले वारस ह्मणून ठरविलेले आहे** ( Compact series of heirs ) **त्यांच्या पुरताच तो मर्यादित असावा आणि अशांपैकींचा जवळचा वारस आणि विधवा यांची मालकी निम्मेनिम ठरवून त्यांची वाटणी त्यांनीं पाहिजे तर करून घ्यावी.**

## उपसंहार—कांहीं आक्षेपांस उत्तर

हिंदु स्त्रियांच्या कायदेशीर दुर्दशेचा अंत आणावयाचा असेल तर वर सुचविलेल्या सूचना क्रमाक्रमानें अगर एकदम अमलांत आणिल्या गेल्या पाहिजेत. स्त्रियांची उन्नति खरीखुरी जर होणार असेल तर त्यांचे कायदेशीर हक्क विस्तृत केल्यानेंच होणार आहे. नुसतें शिक्षण देण्यानें त्यांची स्थिति सुधारेल असें प्रतिपादन करण्यांत जें येतें तें अत्यंत चुकीचें आहे. शिक्षणानें त्यांनां व्यवहार स्वतंत्रपणें व चातुर्यानें करितां येईल, मिळकतीचें रक्षण करितां येईल, संसाराची नौका संथपणानें हांकता येईल. परंतु कोणताहि व्यवहार करण्यास, मिळकत धारण करण्यास अगर संसाराची नौका हाकारण्यास तिला सत्ता आणि स्वातंत्र्य असल्याखेरीज तिची हुशारी कवडीमोल ठरते. हिंदु लोकांनां स्वराज्याचे हक्क दिल्यानेंच त्यांची उन्नति होणार आहे, अशा वेळीं शिक्षण शीलसंवर्धनाचा बाबापदमजीच्या काळचा उपदेश कोणी करूं लागले तर जसे ते विचार आज तिरस्करणीय वाटतात, तद्वतच स्त्रियांच्या हक्काबद्दलचें होय. शिक्षणानें सुसंस्कृति वाढते, कलाकौशल्यानें अंगांतील हुषारीचा विकास होतो, परंतु त्यामुळें जास्तींत जास्त म्हणजे ती चांगली गृहणी होईल, सुकन्या वा सुमाता होईल, तिला वाजवी हक्क न दिल्यास सुशिक्षणानें ती पुरुष जातीच्या जास्त चांगली उपयोगी पडेल यापरता दुसरा कोणताच हेतु या शिक्षणाच्या उपदेशकर्त्यांच्या बुडाशीं नसतो असा कोणी आरोप केल्यास त्याचें समाधान आपण कसें करूं ? एखाद्या उपयोगाच्या प्राण्यास ज्याप्रमाणें हुषार आणि तरबेज करावयाचें येवढ्यासाठींच जर शिक्षण द्यावयाचें असेल तर खुद्द त्या प्राण्याच्या उन्नतीच्या दृष्टीनें त्याचा कितपत उपयोग होईल बरें ? आणि त्या शिक्षणाचा उदात्त हेतु काय असेल बरें ? तद्वतच स्त्रियांनां फक्त शिक्षण देण्यानेंच त्यांची उन्नति होणार आहे असें प्रतिपादन करणाऱ्यांच्या मनांत त्यांनां पुरुषजातीची सेवाचाकरी करण्यास अधिक उपयुक्त करण्याचाच कार्यक्रम नाहींना अशी शंका येते. स्त्रियांनां शिक्षण नको असें मात्र आमचें म्हणणें नव्हे आणि तसा गैरसमज कोणीहि करून घेऊं नये. परंतु शिक्षण हें उन्नतीचें साधन आहे, साध्य जर कांहीं असेल तर वैयक्तिक आणि मिळकतीवरचे पुरुषवर्गाबरोबरीनें उपभोगण्यास मिळणारे हक्क होत. अंगांतील गुणांचा विकास करणें, त्यांची कर्तबगारी जागृत करणें, आणि सुंदर उदात्त ध्येयें पुढें मांडणें हें शिक्षणाचें कार्य असलें तरी प्राणीमात्राच्या कर्तबगारीस वाव नसेल, सुंदर ध्येयें अमलांत आणण्यास अगर गुणांचा विकास होण्यास परावलंबी स्थितीमुळें अशक्य होत असेल, तर शिक्षण असतांहि उन्नतीस पारखें व्हावें लागतें. तुलनेकरितां हिंदी लोकांच्या राजकीय आकांक्षा लक्षांत घ्याव्यात तेव्हां हीच स्थिति स्त्रियांची आहे आणि त्यांची उन्नति घडवून आणण्याची इच्छा असल्यास त्यांनां हक्क दिले पाहिजेत.

'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' आणि 'स्त्रियो निरिन्द्रिया अदायादा' ( तैत्तिरीय संहिता, स्त्रिया बलहीन आहेत व त्यांस अंश मिळत नाहीं ). या दोन वचनांच्या जोरावर स्त्रियांचे वैयक्तिक आणि मिळकतीवरचे हक्क हिरावून घेण्यासहि कित्येक पुराणाभिमानी निघतील तर मग या त्यांच्या हक्कांत सुधारणा घडवून आणण्याच्या प्रयत्नांस विरोध केल्याशिवाय ते कसे राहतील?

स्त्रियांनां स्वतंत्रता अगर मिळकत देतां कामा नये असें निखालस प्रतिपादन करणारे निधड्या छातीचे असतील त्यांनां उत्तर देण्याचें कारण नाहीं, कारण त्यांच्या धामागणीडसी नेंच त्यांचा वेडेपणा उघडा पडणार आहे. आतां कांहीं कांहीं परिस्थित्यनुसार त्यांनां स्वतंत्रता आणि मालकी देण्यास कबूल असणाऱ्यांस आमची येवढीच विनंति आहे कीं त्यांनीं सयुक्तिक आणि स्त्रियांच्या आकांक्षांची जोपासना करणारी अशी दुसरी योजना बेलाशक पुढें मांडावी. आम्ही सुचविलेल्या सर्वच सूचना ताबडतोब अमलांत आणा असा आमचा आग्रह नाहीं, व वस्तुतः तें तसें होणें शक्यहि नाहीं. परंतु स्त्रीजातीकडे आपली माता, कांता, कन्या, भगिनी इत्यादि जिव्हाळ्याच्या नात्याच्या दृष्टीनें पाहून त्यांनां आज ज्या कित्येक दुरापास्त अडचणी कायद्याच्या अनुदार धोरणानें सोसाव्या लागत आहेत त्या अडचणी दूर करण्यास मात्र आपण प्रामाणिक नागरीक म्हणून तयार असलें पाहिजे. स्त्रियांनां स्वातंत्र्य नको असें जर एखाददुसऱ्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करणाऱ्या स्त्रीच्या उदाहरणाकडे बोट दाखवून म्हणावयाचें असेल तर ज्यांनां स्वातंत्र्य न देतां बंदिवासांत, अंधारकोठडींत कोंडून ठेविलें असतें तर त्यांचा स्वतःचा अधःपात, आणि त्यांच्या सान्निध्यांत वा अवलंबून असलेल्या इतरांचा छळ टाळतां आला असता असें निश्चयें करून सांगता येईल अशा प्रकारचे, अशा मनोरचनेचे आणि अशा नीतिमत्तेचे कीतीतरी इसम पुरुष जातींतून निवडून काढितां येतील. स्वातंत्र्याचा दुरुपयोग पुरुषांनीं केल्यास चालेल, स्त्रियांनीं केल्यास त्यांत विशेष पाप लागणार असें प्रतिपादन करणें पक्षपाताचें होईल. स्त्रियांनां स्वातंत्र्य नाहीं ह्मणून व्यक्तीचें आणि समाजाचें झालेलें नुकसान कोणी लक्षांत घेतलें आहे काय ? नजरकैदेंत दिवस कंठणाऱ्या कित्येक कर्तबगार स्त्रियांच्या आयुष्याचा विध्वंस झालेला आहे. या गोष्टीचीं उदाहरणें मिस् मेयोनें दिलीं तरच तीं पटतील अशांतला भाग नाहीं. त्यांच्या शरीरावर पुरुषांनीं अगदीं एखाद्या जिनसेप्रमाणें हुकमत गाजविण्यानें त्यांच्या अंगातील गुणांचा विकासच होतो आणि ही हुकमत एखाद्या दुराचारी, दुर्गुणी नवऱ्यानें चालविली तरीहि परिणाम इष्ट तोच घडून येतो असें ह्मणणें असेल तर आमचा नाइलाज आहे. राष्ट्रीयसभेंत अध्यक्ष, कायदेकौन्सिलांत, स्थानिक संस्थांत सभासद, ह्मणून ज्या स्त्रीसभासदांची आपणहून निवड करून देतों त्यांची जात वैयक्तिक स्वातंत्र्यास नालायक आहे असें कसें ह्मणतां येईल? जनतेपैकीं अर्धीअधिक मनुष्यें आपण स्वातंत्र्यास महाग केल्यास आपली सर्वांगीण उन्नति कशी होणार? आणि 'जिच्या हातांत पाळण्याची दोरी ती राष्ट्रोद्धार करी' असा जिचा अधिकार तिला जर हालअपेष्टांत, पारतंत्र्यांत दिवस कंठावे लागले तर राष्ट्रोद्धार तरी तिच्या हातून कसा होणार? मिळकतीसंबंधानेंहि अशाच कित्येक भ्रामक समजुती आहेत. पूर्वीच्या धांदलीच्या, लढायांच्या आणि उलथापालथीच्या काळांत स्त्रियाच काय पण कुटुंबांतल्या इतर पुरुष सहभागदारांनां कर्त्याच्या हुकमतींत राहणें जरूर होतें, परंतु तो काळ बदलून पुरुषांनां व नंतर स्त्रियांनां मिळकतीवर हक्क देण्याची तजवीज स्मृतिकारापासून होत आहे. मात्र तो सुधारणेचा ओघ बंद पडला आणि स्त्रियांचा सुधारणेचा गाडा परवशतेच्या चिखलांत रुतून राहिला. स्त्रियांनां मिळकत दिली तर त्या उडवून टाकतील असा एक मोठा आक्षेप प्रत्येक सुधारणेच्या वेळीं घेण्यांत येतो. जर त्याच्या पाठीमागें डोकावणाऱ्या हेतूंचें प्रथक्करण करितां परकीय धनाच्या व अनियंत्रित सत्तेच्या अभिलाषाचे घटक त्यांत स्पष्ट दिसून येतात. तरी तें हिडीस दृश्य बाजूस ठेवून या आक्षेपाचें खंडन करणें अवघड नाहीं. निरनिराळ्या व्यसनांत दंग होऊन मिळकतीचा नायनाट करून त्याच्यावर अवलंबून असलेल्या बायकामुलांची अन्नान्नस्थिति करणारे पुरुष थोडे कां दिसतात? मग त्यांची मालकी हिरावून घेण्याचा आक्षेपकांनीं कधीं प्रयत्न केलेला आहे कां? प्रयत्न केला तरी तो निष्फळ ठरेल हें खरें असलें तरी आक्षेपकांचा प्रामाणिकपणा त्यावरून अजमावून पाहतां येणार आहे. मुसलमान स्त्रिया शिक्षणांत आपणापेक्षां मागासलेल्या तरी त्यांनां मिळकतींत संपूर्ण हक्क आहेत. तेव्हां त्या मिळकतीची वाताहात करितात असा कोठें बभ्रा झालेला नाहीं. अगर त्यांचे हक्क मर्यादित करण्याची चळवळ होत नाहीं. तसेंच पारशी आणि इतर ज्ञातीय लोकांच्या स्त्रियांचें. याच कारणाकरितां स्त्रियांनां मिळकत द्यावयाची नसेल तर मुलगी अगर वहीण यांनां तरी वारसाईत मिळकत कां ह्मणून द्यावी? तैत्तीरीय संहितेचा अर्थहि असाच लावण्यांत आलेला आहे कीं त्यांत स्त्रियांनां जो अंश मिळत नाहीं असें सांगितलेलें आहे तो सोमाचा अंश होय. (पराशर-

माधवीय ) जुन्या स्मृतींतून हक्क दिलेला नाहीं ह्मणून द्यावयाचा नसेल तर त्यांत दुसऱ्याहि कीत्येक व्यक्तींनां मिळकत घेतां येत नव्हती. परंतु आज ती आडकाठी राहिलेली नाहीं. उदाहरणार्थ. मनूनें ह्मटल्याप्रमाणें 'सर्वे एव विकर्मस्था नार्हन्ति भ्रातरोधनम् ( ९.२१४ पापाचरण करणाऱ्या भावांनां हिस्सा मिळत नाहीं ) परंतु आज पहावें तो दुराचाऱ्याचा अग्रगणी असेल त्यासहि हक्कानें मिळकत मागतां येते. दुसरें असें एक कारण दाखविण्यांत येतें कीं, मिळकत पर कुटुंबांत जाईल. परंतु बंधू हा जो एक वारसांचा वर्ग आहे त्यांनां मिळकत जाते व ते तर परकुटुंबीच असतात. ह्मणजे या मुद्यांतहि विशेष असें कांहीं नाहीं. स्त्रियांच्या हातांत मिळकत गेली तर स्वाभाविक संग्रह करण्याची बुद्धि त्यांच्यांत उपजत असल्यानें निदान पुरुषांच्या मानानें स्त्रिया ह्या मिळकतीचें रक्षण जास्त प्रमाणांत करूं शकतील, यांत संदेह नाहीं. आक्षेप अनंत आहेत आणि सर्वांचें खंडण करितां एक ग्रंथ होईल. तेव्हां सूज्ञ वाचकांच्या युक्तिवादावर भिस्त ठेवून दुसऱ्या मुद्द्याकडे वळूं.

## सुधारणा कोणी करावयाची ?

स्त्रियांनां हक्क काय काय द्यावयाचे हा सर्व जनतेच्या मताधिक्यानें ठरण्यासारखा प्रश्न नाहीं. तो प्रश्न ज्यांनां शास्त्रकारांनीं शिष्ट म्हणून ह्मटलें आहे त्यांनींच ते युक्तायुक्त विचारानें ठरविणें होय. स्मृतिकालांतहि संस्कृतीची मुळींच तोंडओळखहि नसणाऱ्या मूळच्या रहिवाश्याच्या जाती कांहीं कमी नव्हत्या. परंतु त्यांनांहि धर्मनियंत्रण जें शिष्टांनां लागू पडणारे तेंच, असा नियम होता. 'सद्भिराचरितं यत्तं यस्याद्धार्मिकैश्च द्विजातिभिः । तद्देशकुल जातीनामविरुद्धं प्रकल्पयेत (मनु. ८-४६ धर्मनिष्ठ ब्राह्मणानें व सदाचारी ग्रहस्थांनीं जें आचरिलें असेल तोच धर्म म्हणून राजानें निश्चित करावा ) तसेंच वसिष्ठाचें ह्मणणें आहे. श्रुतिस्मृतिविहितो धर्मः । तदभावे शिष्टाचारःप्रमाणम् । शिष्टः पुनरकामात्मा ॥ ( वशिष्ठ-धर्म श्रुतिस्मृतींत सांगितलेला आहे त्याच्या अभावीं शिष्ट ह्मणून जे आहेत त्यांचा आचार. ज्यांनां कांहीं इच्छा नाहीं असे जे ते शिष्ट होत ) याचप्रमाणें बौधायन यानें सांगितलें आहे. 'उपदिष्टो धर्मः प्रतिवेदम् । स्मार्तो द्वितीयः। तृतीयः शिष्टागमः । शिष्टाः खलु विगतमत्सरा निरहंकाराः अलोलुपा दंभदर्पलोभमोहक्रोध विवर्जिताः ॥ ( वेदांत मूळ धर्म सांगितला आहे. त्यानंतर स्मृतींत सांगितलेला धर्म. दुसरा व शिष्टांचा आचार हा तिसरा धर्म होय. शिष्ट कोणास समजावें तर, ज्यांनां मत्सर नाहीं, अहंकार नाहीं, अभिलाष नाहीं, दम्भ, गर्व, लोभ, आशा आणि क्रोध ज्यांनीं टाकून दिला आहे अशांस ) तेव्हां शिष्ट ह्मणून ज्यांनां शास्त्रानें म्हटलें आहे अशांचा आचारच कायद्याप्रमाणें समजला जातो. अशांनींच हा प्रश्न सोडवावयाचा आहे. स्वराज्य पाहिजे कां नको आणि पाहिजे असल्यास कोणत्या मगदुराचें पाहिजे हा प्रश्न राजकारणी शिष्टांनीं अज्ञानांधकारांत खिचपत पडलेल्या असंख्य बंधूंच्या वतीनें सोडवावयाचा आहे आणि त्यांची योजना हिताची, प्रामाणिक उन्नतीस पोचविणारी अशीच समजून सर्वांची ह्मणून ती समजावयाची त्यांत जर यच्चयावत हिंदुस्थानांतील लोकांचें मत घेऊन मताधिक्यानें ते ठरवूं ह्मटल्यास स्वहित न जाणणाऱ्यांचेंच बहूमत होऊन स्वराज्यच नको असाहि परिणाम यावयाचा. तद्वतच स्त्रियांच्या हक्काचा प्रश्न शिष्टांनींच सोडवावयाचा आहे. त्यास जनतेंतील बहुमताच्या पाठिंब्याची जरूरी आहे असें कोणी म्हणूं लागल्यास तें त्याचें म्हणणें हास्यास्पद ठरेल. आतां जाणून बुजून अडवणूक करण्याकरितां राजकारणाप्रमाणें या सामाजिक बाबतींतहि बहुमताचा आधार मागून या चळवळीस थंड पाडणें शक्य नाहीं. आणि अशी अशक्य गोष्ट प्रतिपादन करणाऱ्यांच्या मनांत अडवणुकीच्या कार्यक्रमाचेंच काहूर माजलेलें दिसेल. एवंच या विषयाबद्दल चळवळ सर्व दिशांनीं झाली पाहिजे आणि चळवळ करण्यास तात्पुरती योजना असावी या हेतूनेंच हा लेख लिहिण्याचें योजिलें होतें. आमच्या भगिनीवर्गास तरी वादविवादाचे साधकबाधक मुद्दे समजावेत आणि शक्य तर त्यास उपयोगी पडणारें वाङ्मय त्यांनां दाखवून द्यावें म्हणून किंचित् रुक्षपणा आणूनहि या विषयाची चर्चा करावी लागली. जनतेंत याविषयीं कांहीं तरी चळवळ व्हावी, विचाराला चालना मिळावी आणि जे कोणी या दिशेनें कांहीं सुधारणा घडवून आणण्याच्या विचारांत अगर उद्योगांत असतील त्यांच्या कार्यास हातभारहि लाविल्यासारखें होईल; इत्यादि विचारांनीं लिहिण्यास उद्युक्त झालों हेंहि लपवून ठेवण्यांत अर्थ नाहीं. या विषयास चालना देण्याचें कार्य जरी या लेखानें झालें तरी लेखक आभारी होणार आहे. शेवटीं येथील न्यायखात्यांतील अधिकारी व माझे स्नेही श्री. श्रीधर रामजी शिंदे यांनीं कित्येक सुंदर मुद्दे सुचविल्याबद्दल त्यांचे आभार मानून वाचकांचा निरोप घेतों.

REFBK-0003557